श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

नॅक 'अ' श्रेणी

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती





# शिववाणी

२०१९-२०



प्राचार्यांचा संस्थेतर्फे सत्कार- नॅकवर नियुक्ती



अनाथांचा नाथ शंकरबाबा पापळकरांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार



शुभारंभ दिन- महाविद्यालयीन सत्र २०१९-२०



महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण जयंती



डॉ. डी. टी. इंगोले, संचालक 'इन्क्युबेशन सेंटर' यांचा सत्कार



शिक्षणमहर्षी डॉ. भाऊसाहेब देशमुख जयंती व्याख्यान- वक्ते भुजंग बोबडे



महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ : प्रमुख पाहुणे डॉ. हेमंत देशमुख



जनसंवाद मेरिट विद्यार्थ्यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

नॅक 'अ' श्रेणी

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती





# शिववाणी

## २०१९-२०

- प्रेरणा
  डॉ. स्मिता देशमुख, प्राचार्य

- प्रमुख मार्गदर्शक
  डॉ. कुमार बोबडे

- मार्गदर्शक
  डॉ. वर्षा चिखले
  डॉ. वैशाली देशमुख
  डॉ. सुवर्णा गाडगे
  डॉ. मनोज जोशी
  डॉ. किशोर साबळे
  डॉ. किशोर फुले

- टीम 'शिववाणी' (संपादक मंडळ)
  सर्वेश मराठे, मुख्य संपादक
  पराग राऊत
  प्रणाली जाधव
  रुपल चवडे
  अनुयोग घावडे
  प्रशांत राठोड

# शिववाणी

२०१९-२०२०

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

**श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती**

नॅक 'अ' श्रेणी मानांकित


प्रकाशक
डॉ. [illegible] देशमुख
प्राचार्य

मुद्रक
शिवाजी ऑफसेट
अमरावती. ०७२१-२६६६१३३


## महाविद्यालयाचा बहुमान



**डॉ. स्मिता देशमुख**

कार्यकारी परिषद सदस्य
राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती समिती

## प्रमुख मार्गदर्शक



**डॉ. कुमार बोबडे**

विभागप्रमुख
पत्रकारिता व जनसंवाद

## मार्गदर्शक



**डॉ. वर्षा चिखले**



**डॉ. वैशाली देशमुख**



**डॉ. सुवर्णा गाडगे**



**डॉ. मनोज जोशी**



**डॉ. किशोर साबळे**



**डॉ. किशोर फुले**

## टीम 'शिववाणी' (संपादक मंडळ)



**सर्वेश मराठे**
मुख्य संपादक



**पराग राऊत**



**प्रणाली जाधव**



**रुपल चवडे**



**अनुयोग घावडे**



**प्रशांत राठोड**

# ACHIEVERS - ACADEMICS S. G. B. A. U. AMRAVATI MERIT STUDENTS

## Dept. of BJMC

1st Merit



Ku. Shrutika Mahalle
Gold Medal

2nd Merit



Yuraj Dabhade
Silver Medal

3rd Merit



Prashant Rathod

## Dept. of MJMC

1st Merit



Ku. Pallavi Gadekar

2nd Merit



Ku. Sulekha Soni

## Dept. of B.Voc.

1st Merit



Ku. Ashwini Gadge

## Dept. of English

2nd Merit



Ku. Chaitali Takale

6th Merit



Ku. Kalpana Sakarde

## Dept. of Geography

3rd Merit



Ku. Shamal Sonone

3rd Merit



Ku.Rohini Pingale

## Dept. of Political Science

5th Merit



Dhiraj Bone

8th Merit



Ku. Pratiksha Gurnule

## Dept. of Economics

2nd Merit



Akash Tayade

## Dept. of Commerce & Management

6th Merit



Ku. Jaya Meshram

8th Merit



Ku. Sushama Meshram

## महाविद्यालयाचे मानकरी



डॉ. गजानन भारती
अर्थशास्त्र विषयात आचार्य पदवी

## गुणवंत सत्कार



# मनोगत



अनेक दिवसांपासून विविध विषयावर चिंतन करताना. समाजातील घडामोडी बघताना, जाणवतं की, व्यक्त होण खूप गरजेचं आहे. व्यक्त होणं म्हणजे फक्त आपल्या भावनांचा निचरा होऊ देणं नाही तर अंतरीचा जिव्हाळा जपत, परस्परांचा विश्वास जपणं, एकमेकांचा सन्मान करणं होय. अव्यक्त विचारांनी सुंदर मनाचा कोपरा घुमसत राहणं व स्वतःला बेचैन करणं यासारखं क्लेशकारक दुसरं काही नाही.

'कोरोना १९ शिववाणी विशेषांक २०१९-२०' आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होतोय. सतत कसल्यातरी दडपणाखाली वावरण्यापेक्षा व्यक्त होऊन निश्चित व्हावं. युवापिढी समोर असणाऱ्या अनेक भावनांना मुक्त वाट द्यावी ह्या उद्देशाने शिववाणी टीम काम करत आहे. शिक्षण, कृषी, पर्यावरण, अर्थव्यवस्था, कुटुंब आरोग्य व्यवस्था, महामारीचे बळी, उपाययोजना या अनेक विषयांवर आपल्या संवेदना व्यक्त करताना काही प्रश्नांची उकलही होणार आहे. आज मानवासमोर केवळ 'अस्तित्वाचा' जिवंत राहण्याचा विचार मांडला जातोय. या पार्श्वभूमीवर व्यक्तिगत पातळीपासून वैश्विक पातळीपर्यंतचे विचारमंथन करणाऱ्या शिववाणी सदस्य व संवेदनशील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देते. आत्मविश्वासाने संकटावर मात करण्याचा मानसिक, बौद्धिक, वैचारिक बळ मिळावं यासाठी कोरोना काळातील अनुभव, योजना, शिवाजी शिक्षण संस्था कार्यकारिणीचे योगदान, प्रशासकीय स्तरावरून केलेल्या उपाय योजना, 'कोरोना वॉरिअर्स' विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, समाजाभिमुख प्राध्यापकांनी दाखविलेली सामाजिक बांधिलकी अशा अनेक बार्बीचा समावेश करताना वैराग्यमूर्ती गाडगेबाबा व बहुजनांचे कैवारी डॉ. पंजाबराव देशमुख यांची आठवण येते. शिवपरिवाराने सामाजिक जाणीव जपल्याने एक समाजसंस्कार माणुसकीच्या ओलाव्याने शब्दबद्ध करण्याचे काम शिववाणी करीत आहे.

'कोव्हीड १९' या संकल्पनेवर आधारित शिववाणी विशेषांक संग्रही असावा, वाचावा हे सांगताना 'स्वतः जगा आणि दुसऱ्याला जगू द्या' हा संदेशही देत आहे. यशस्वी वाटचालीसाठी वर्तमानामध्ये लेखणी आणि वाणी सोबत कृतीशिलतेची जोड द्यावी असेही सुचवित आहे. समस्या निर्माण झाली की तणाव निर्माण होतो त्यावर तोडगा काढावा, घातक विचार करू नये, मानसिक संतुलन राखावं व स्वास्थाची काळजी घ्यावी असंही सुचवित आहे. कदाचित कोरोनाशी संघर्ष करण्याचे क्षण आले तर कोलमडून न जाता प्रतिकार क्षमतेवर विश्वास ठेवावा. या विचारातून आंतरिक उर्जा मिळेल. जन्माने व कर्माने मिळालेली नाती व जीवन सुदृढ राहण्यासाठी येणाऱ्या दिवसांवर आनंदाचा, आरोग्याचा मजकूर लिहू या आणि आपल्या आयुष्याची पाने सुंदर करू या, अशा आरोग्यदायी शुभेच्छा देते.

- डॉ. स्मिता देशमुख
प्राचार्य

## विविध मंडळ : उद्घाटन व उपक्रम



लेखन, काव्य, संगीत कार्यशाळा उद्घाटन


सृजनचे प्रकाशन करताना संस्थेचे कार्यकारी सदस्य ॲड. अशोकराव ठुसे



अर्थशास्त्र विभागाद्वारे आयोजित व्याख्यान


वाणिज्य अभ्यासमंडळाचे उद्घा[illegible]



शिवाजी मिडिया क्लबचे उद्घाटन


राज्यशास्त्र अभ्यासमंडळाद्वारे आयोजित संविधान दिन



गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे पोषण आहार सप्ताह



'सार्थक नव्या' हिंदी मासिकाचे प्रकाशन


आमचे दैवत

## श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

### कार्यकारिणी : २०१७-२०२२


**मा. श्री. हर्षवर्धन देशमुख**
अध्यक्ष


**श्री. [illegible] ठाकरे**
[illegible]


**डॉ. रामचंद्र शेळके**
उपाध्यक्ष


**ॲड. गजानन पुंडकर**
उपाध्यक्ष


**श्री. दिलीप इंगोले**
कोषाध्यक्ष


**श्री. हेमंत काळमेघ**
सदस्य


**प्राचार्य केशवराव गावंडे**
सदस्य


**श्री. केशवराव मेतकर**
सदस्य


**ॲड. अशोकराव ठु**
सदस्य


**श्री. शेषराव खाडे**
सचिव


**डॉ. वि. गो. ठाकरे**
स्वीकृत सदस्य


**श्री. नरेश एम. पाटील**
स्वीकृत सदस्य


**डॉ. पी. एस. वाया**
स्वीकृत सदस्य



मराठी भाषा गौरव दिन : उपस्थित साहित्यिक डॉ. अनुराधा वऱ्हाडे



चर्चासत्र : व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची ५० वर्षे



अर्थशास्त्र विभागाच्या 'संवादक' चे प्रकाशन



ग्रंथालयाच्या वतीने आयोजित ग्रंथप्रद



चित्रपट लेखन कार्यशाळेत उपस्थित मान्यवर



विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील विजेत्यांसोबत प्राचार्य व प्राध्यापक वृंद



स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत पाहुण्याचे स्वागत




महाविद्यालयात आयोजित प्लेसमेंट ट्रेनिंग कॅम्प

## स्नेहसंमेलन 'संवादपर्व' :२०१९-२०२०



अनाथांचा नाथ शंकरबाबा पापळकर यांचा विद्यार्थ्यांतर्फे सत्कार



छायाचित्र प्रदर्शनी- अभिप्राय नोंदवितांना मा. संस्थाध्यक्ष



मा. संस्था उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर यांचे स्वागत



संवादपर्व समारोपाला संस्था उपाध्यक्ष मा. ठाकरे व मा. ॲड. पुंडकर यांची उपस्थिती



संवादपर्व पुरस्कार वितरण समारंभ



डॉ. ज्वालाप्रसाद स्मृती वादविवाद स्पर्धेत संस्था सचिव श्री. खाडे



आनंद मेळाव्याचे पाहुणे प्रा. एस. एस. देशमुख यांचे स्वागत



वादविवाद स्पर्धेतील विजेते व मान्यवर



संस्थाध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धन देशमुख वृक्षारोपण करताना



एन.सी.सी. विद्यार्थ्यांची उपलब्धी



रक्तदान शिबिर



स्वच्छता सुरक्षा रॅली



मतदान जनजागृती अभियान



एन.सी.सी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रम



एक सामाजिक उपक्रम



कारगील दिवस



# अनुक्रमणिका

## विशेष मुलाखत


| | |
|---|---|
| ■ मा. श्री. हर्षवर्धन देशमुख, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती | १ |
| ■ मा. श्री. नरेशचंद्र ठाकरे, ज्येष्ठ उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती | २ |
| ■ मा. श्री. दिलीपबाबू इंगोले, कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती | ३ |
| ■ मा. श्री. शेषराव खाडे, सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती | ४ |
| ■ डॉ. स्मिता देशमुख, प्राचार्य, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती | ५ |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कोरोना आणि वाढती बेरोजगारी | कु. प्रियंका ज्ञानेश्वरराव फाले | ७ |
| २) | कोरोना आणि बेरोजगारी | कु. शिवाणी किरणराव इंगळे | ८ |
| ३) | लॉकडाऊन मधील हात मजुरांची कैफियत | सुमित भास्करराव रिठे | ९ |
| ४) | कर्माचा हिशेब आणि निसर्ग | सर्वेश मनिषा विनोद मराठे | १० |
| ५) | गावगाड्यातील कोरोना | अनामिका प्रकाश सोनोने | ११ |
| ६) | कोरोना आणि पर्यावरण | ऋषभ मुंदे | १२ |
| ७) | कोरोना काळातील ग्रामीण भाग | मोहित सुरेशराव बदुकले | १३ |
| ८) | रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा, कर्मकांड | अंशुल वावरे | १५ |
| ९) | कोरोना काळातील विवाह.... | पराग सुनीलराव राऊत | १६ |
| १०) | कोरोना : भ्रम, संभ्रम आणि राजकारण | आकाश दे. बोदिले | १८ |
| ११) | कोरोना आणि सद्यस्थिती | भक्ती संतोष टाले | २१ |
| १२) | मोबाईल मी आणू-तरी कुठून | आशिष अशोकराव नागापुरे | २२ |
| १३) | कोरोनाचे पडसाद / परिणाम | शुभम ना. तायडे | २३ |
| १४) | लॉकडाऊनची सकारात्मकता | कु. समीक्षा राजेंद्र हुड | २४ |
| १५) | सावधान... शेवटी करोना हरलाच | देवाशिष शेडगे | २७ |
| १६) | कोरोना आणि राजकारण | कु. पुजा बोलखलकर | २९ |
| १७) | मी पोलिस बोलतोय | कु. अंकिता रामेश्वर पावडे | ३० |
| १८) | कोरोना-समज गैरसमज | भक्ती संतोष टाले | ३१ |
| १९) | अफवेच्या बाजारात देशाची करुणावस्था | प्रशांत निर्मला शिवा | ३२ |
| २०) | कोरोना-निदान आणि उपचार | अनुयोग पावडे | ३४ |
| २१) | कोरोना आणि लग्न | वैष्णवी भुसारी | ३९ |
| २२) | कोरोना आणि मानवी संवेदना | मनिषा देशमुख | ४० |
| २३) | मुलाखत-कोरोनाशी लढलेल्या तरुणाची | पराग सुनीलराव राऊत | ४१ |
| २४) | कोरोना आणि युवा पिढी | चैताली रामेश्वर देशमुख | ४२ |
| २५) | वऱ्हाड हा कोरोनाचा मोठा स्पॉट | प्रणाली जाधव | ४३ |
| २६) | 'अपुनच अपना भगवान है !' | अनुयोग पावडे | ४४ |
| २७) | कोरोना-समज गैरसमज | कु. समिक्षा राजेंद्र हुड | ४५ |

## हिंदी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| | | | ४७ |
| २८) | भविष्य के शिक्षा प्रणाली की दहलीज | अनिता यादव | ४८ |
| २९) | कोरोना और शिक्षा व्यवस्था | वर्षा इंगळे | ४९ |
| ३०) | कोरोना और शिक्षा क्षेत्र | कु. पूजा घोटे | ५१ |
| ३१) | कोरोना और युवा पीढी | रुपल जैन | ५२ |
| ३२) | कोरोना संवेदना | पवन प्रकाश सरडे | ५३ |
| ३३) | जालिम कोरोना की इनायत है | संदेश बोचरे | ५४ |
| ३४) | नजर मत चुराओ कोरोना | वंशिका रामकृष्ण ढोणे | ५४ |
| ३५) | कोरोना काल में आह्वान... | कु. पूजा रमेश धंदर | |


## इंग्रजी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 36) | CORONA - THE PANDEMIC | Dinesh B. Thakare | 55 |
| 37) | Corona Virus and Education Sector | Shivani Sunil Mathe | 59 |
| 38) | Impact of Coronavirus.... system | Riya Sharma | 60 |
| 39) | Impact of Corona on Indian.... | Vaishnavi Wankhade | 61 |
| 40) | Corona and Young generation | Shrushti Hitendra Patil | 62 |
| 41) | CORONA VIRUS AND ECONOMIC .... | Miss.Pooja M.Yadav | 63 |
| 42) | Economic Impact .... | Kranti Mahure | 66 |
| 43) | Fakeness Blinds You... | Miss. Mrunal Vilesh | 67 |
| 44) | Covid - 19 And Business | Miss. Mrunal Bhoyar | 68 |
| 45) | Impact of Coronavirus.... | Sejal P. Deshmukh | 69 |
| 46) | Corona and Environment .... | Vaibhav Khandare | 70 |
| 47) | Impact of Covid.... | Madhura Dethe | 71 |
| 48) | True Religion | Saurabh Tayade | 72 |
| 49) | Weddings during Corona | Rupal Jain | 73 |
| 50) | Corona and Empathy..... | Sanjiwan Diwe | 74 |
| 51) | Marriages in the Corona Period | Sushant Bhilave | 76 |


## अहवाल विभाग


- राज्यशास्त्र विभाग
- इंग्रजी विभाग
- इतिहास विभाग
- समाजशास्त्र विभाग
- भूगोल विभाग
- लेखन, काव्य व संगीत
- वाणिज्य विभाग
- मराठी विभाग
- पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग
- हिन्दी विभाग
- जनसंवाद विभाग
- गृहअर्थशास्त्र विभाग
- एन.सी.सी. विभाग
- राष्ट्रीय सेवा योजना
- सांस्कृतिक विभाग
- शारीरिक शिक्षण विभाग

७७-९६


## सहकार्य


- मुखपृष्ठ - प्रा. प्रमोद गावंडे, विनोद गुडधे
- कार्यक्रम छायाचित्रे - राधेशाम पिंजरकर
- अक्षर जुळवणी - लक्ष्मीनारायण जयस्वाल
- लॉकडाऊन छायाचित्रे - मनिष जगताप


या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही



- मा. श्री. हर्षवर्धन देशमुख, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
- मा. श्री. नरेशचंद्र ठाकरे, ज्येष्ठ उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
- मा. श्री. दिलीपबाबू इंगोले, कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

# विशेष मुलाखत

- मा. श्री. शेषराव खाडे, सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
- डॉ. स्मिता देशमुख, प्राचार्य, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

कोरोना
विशेष मुलाखत

# मा. श्री. हर्षवर्धन देशमुख

अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती



**प्रश्न** - कोविड काळात संस्था म्हणून कोणती आव्हाने समोर आली ?

**उत्तर** - संस्था जवळ जवळ बंद आहे. सगळ्यात मोठे आव्हान विद्यार्थ्यांसाठी आहे कारण परीक्षा वगैरे सगळ्या शैक्षणिक कामात अडचणी आल्या आहेत. माझ्या मते हे काही चांगले लक्षण नाही.

**प्रश्न** - एकीकडे संस्थेसमोर भरपूर आव्हाने असताना सामाजिक कर्तव्य म्हणून संस्थेने काय भूमिका बजावली ?

**उत्तर** - आमच्या परीने आम्ही भरपूर मदत केली. सीएम फंडाला एक कोटी अठरा लक्ष रुपयाचा निधी दिला. सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यासाठी दोन दोन दिवसाचा पगार दिला, त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. आपल्याकडे फक्त वैद्यकीय महाविद्यालय सुरू आहे. तेथे कोरोनाच्या रूग्णांवर उपचार करण्यात येतात. सरते शेवटी ती आमची सामाजिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांचे प्रवेश कोविडमुळे थांबलेले आहेत. पण रुग्णालय चालविणे ही आमची सामाजिक जबाबदारी असल्याने आम्ही ती निभावतो आहोत.

**प्रश्न** - आपली संस्था खूप मोठी संस्था आहे. केजी ते वैद्यकीय शिक्षणापर्यंत आपण शिक्षण देतो. तेव्हा कोविडकाळात विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी संस्थेने काही नवीन योजना आखल्या आहेत काय ?

**उत्तर** - जवळ जवळ सर्वच महाविद्यालयात ऑनलाईन वर्ग सुरू आहेत. कुठलेही उत्पन्न नसताना स्वत:च्या खर्चावर शिक्षकांना ठेवतोय. सरकारची ही भूमिका चुकीची आहे. आवक नसताना ते महाविद्यालयांकडून शिकविण्याची अपेक्षा करत आहेत, ही एक बाजू आहे. सरकारने यावर काही उपाययोजना करायला हव्या.

**प्रश्न** - आपल्या मते कोविड नंतर येणाऱ्या शैक्षणिक समस्या कोणत्या? त्यावर उपाययोजना काय ?

**उत्तर** - एक वर्ष ही परिस्थिती असणारच आहे. इतके असताना लोक जबाबदारपणे वागत नाहीत. कुणी मास्क लावत नाहीत. परिस्थिती अजून सामान्य झालेली नाही आणि ती इतक्या लवकर होणार नाही. प्रत्येक गोष्टीची सरकारकडून अपेक्षा करणे शक्य नाही समाजाने सुध्दा ती जबाबदारी घ्यायला हवी. याबद्यल विद्यार्थ्यांनी समाजाला मार्गदर्शन करायला हवे. जनजागृती करायला हवी.

**प्रश्न** - कोविड काळात संपूर्ण जगाच्या पाठीचा आर्थिक कणा मोडल्यासारखा आहे, अशा वेळी सर्वात मोठी असलेली आपली शिक्षण संस्था स्वत:चे आर्थिक बजेट कसे सांभाळत आहे?

**उत्तर** - जे संस्थेच्या वेतनावर आहेत व ज्यांचे वेतन दहा हजाराच्या वर आहे त्यांचे टप्प्याटप्प्याने थोडेसे रिडक्शन केले आहे. मेडिकलच्या विद्यार्थ्यांकडे चौदा कोटीचा निधी थकीत आहे. सरकारकडूनही गेल्या काही वर्षांपासून शिष्यवृत्तीचे अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे बिकट परिस्थिती आहे. आता या नंतर काय होईल, हे सांगायला मी काही अर्थतज्ज्ञ नाही.

**प्रश्न** - कोविड काळात शिक्षणासंदर्भात केंद्र व राज्य सरकारच्या भूमिकेबाबत आपले मत काय आहे ?

**उत्तर** - कमीतकमी अंतिम वर्षाच्या परीक्षा व्हाव्यात या मताचा मी आहे. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत दिलेल्या निर्देशाचा मी आभारी आहे. शेवटी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा प्रश्न आहे. परीक्षा घेण्यात

(पान ६ वर)

कोरोना
विशेष मुलाखत

# मा. श्री. नरेशचंद्र ठाकरे

ज्येष्ठ उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती



**प्रश्न** - कोरोनाचा सर्वच क्षेत्रावर परिणाम झाला, यातून कोणतेही क्षेत्र सुटले नाही. शेतकरी व शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणामाबाबत आपण काय सांगू शकाल ?

**उत्तर** - एकूणच शेतकरी व शेतीक्षेत्रावर कोरोनाचा भरपूर परिणाम झाला आहे. शेतीची कामे करायला सरकारने परवानगी दिली पण भीतीयुक्त वातावरण तयार झाल्याने मजूर एकत्र यायला तयार नाहीत. मजूर नाहीत म्हणून शेतीची अनेक कामे रखडली. बाजारात विकण्यासाठी तयार असलेली फळे, भाजीपाला मजूर नाही आणि वाहतुकीची सोय नाही म्हणून जागीच सडला. सर्व कामे ठप्प झाली.

**प्रश्न** - कोरोनाचा सर्वाधिक फटका शेतीला बसला, इतर उद्योगापेक्षा शेती उद्योगाचे जास्त नुक्सान झाले, असे आपणास वाटते काय?

**उत्तर** - निश्चितच कारण शेतीचे उत्पादन असे आहे की ते अधिक काळ साठवून ठेवता येत नाही, याला काही उत्पादन अपवाद आहेत पण साठवणूक करण्याची क्षमता शेतकऱ्यांमध्ये उरली नाही आणि फळे, भाजीपाला, दूधदुभते हे असे उत्पादन आहे की ते लगेच बाजारात न्यावे लागते. पण बाजारपेठा आणि वाहतूक व्यवस्था बंद असल्याने हे सर्व उत्पादन सडले, वाया गेले आणि शेतकऱ्यांना प्रचंड फटका बसला.

**प्रश्न** - सरकारने या काळात कोणता दिलासा देणे आवश्यक होते?

**उत्तर** - सरकारने या काळात फळे, दुध, भाजीपाला यांच्या वाहतुकीची आणि विक्रीची व्यवस्था करायला पाहिजे होती. धान्य साठविण्याची तसेच कमी भावात खते व बीबियाणे मिळण्याची व्यवस्था करायला हवी होती.

**प्रश्न** - आपण शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हणतो. पण त्याच्या एकूणच अवस्थेला कोण जबाबदार आहे, असे आपणास वाटते ?

**उत्तर** - यावर उत्तर देणे तसे कठीणच आहे पण शेतकरी व सरकार दोघेही पन्नास पन्नास टक्के जबाबदार आहे, असे म्हणता येईल. शेतकऱ्याला नेहमी व्यवस्थेशी व निसर्गाशी जुळवून घ्यावे लागते म्हणून शेतकऱ्याने त्यादृष्टीने नियोजन करणे, आधुनिक पद्धती वापरणे आवश्यक असते. सरकार यासाठी जबाबदार आहे की, सिंचनाच्या ज्या सुविधा सरकारने सर्वत्र उपलब्ध करून द्यायला पाहिजे त्या अजून झाल्या नाहीत. अजूनही आपल्याकडे सिंचनाचा मोठा अनुशेष आहे.

**प्रश्न** - शेतकऱ्यांची दुरवस्था थांबविण्यासाठी कोणते उपाय आपण सुचवाल ?

**उत्तर** - शेतकऱ्यांना पाणी, वीज या सारख्या सुविधा सरकारने दिल्या पाहिजे. फळ उत्पादकांना कोल्ड स्टोरेज सारख्या सुविधा प्रत्येक तालुक्यात उपलब्ध झाल्या पाहिजे. त्याला दर्जेदार बियाणे व खते सरकारने उपलब्ध करून दिली पाहिजे. शेती हाच असा एक उद्योग आहे की जेथे उत्पादक स्वतःच्या उत्पादनाचा भाव ठरवू शकत नाही. उत्पादन खर्च प्रचंड वाढल्यामुळे शेतकऱ्यांना त्याच्या मालाचा योग्य मोबदला मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला त्याच्या मालाची किमत ठरवू दिली पाहिजे. बाजारपेठेत होणारी त्याची पिळवणूक थांबविण्यासाठी सरकारने कडक उपाय योजले पाहिजे, तरच जगाचा पोशिंदा सुखी होईल.

❖❖❖

## पत्रकार महत्वाचा

'मुंबईत एका वाहिनीच्या रिपोर्टरला व कॅमेरामनला कोरोनाची लागण झाल्याची बातमी येताच २७ एप्रिलपासून मुंबईचे आमचे रिपोर्टर रस्त्यावर उतरणार नाही असा निर्णय आम्ही घेतला. याचा अर्थ आम्ही बातम्या सोडल्या असे नाही तर रिपोर्टरचे जीव धोक्यात घालून टीआरपी वाढविणे व टिकवणे आम्हाला महत्वाचे वाटत नाही, आम्हाला सहकारी व पत्रकार महत्वाचा वाटतो.'

-निलेश खरे, संपादक 'साम टीव्ही'

(शिवाजी मीडिया वल्डच्या मुलाखतीतून साभार)





कोरोना
विशेष मुलाखत

# मा. श्री. दिलीपबाबू इंगोले

कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती



**प्रश्न** - कोरोना काळात क्रीडाक्षेत्रापुढे कोणती आव्हाने उभी झाली आहेत ?

**उत्तर** - कोरोना ही जागतिक समस्या असल्यामुळे त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रावर झालेला आहे. क्रीडाक्षेत्राचे त्यामुळे खूप नुकसान झाले आहे. कारण खेळाकरिता मैदाने उपलब्ध नाहीत. सामुहिक खेळ पूर्णपणे बंद झाले आहेत. सर्व स्पर्धा पुढे ढकलल्या त्यामुळे सराव बंद पडला. मैदाने, स्विमिंगपूल, जिम बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना सराव करता येत नाही. त्यांना सरळ मैदानात उतरवले तर अवघड जाईल. त्यामुळे त्यांचे खूप नुकसान झाले आहे.

**प्रश्न** - कोरोना काळानंतर क्रीडाक्षेत्राला चांगले दिवस यावे, यासाठी काही उपाययोजना सुचवाल काय ?

**उत्तर** - कोरोनाचा प्रभाव जाण्यासाठी अधिक वर्षे लागतील. कोरोना संपण्याची ठराविक वेळ कोणीच सांगू शकत नाही. पण हळूहळू विद्यार्थ्यांचा सराव वाढविण्याकडे कल राहील.

**प्रश्न** - कोविड काळात शिक्षणासंदर्भात केंद्र व राज्य सरकारच्या भूमिकेबाबत आपले काय मत आहे?

**उत्तर** - विद्यार्थ्यांबद्दल बोलायचे झाले तर शाळा, महाविद्यालये बंद असल्यामुळे त्यांना खूप अडचण जात आहे. त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. ऑनलाईन शिक्षणात खूप अडचणी आहेत. प्रत्येकाकडे साधने नाहीत. कनेक्टिव्हिटी नाही. ऑनलाईन शिकताना खूप अडचणी येत आहेत. शंभर टक्के विद्यार्थ्यांपर्यंत शाळा, महाविद्यालये पोहचू शकत नाहीत. शाळा-महाविद्यालये बंद असल्यामुळे विद्यार्थी खेळापासून तुटला आहे, त्यामुळे त्याच्यात स्थूलता निर्माण होत आहे. ऑनलाईन परीक्षा हा निर्णय विद्यार्थ्यांसाठी नुकसानदायक ठरेल. केंद्र व राज्य सरकार दोघांनाही विद्यार्थ्यांना कमी अडचणी येतील यासाठी मार्ग काढणे आवश्यक आहे.

**प्रश्न** - सुरक्षेच्या उपाय योजना लोक पाळत नाहीत, असे तुम्हाला वाटते काय ?

**उत्तर** - होय, बहुतांश लोक कोरोनाबाबत गंभीर दिसत नाही, त्याचा परिणाम संसर्ग वाढण्यात होत आहे. लोकांनी व्यक्तिगत काळजी घेण्यासोबतच सुरक्षेचे नियम पाळणे आवश्यक आहे. आपण दक्षता घेतली तरच कोरोनावर मात करू शकू.

**प्रश्न** - कोरोनामुळे खेळापेक्षा खेळाडूंचे जास्त नुकसान झाले, असे आपणास वाटते काय ?

**उत्तर** - होय, कारण सर्व खेळ खेळाडूंवर अवलंबून आहेत. चांगले खेळाडू तयार झाले नाही तर चांगला खेळ होणार नाही.

❖❖❖

(पान १ वरून)

## मा. श्री. हर्षवर्धन देशमुख

अडचणी खूप आहेत पण मार्ग काढणे महत्वाचे आहे. ग्रामीण भागात केंद्रे देता येतील. विद्यार्थ्यांने परीक्षेसाठी जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी येणे आवश्यक आहे, या मताचा मी नाही.

प्रश्न - डिजिटल शिक्षणाकडे आपण आता सहजपणे वळतोय, अशा वेळी ज्या लोकांना हे शिक्षण परवडणे शक्य नाही त्यांच्या बद्दल आपले मत काय आहे? सरकारने याबाबत काय करायला पाहिजे ?

उत्तर - याच्या शिवाय दुसरा मार्ग आपल्याकडे नाही. ज्या काही लोकांपर्यंत आपण पोहचू शकतो त्यांच्या पर्यंत डिजिटलच्या माध्यमाने पोहोचू. बाकींच्या साठी सुविधा उपलब्ध नाहीत त्याला आपण काही करू शकत नाही. समजा ग्रामीण भागात मोबाईलच्या माध्यमाने हे शिक्षण घ्यावला तयार असले तरी नेट कनेक्टिव्हिटीचा प्रश्न आहे. ही आपल्या यंत्रणेची समस्या आहे. हे निर्णय जे घेतात ते राजधानीच्या ठिकाणी बसून निर्णय घेतात, प्रत्यक्ष हा कार्यक्रम जेथे राबवायचा तिथे राबविण्यात काय अडचणी येऊ शकतात, याचा विचार ते करत नाहीत. प्रात्यक्षिक अडचणींचा योजना आखताना विचार हा झालाच पाहिजे.

---

(पान ५ वरून)

## डॉ. स्मिता देशमुख

विश्वास उडेल असे वाटत नाही. आज ऑनलाईन पद्धतीत अनेक अडचणी आहेत. कुणाजवळ मोबाईल नाही तर कुणाला नेट कनेक्टीव्हिटी नाही. त्यामुळे अडचणी निश्चित आहेत पण या अडचणींवर उपाय शोधून कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही, हा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

प्रश्न - शिक्षणक्षेत्राचे भविष्य तुम्ही वर्तवू शकता काय ?

उत्तर - माझ्या मते या काळात काही चांगल्या गोष्टी घडल्या आहेत. शिक्षण व्यवस्था ही समाज व निसर्गापासून वेगळी करता येणार नाही, हे दिसून आले. आपले वातावरण शुद्ध झाले. हिरवळ आली. पक्षी आले, स्वच्छता झाली. लोकांचे कौटुंबिक व मानसिक स्वास्थ्य देखील चांगले झाले आहे. दुसरीकडे लोकांच्या नोकऱ्या गेल्या, बेरोजगार वाढले, ही वाईट बाजू, असे असले तरी शिक्षणाचे जीवनातील महत्त्व हे प्रत्येकाला माहिती असल्यामुळे शिक्षणक्षेत्राला काही हानी नाही फरक इतकाच की काळानुसार शिक्षण पद्धतीत काही बदल होतील आणि ते सर्वांना स्वीकारावे लागतील.

प्रश्न - कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी काय संदेश द्याल?

उत्तर - आज कोसळलेले संकट हे काही स्थायी नाही ते जाणारच आहे. पण तो लवकर जावा म्हणून आपण स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे. या परिस्थितीने खंगून न जाता किंवा निराश न होता विद्यार्थ्यांनी नियमित व्यायाम करावा, वाचन करावे आणि सुखाचे क्षण शोधावे. आयुष्यातील सुखाचे लाईक मोजा, कुटुंबाचा एकोपा जपा, समाजाला या आजाराशी लढायला शिकवा. रोगप्रतिकारशक्ती वाढवा. खरे तर या महामारीने लोकांना स्वत:चा दर्जा दाखवून दिला आहे. निसर्गासमोर माणूस थिटा आहे, हे दिसून आले.

---

## कोरोना : पत्रकारिताही प्रभावित

कोरोनाच्या संकटाचा इतर क्षेत्राप्रमाणे पत्रकारितेवरही प्रभाव पडला असून त्याचा परिणाम सर्वत्र दिसत आहे. वृत्तपत्रांचा खप कमी झाला आहे. वृत्तपत्रे व वाहिन्यांच्या जाहिराती कमी झाल्या आहेत. माध्यम क्षेत्राला मोठा आर्थिक फटका बसल्याने अनेक इंग्रजी दैनिकांच्या आवृत्त्या बंद पडत आहेत. याचा अर्थ वर्तमानपत्र संपतील असा नाही. वर्तमानपत्राची ताकद ही सर्वकालीक आहे. तंत्रज्ञानाने पत्रकारितेत अफलातून बदल आणले आहेत. या तंत्राने सर्वसामान्यांना व्यक्त करण्याचे अधिकार दिले असून लोकशाही सुदृढ करण्याचे सामर्थ्य या तंत्रात आहे. त्यामुळे पुढचा काळ हा तुमच्या आमच्या क्षमतांचा कस बघणारा काळ आहे.

- महेश म्हात्रे, संपादक न्यू १८ लोकमत.
(शिवाजी मीडिया क्लबच्या मुलाखतीतून साभार)





- कोरोना आणि वाढती बेरोजगारी
- कोरोना आणि बेरोजगारी
- लॉकडाऊन मधील हात मजुरांची कैफियत
- कर्माचा हिशेब आणि निसर्ग
- गावगाड्यातील कोरोना
- कोरोना आणि पर्यावरण
- कोरोना काळातील ग्रामीण भाग
- रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा, कर्मकांड
- कोरोना काळातील विवाह....
- कोरोना : भ्रम, संभ्रम आणि राजकारण
- कोरोना आणि सध्यस्थिती
- मोबाईल मी आणू-तरी कुठून
- कोरोनाचे पडसाद / परिणाम
- लॉकडाऊनची सकारात्मकता

# मराठी विभाग

- सावधान... शेवटी कोरोना हरलाच
- कोरोना आणि राजकारण
- मी पोलिस बोलतोय
- कोरोना-समज गैरसमज
- अफवेच्या बाजारात देशाची करुणावस्था
- कोरोना-निदान आणि उपचार
- कोरोना आणि लग्न
- कोरोना आणि मानवी संवेदना
- मुलाखत-कोरोनाशी लढलेल्या तरुणाची
- कोरोना आणि युवा पिढी
- वऱ्हाड हा कोरोनाचा मोठा स्पॉट
- 'अपुनच अपना भगवान है !'
- कोरोना-समज गैरसमज

# कोरोना आणि वाढती बेरोजगारी

■ कु. प्रियंका ज्ञानेश्वरराव फाले
एम.ए.भाग-२ (राज्यशास्त्र)



कोरोना व्हायरस विषयी संत ज्ञानेश्वरांनी ७०० वर्षा पूर्वी केलेली भविष्यवाणी.... ज्ञानेश्वरी या ग्रंथातील ओवी...

युद्धाकारण पृथ्वी वरती । विषवायू पसरेल,
असंख्य जी ते विषवायूने। प्राणासी मुकतील,
शुद्धकारणे पृथ्वीवरती। प्रदूषण फैलावेल अनेक दराके
या परिणाम। मानव त्रासावेल,
रोगी-खुजी निकृष्ट अशी। प्रजोत्पति होईल,
पृथ्वीवरचे व्यवहार सारे। पहा बंद पडतील।

बघता बघता हीच परिस्थिती माणसांवर आलेली आहे. कारण जनता खूप निवांतपणे जगत होती परंतु आज जिकडे तिकडे अशी परिस्थिती पसरली आहे. अशाप्रकारे प्रत्येक परिस्थितीचा सामना करण्यासाठी माणसाकडे हिम्मत पाहिजे. या कोरोणामुळे जगात अधिकच महागाईने थैमान पातले आहे. कोरोनामुळे रोजगार हिरावला देशातील बेरोजगारीत प्रचंड वाढ झाली. कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी देशात लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली. त्यामुळे बहुतांश उद्योगधंदे बंद असून त्याचा विपरित परिणाम रोजगार निर्मितीवर झाला. कोरोनामुळे शहरी भागातील अनेक लोकांचा उदरनिर्वाह हा छोटे छोटे दुकान भाजीवाला फळविक्रेता यांच्यापासून हिरावून टाकले. या लाकडाऊनमुळे सगळ बंद असल्यामुळे त्यांना घरिच रहावे लागत असे.

लॉकडाऊनचा परिणाम पुढीलप्रमाणे : लॉकडाऊनमुळे बहुतांश उद्योगधंदे बंद असून त्याचा विपरित परिणाम रोजगार निर्मितीवर झाला आहे.

मार्च महिन्याचा विचार केल्यास या एका महिन्यात देशातील बेरोजगारीचा दर गेल्या ४३ महिन्यातील सर्वोच्च पातळीवर पोहोचला आहे.

सीएमआयईच्या आकडेवारीनुसार लॉकडाऊन दरम्यान देशातील एकूण बेरोजगारीचा दर वाढून २३.४% पर्यंत पोहोचला.

भारतात मजूरी करणारे आणि दैनंदिन कमाई करणाऱ्या कामगारांना लॉकडाऊनची मोठी झळ बसल्याने सीएम-आईन म्हटले आहे. मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात केंद्र सरकारने कोरोना रोखण्यासाठी देशव्यापी टाळेबंदी घोषित केली. या टाळेबंदिला दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली असून ती १७ मेपर्यंत कायम राहिली. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात काही सवलत देण्यात आली. मात्र या टाळेबंदित उद्योगधंदे पूर्णत: बंद होते. औद्योगिक वसाहती ओस पडल्या त्यामुळे संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांची परवड झाली. लाखो कामगार विविध राज्यांमध्ये अडकून पडले हातची नोकरी गेली. आणि दोन वेळच्या खाण्याचे हजारो कामगारांचे हाल झाले. दरम्यान भारतात असंघटित क्षेत्रातील पाठोपाठ आता कॉर्पोरेट आणि स्टार्टअप छोटे मोठे उद्योग यांनीही नोकर कपातीचे संकेत दिलेआहेत.

अशाप्रकारे मार्च २०२० पासून देशात बेरोजगारीचा जणु तांडवच केला आहे. अशा प्रकारे कोविड-१९ या भयानक महामारीमुळे जगाची आर्थिक स्थिती मोठ्या प्रमाणावर मंदावली आहे.

एक छोटाशा संवाद कोरोनाशी पुढीलप्रमाणे :

''या कोरोनानं संपूर्ण जग हैरावून गेलं
मोठ्या लोकांचे मोठेपण विसरून गेलं
जेव्हा पुन्हा एकदा घरात कुटूंब तयार झालं
तेव्हा लक्षात आलं कुटूंबावर प्रेम करण राहूनच गेलं
कोरोना आला आणि देशांसाठी कोणी ५ कोटी दिले
तर कोणी ६० कोटी दिले. पोलिस, डॉक्टर, नर्स यांनी आपले आयुष्य दिले. तेव्हा लक्षात आलं खर कौतूक करण मात्र राहूनच गेल...'' कोरोनामुळे सगळेच घरात बसतायंत गोर-गरिब उपाशी पोटि मरतायं... त्याचंही जगणं अस्वस्थ होऊन बसलयं तेव्हा समजलं खरी काळजी करणं तर राहूनच गेलं.

आता तरी भान ठेवा, डॉक्टर, नर्स, पोलिस, सरकार, गोर-गरीब यांच्यासाठी खूप काही करायचं होतं पण स्वत:च्या स्वार्थात एवढा गुंतलो कि मदत करण मात्र राहूनच गेलं... राहूनच गेलं....

# कोरोना आणि बेरोजगारी

■ कु. शिवाणी किरणराव इंगळे
एम.ए.भाग-२ (राज्यशास्त्र)

संत सावता माळी यांनी त्यांच्या एका अभंगात म्हटले आहे की,

''समदासी सादर व्हावे,
देव टेदील तैसेची राहावे''

बघता बघता हिच परिस्थिती माणसांवर आलेली आहे. कारण जनता खुप निवांतपणे जगत होती. परंतु आज जिकडे तिकडे अशी परिस्थिती उद्भवली आहे की ज्यामुळे माणुस माणसापासून दूर पळत आहे. जणु मरणाच्या दारात प्रत्येकजण उभा आहे आणि अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी माणसाकडे हिम्मत ही उरलेली नाही आणि इतकी भितिदायक, त्रासदायक परिस्थिती म्हणजे कोविड-१९ (कोरोना)




जगात आधिच महागाईने थैमान घातले होते, परंतु हे थैमान, माणुस सहन करत होता परंतु कोरोनामुळे घराबाहेर निघणं सुद्धा धोक्याचं आहे. इथे प्रत्येकजण हा मेहनतीने कमावतो आणि स्वत:चा कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतो. कोरोनामुळे मात्र प्रत्येकजण आपआपल्या घरात आहे. त्यामुळे कमाईचे साधनच जणु बंद झालेले आहे. अशा कारणांमुळे जगात बेरोजगारी वाढली आहे.

कोरोनामुळे रोजगार हिरावला, देशातील बेरोजगारीत प्रचंड वाढ झाली. कारण कोरोना या दानवाने जगता पाऊल टाकल्यामुळे बहुतांश उदयोगधंदे बंद पडले. मोठमोठे औदयोगिक क्षेत्र खंडित झाले ज्यामुळे रोजगाराचा तोंडचा घास हिसकावला गेल्यामुळे त्याचा परिणाम रोजगारनिर्मितीवर झाला आहे. कारण जसे सरकारच्या लक्षात आले की कोविड-१९ हा संसर्गजन्य आजार आहे. ज्यामुळे गर्दिची ठिकाणे बंद ठेवणे हाच एकमेव उपाय आहे. त्यामुळे मा.पंतप्रधान मोदी यांनी लॉकडाऊनची घोषणा केली. ज्यामुळे संपूर्ण जनतेवर याचा परिणाम झाला.

लॉकडाऊनचा परिणाम पुढिलप्रमाणे -

* लॉकडाऊनमुळे बहुतांश उदयोगधंदे बंद असून त्याचा विपरित परिणाम रोजगारनिर्मितीवर झाला आहे.

* मार्च महिन्याचा विचार केल्यास या एका महिन्यात देशातील बेरोजगारीचा दर गेल्या ४३ महिन्यातील सर्वोच्च पातळीवर पोहोचला आहे.

* सीएमआयईच्या आकडेवारीनुसार लॉकडाऊन दरम्यान देशातील एकुण बेरोजगारीचा दर वाढुन २३.४% पर्यंत पोहोचला.

जगात थैमान घातलेल्या कोरोनाचा फैलाव रोकण्यासाठी लॉकडाऊन करण्यात आले. ज्यामुळे सर्वात मोठा परिणाम हा रोजगार निर्मितीवर झाला. लॉकडाऊनंतर देशातील बेरोजगारी वाढुन २३ टक्के झाली आहे तर शहरी भागात बेरोजगारीचा दर ३% टक्यापर्यंत पोहोचला आहे.





सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी (CMIE) च्या एका अहवालानूसार हि बाब समोर आली आहे. मार्च महिन्याचा विचार केल्यास या एका महिन्यात देशातील बेरोजगारीचा दर गेल्या ४३ महिन्यातील सर्वोच्च पातळीवर पोहोचला आहे.

सीएमआईच्या अहवालानूसार मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देशातील रोजगारांची अवस्था खुपच विकट होऊ लागली. त्यानंतर महिन्याच्या अखेरीस परिस्थिती फार बिघडली सीएमआयई हि एक खासगी संस्था असून या संस्थेच्या आकडेवारीनुसार जगातील रोजगार निर्मितीची अवस्था अधिक बिकट झाली.

सीएमआयईच्या आकडेवारीनुसार लॉकडाऊन दरम्यान देशातील एकुण बेरोजगारीचा दर वाढुन २३.४ टक्क्यापर्यंत पोहोचला तर शहरी भागातील बेरोजगारीचा दर वाढून ३०.९ टक्क्यापर्यंत पोहोचला या अहवालानूसार संपूर्ण मार्च महिन्याचा विचार केल्यास या महिन्यात बेरोजगारीचा दर ८.७ टक्के होता.

अशा प्रकारे मार्च २०२० पासून देशात बेरोजगारीचा जणु तांडवच केला आहे. अशा प्रकारे कोविड-१९ या भयानक महामारीमुळे जगाची आर्थिक स्थिती अत्यंत मोठ्या प्रमाणावर मंदावली आहे.

एका छोटाशा संवाद कोरोनाशी पुढीलप्रमाणे -

हसत खेळत जगत होता मानव
कसा रे आला हा जगात कोरोना दानव.
पैसा पैसा करता मानव झाला अभिमानी
कोरोना लॉकडाऊनची केली रोजगाराची मानहानी
वेळ नव्हता कधी बोलण्यास ऐकमेकांशी
आज झुरतो मनात माणुस भेटण्या कोणाकोणाशी
हिसकवली कोरोनाने भाकरी गरिबांची
घेतलीस परीक्षा त्याने रोजगारांच्या काळजाची
जरी आला तु बनून दानव या जगात
मावा मात्र जागवली माणसाची माणसाच्या मनात.
डॉक्टर पोलिस सांगतो, कोरोना आहे जीवघेणा
विनंती आपणा सर्वांना, सुरक्षित घरात राहाण्या
दिलिस रे करुन जाणिव माणसाला माणसाची
परत जा आता निघुन, वाढु दे पुन्हा शान भारताची
वाढू दे पुन्हा ज्ञान भारताचे...

# लॉकडाऊन मधील हात मजुरांची कैफियत

■ सुमित भास्करराव रिठे
बी.ए. भाग-१

अचानक लॉकडाऊन झाला देश बंद पडला. कारखानदारांनी मजूरांना हाकलून दिले आणि जीवन मरणाच्या दारात आमचे जगणे भरडून गेले.


पाणी विकणाऱ्या रिक्षाचालकांची अमरावतीत उपासमार

घरातल्या सोबत वेळ घालवायला मिळत नाही म्हणून सुट्टीचा आनंद घेत असलेला एक घटक. आणि शेवटचा श्वास तरी स्वत:च्या घरात घेता यावा म्हणून हजारो मैलांचा प्रवास पायदळ करत असलेला एक समाज. घरी बसून नवं नवीन पदार्थ बनवून खाणारा समाजातील एक घटक. आणि काम नाही मिळालं तर रात्री अन्न बघायला मिळेल का नाही म्हणून तळमळीने वाट पाहत असलेला एक घटक. समाजातील एक घटक जो घरी बसून फक्त वाढलेल्या रूग्णांचे आकडे बघतोय, घरी बसून वजन वाढतेय म्हणून तक्रार दाखल करतोय. आणि समाजातील एक तो घटक जो १०x१० च्या खोलीत पुर्ण परिवारासोबत राहतोय. मदत मिळाली तरच पोट भरेल म्हणून शासनाच्या मदतीची वाट बघतोय. ठरतोय समाजातील एका घटकासाठी हा आनंद..पण जीव मात्र घेतोय हा गोरगरिबांचा.

# कर्माचा हिशेब आणि निसर्ग

■ सर्वेश मनिषा विनोद मराठे
एम.ए. (जेएमसी) भाग-१



छत्रीतलावात पक्ष्यांचा मुक्त संचार

१९७२ साली पर्यावरणाविषयी प्रथमच जनजागृती करण्याची मोहीम आखली गेली. म्हणजेच काय तर त्याच वर्षात जगातला पहिला वहिला पर्यावरण दिन साजरा केला. युएन जनरल असेम्बली १९७२ च्या पहिला सत्रात स्कॉटहोम कॉन्फरंस ऑन द ह्युमेन इन्व्हॉरमेंट असे जाहिर करण्यात आले. सांगण्याचे तात्पर्य इतकेच १९७२ साली जर मानवाला पर्यावरणाचे महत्व उमगले होते तर २०२० सालापर्यंत ते विर्घळले कुठे? सद्य परिस्थिती पाहाता प्रत्येक व्यक्ती किबोर्ड कंझरवेशनिस्ट होऊ पाहतोय, म्हणजेच जे लोक केवळ चार भिंतींच्या आत खुर्चित बसुन डिजीटल मिडीयाच्या माध्यमातून जगा समोर पर्यावरणाचे महत्त्व आणि महात्म्य अशाच लोकांना किबोर्ड कंझरवेशनिस्ट म्हणावे असे वाटते. केवळ तितकेच करणे पुरेसे आहे काय हा प्रश्न स्वत:ला कधी विचारलाच नाही. म्हणूनच कदाचित सर्व सामान्यांनी पर्यावरणांविषयी दुर्लक्ष केल्या कारणाने आजचा दिवस आपल्या समोर अगदी तटस्थ उभा आहे. याला सामोरे जायचे तरी कसे हा सवाल सगळ्यांच्या मनात रेंगाळतोय. याच काळात कोरोना उद्भवल्याने पर्यावरणाचा नवा चेहरा समोर आला. निसर्ग पुन्हा नव्याने बहरू लागला असे वाटायला लागले. पण हे सगळे जर तसेच टेवायचे असेल तर आपण निसर्गाबाबत निश्चित विचार करावा लागेल.

या संपूर्ण सिनारियोमध्ये हे सगळे आताच का? असा सवाल प्रत्येक मनाला आणि बुद्धीला पडायला हवा पण तो पडतांना दिसतच नाही कारण याचं उत्तर अगदीच सोप आहे. सगळेच जणु निवांत आपल्या घरी बसले आहेत. खुर्ची गरम करण्यासोबत सोशल मीडियावर विरोध करायचा स्टेटस आणि पोस्ट शेअर करायच्या आणि बुद्धीजीवी म्हणून घ्यायचा आनंद लूटायचा आणि दस दिवस संपला. मी या सगळ्यांना एकच विनंती करू इच्छितो किमान एकदा तरी आपल्या प्रिय देशाच्या ग्रीन बॉर्डर सोबत फिल्डवर जाऊन बघा तेही रोज.

हे बॉर्डर दररोज हेच काम करतात. निसर्गाला त्रास देणाऱ्या अशा सो कोल्ड सुशिक्षित मुर्खांना विरोध करत असतांना त्यांना लढा देत असतात. जगामध्ये रोज निसर्गाप्रती आणि वन्यजीव प्रती अगदी क्रूर घटना घडत असतात. पण त्याचा कुणालाही फरक पडत नाही.

काही दिवसांपूर्वी आपण अशीच एक बातमी ऐकली ज्यामध्ये एका गर्भाशी हत्तीनीला विस्फोट युक्त फळे खायला घातल्यामुळे तीचा मृत्यू झाला. या घटनेचा विरोध साऱ्या जगाने नोंदविला. सोशल मीडिया, न्यूज पेपर, मॅगझीन असे कुठलही प्लॅटफॉर्म सुटले नाही जिथे याची नोंद केली गेली नाही. अशा असंख्य मुक्या जनावरांचा बळी आपण घेतला आहे. हे सगळ सांगण्याकरिता मी वन्यजीव तज्ञ असण्याची गरज मला भासत नाही आणि हे सांगत असतांना मी शाकाहारी किंवा मासाहारी असाव या विषयाला हात घालतच नाही. इच्छा ऐवढीच लोकांना प्रामाणिक मताने पर्यावरण विरोधी कृत्यांचा विरोध करुन भेट फिल्ड वर जाऊन त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. या सर्व कीबोर्ड कन्झर्व्हेनिसट ला एकच सांगेल don't just make the statement,'show your commitment.

राहिला प्रश्न आपल्या पर्यावरणाचा वर परिस्थिती आपल्याला निसर्गाचे थेट व वास्तव दर्शन देतेच आहे आणि त्यातून काय शिकाव हा ज्याचा त्याचा प्रश्न, कारण उद्या जर आपल्या प्रिय पृथ्वीच काही कमी जास्त झाला तर त्याचा निसर्गावर फार कमी प्रभाव पडेल, फरक पडेल तो केवळ मानवावर. आपण कितीही तंत्रज्ञान निर्माण केले तरिही निसर्गाला आपली पात्रता सिद्ध करायला काही क्षण पुरेसे आहे. केवळ बाऊ बाऊ करुन चालणार नाही आपल्याला sustainable development चा मार्ग शोधावाच लागेल. त्याखेरिज आपल्या जवळ पर्याय उरलाच नाही.

प्रकृते : क्रियमाणानि गुणे : कर्माणि सर्वश: ।
अहंकार विमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ।।३-२६।।

श्रीमद भगवत गीतेतील हा श्लोक असे सांगतो की प्रत्येक कार्याचे मुख्य नियंत्रण हे निसर्गाकडे असते निसर्ग प्रत्येकाचा पालनहार आहे. आणि नाण्याची दुसरी बाजू अशी की श्लोक असेही सांगतो कि, निसर्गाचे नुकसान केल्याने त्याचा नियमित क्रियाकलापांवर परिणाम होतो. ज्याचे पडसाद मानवी जिवनावर देखील पडतात. श्लोक गर्विष्ट लोकांना इशारा देखील देतो की जे निसर्गाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवत नाही त्यांचे कधीही कल्याण होत नाही. कर्माचा हिशेब हा निसर्ग दालनात कायम होत असतो.





# गावगाड्यातील कोरोना

■ अनामिका प्रकाश सोनोने
एम.ए. (जर्नालिझम ॲंड मास कॉम)



कोरोनाच्या प्रादुर्भाव झाल्यानंतर देशात लॉकडाऊन घोषित करण्यात आले. शिवाय संचारबंदी लागू करण्यात आली. संपूर्ण देशात कोरोनाने हाहाकार माजवला. त्याचा परिणाम गाव खेड्यावरही झाला.

कोरोनाचा प्रसार कमी व्हावा यासाठी सरकारद्वारे देशात लॉकडाऊन घोषित केले. राज्य सरकारने देखील वेळोवेळी सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला. काहीच दिवसांनी या भयावह संसर्गजन्य आजाराने जिल्ह्याला घेरले. त्यानंतर राज्य सरकारच्या पाऊलावर पाऊल ठेवून जिल्हा प्रशासनानेही लॉकडाऊनच्या नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी केली. जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर गावातही कोरोना बाधित आढळून आलेत. त्यामुळे खबरदारीच्या दृष्टीने नगरपंचायतीसह आरोग्य व ग्रामपंचायत पातळीवर विविध उपाययोजना राबविण्यात आल्या. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस कर्मचारीही जनजागृती करण्याचे कार्य जबाबदारीने करत होते. प्रशासनातर्फे जनतेला लॉकडाऊनचे पालन करण्याचे आवाहन, जनजागृती, विनाकारण बाहेर पडणाऱ्यांवर लक्ष ठेवणे अशा विविध पातळ्यांवर प्रयत्न केले. कोरोना काळात गावात एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये म्हणून जीवनावश्यक वस्तूंची दुकाने उघडी ठेवण्याची वेळ मर्यादित करण्यात आली. पण वेळेची मर्यादा आखून दिल्यामूळे लोकांना गर्दी करणे भाग पडले. (वास्तवत: गरजेच्या वस्तूंची दुकाने जर किमान १० ते १२ तास उघडी ठेवली असती तर लोकांना सुरक्षित अंतर ठेवून केव्हाही खरेदी करणे जास्त संयुक्तिक ठरले असते. गावात किराणा, अन्न-धान्य यासारख्या जीवनावश्यक वस्तूंची चणचण निर्माण झाली. दुकानदार लोकांमध्ये वस्तू विकण्यास टाळाटाळ करू लागले, शिवाय दुकानदार आहे त्या पेक्षा दुप्पटच्या किमतीने वस्तू विकू लागले होते. त्यामुळे गावातील लोकांची आर्थिक पिळवणूक करण्यात आली. कोरोना संकटात पोट भरण्यासाठी पुरेसे अन्न उपलब्ध नसल्याने कितीतरी लोकांवर उपासमारीची वेळ आली.

कोरोना काळात हातावरचे पोट असणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांचे मोठे हाल झाले, होत आहे हि वस्तुस्थिती आहे. हातावरती पोट असलेली माणसे जगण्यासाठी संघर्ष करत होती. गावगाड्यात रस्त्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे छोटे छोटे व्यवसाय करणारे रस्त्यावर आले. कोरोना संकटाचा प्रचंड परिणाम रोजगारावर झाला. गावालगतच असलेल्या कारखान्यात काम करणाऱ्या कितीतरी लोकांना कामावरून वगळ्यात आले. शिवाय त्यांना वेतनही दिले नाही. अनेकांना रोजगार गमवावे लागले. त्यामुळे गावातील नोकरीधंदा करणाऱ्यांची वाटचाल बेरोजगारीकडे झाली. त्यांच्यावर दोन वेळेच्या जेवणाचीही भ्रांती पडली. कोरोनाच्या कठीण काळात लघु व गृह उद्योग बंद पडले आणि जनजीवन ठप्प झाले. या काळात अनेक लहान-मोठे उद्योगधंदे रसातळाला गेले. देशी उद्योगही ठप्प पडले.

कोरोना काळाचा कृषी क्षेत्रालाही मोठा फटका बसून बळीराजा भरडला गेला. देश लॉकडाऊन झाल्यानंतर शेतकऱ्यांची शेतमाल विकण्याची परंपरागत साखळी विस्कळीत झाली. त्यांच्यापुढे मालविक्रीचे मोठे संकट निर्माण झाले. वाहतूक ठप्प असल्याने शेतीतला माल शेतीतच कुजू लागला. परिणामत: भाजीपाला आणि फळे अक्षरक्ष: शेताच्या बांधावर आणि रस्त्यावर फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होऊन त्यांना आर्थिक फटका बसला. शेतीला पूरक ठरणारे जोडधंदेही शेतकऱ्यांच्या मुळावर उठले. कुक्कुटपालन सारख्या उद्योगाचे कोरोना काळात मोठे आर्थिक नुकसान झाले. याच काळात दुधाची मागणी कमी झाली. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या नशिबीही तसेच भोग आले. भाजीपाला, फळभाज्या उत्पादकांनाही फटका सोसावा लागला. कोरोना काळात गावातील सर्व व्यापारी प्रतिष्ठाने बंद झाली. जवळपास अडीच महिन्यांच्या या काळात सर्व प्रतिष्ठाने बंद असल्याने व्यासायिकांसमोरही अडचणी निर्माण झाल्या.

लॉकडाऊन झाल्यानंतर आर्थिक कामकाजही ठप्प पडले. यामुळे स्थलांतरित मजूर गावात परतले, रोजगारासाठी शहराकडे गेलेल्या लोकांनी आपल्या रोजगाराची व्यवस्था करणारे शहर सोडून गेलेली मजूर पुन्हा गावात परतले. कामाच्या शोधात ठाणे, मुंबईत गेलेली मजूर मंडळी गावात परतली. अगदी मिळेल त्या वाहनातून ते गावात दाखल झाले. कोरोनाच्या विळाख्यामुळे कामगार व मजुरांवर हि स्थिती आली. कोरोनाचे संकट गडद असताना रेड झोनमधील शहरवासीय गावात दाखल झाले. यामुळे गावावर कोरोनाचे सावट निर्माण झाले. हि मंडळी सोबत कोरोना घेऊन आली. या कोरोना वाहक मंडळीमुळे गावात कोरोनाची भीती निर्माण झाली. त्यांच्यामुळे गाव बाधित होऊन सामाजिक आरोग्य धोक्यात आलं.

कोरोना काळात गावातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. नवे शैक्षणिक वर्ष सुरू झाले मात्र शाळा अजूनही बंद आहे. अशा परिस्थितीत मुलांचे शिक्षण सुरू रहावे म्हणून डिजिटल आणि ऑनलाईन शिक्षणाची संकल्पना आमच्या पुढे मांडण्यात आली. संकल्पना चांगली असली तरी गावातील विद्यार्थ्यांना मात्र याचा फार उपयोग झाला नाही. प्रत्यक्ष वर्गात जाणे अन ऑनलाईन शिक्षण घेणे यात मोठी तफावत आहे. प्रत्येक पालकांकडे ती सोय नाही. ग्रामीण भागात हि व्यवस्था चांगल्या पद्धतीने कार्य करीत नाही. अशावेळी गावातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षणाची संकल्पना फोल ठरते. तरीही काही खासगी शाळांनी ऑनलाईन वर्ग घेणे सुरू केले आहे. ज्या विद्यार्थ्यांना लाभ मिळतो त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होतोय, मात्र जे विद्यार्थी अद्यापही या लाभापासून वंचित आहे. त्यांनी काय करायचे? शिवाय महामारीत पालकही आर्थिक विळख्यात सापडलेले आहे. त्यामुळे आजच्या परिस्थितीत ऑनलाईन शिक्षणासाठी लागणाऱ्या सोयी उपलब्ध करून देणे पालकांना जड जात आहे आणि ज्या विद्यार्थ्यांकडे हि सोयच उपलब्ध नसेल त्यांना ऑनलाईन शिक्षण पचनी कसे पडेल.

आज महामारीने गावाला वेढा घातला आहे. कोरोनामुळे ग्रामीण जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे. महामारीचे गांभीर्य लक्षात घेता आपल्याच जवळच्या नात्यातील मृत व्यक्तीच्या अंत्यविधीला जात येने अशक्य झाले. राजरोसपणे समाजात वावरणारी लोक आता तोंडाला मास्क लावून वावरू लागले. सॅनिटायझर, मास्क या अत्यंत कमी वापरल्या जाणाऱ्या गोष्टी जीवनाचा महत्वपूर्ण भाग बनल्या. कोरोना काळात अनेकांनी सामाजिक बांधिलकी जोपासत गरजूंना अन्न, धान्य व जीवनावश्यक वस्तू देऊन मदत केली. शहराकडून गावाकडे परत जाणाऱ्या मजूर मंडळींच्या मदतीसाठी लोकांनी गावात जागोजागी पाणी, अन्न आणि फळांचे ठेले लावून मोफत व निस्वार्थ सेवा पुरवली.

## कोरोना आणि पर्यावरण


कोरोना काळात टिपलेली माणसे व पशुतील मानवता

■ ऋषभ मुंदे
एम.ए. जेएमसी-१

कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे मानवी जीवनावर खुप परिणाम झाला आहे. सरकारने लावलेल्या लॉक डाऊन मुळे कारखाने बंद झाले आहे. तसेच वाहनाचा वापर मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. त्यामुळे पर्यावरणावर याचा सकारात्मक परिणाम झालेला आपल्याला दिसून येत आहे.

निरभ्र आकाश, स्वच्छ हवा आणि पाणी, स्वच्छंद पणे उडणारे पक्षी व फिरणारे प्राणी आपल्याला दिसून येत आहे. दिल्ली, मुंबई यासारख्या शहरामध्ये प्रदूषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. २५ वर्षात पहिल्यांदाच पंजाबमधील जलंदर या शहरातून १४० किमी. दूर असलेल्या हिमालयाचे टोक पाहायला मिळत आहे. हेच पर्यावरणात झालेल्या बदलाचे मोठे उदाहरण आहे. दिल्लीतील यमुना नदी, वाराणसीतील गंगा नदी व देशातील सर्वच नद्यांमधील कमी झालेले प्रदूषणाचे प्रमाण आपल्याला आढळून येत आहे. पवित्र अश्या गंगा नदीच्या पाण्यात ४० ते ५० टक्क्यांनी सुधार झाला आहे असे काही तज्ञाचे मत आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात देशातील बऱ्याच शहरात वायू गुणवत्ता या काळात सुधारली आहे असे म्हटले आहे. मात्र कोरोना काळ व लॉक डाऊन संपल्यानंतर हवा आणि पाण्याच्या प्रदूषणाची वाढ रोखण्याची आणि त्या सकारात्मक परिणामाची दीर्घकालीन उपाय करण्याची गरज आहे व पर्यावरण बाबत अजून जागरूकता आणि पर्यावरण वाचवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.





## कोरोना काळातील ग्रामीण भाग

■ मोहित सुरेशराव बदुकले
बी.ए. जेएमसी-३


लपुन छपून पानटपरी.

कोरोना या महामारीच्या संकटात जगातील अनेक क्षेत्रे नाजूक स्थितीतून जात आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात तर ही स्थिती गंभीर आहे. त्यात ग्रामीण भागातील स्थिती आणखीनच वाईट झाली आहे. संसाधनांचा अभाव, अपुऱ्या रोजगाराच्या संधी यामुळे त्रस्त असलेले लोक, अश्याच परिस्थिती तून जाणारे माझे गाव चांदुर बाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा जवळपास ४० ते ४५ हजार गावची लोकसंख्या गाव मोठे असल्यामुळे गावातील चौक, आठवडी बाजार ही गर्दीची ठिकाणे. एवढे मोठे गाव असून गावात जून महिन्यापर्यंत एकही रूग्ण नव्हता. जुलै मध्ये पहिला रूग्ण आढळला, त्यानंतर गावातील प्रशासन जागे झाले, गावातील विविध भागात जंतू कीटक नाशकांची फवारणी करण्यात आली, लोकांना घरीच राहण्याचे व महत्वाच्या कामासाठीच बाहेर निघण्यास सांगण्यात आले.

मात्र गोकुळ अष्टमी, पोळा या सणासुदीच्या काळात गावातील लोक मोठ्या प्रमाणात बाजारात येऊ लागले. काही भजन मंडळी भजन कीर्तन करण्यासाठी बाहेर गावी जाऊ लागली. गावातील लोक कोरोना या महामारीकडे दुर्लक्ष करत होती.

मात्र काही दिवसानंतर एकाच दिवशी गावात २२ कोरोना रुग्ण निघाले गाव जिल्ह्यातील कोरोना हॉट स्पॉट बनले, त्यानंतर तातडीने मोठ्या प्रमाणात लोकांच्या चाचण्या घेण्यात आल्या. लोक आता सावधान झाले. ग्रामीण भाग असल्यामुळे गावातील लोकांमध्ये आपल्या आरोग्यप्रती फारसी काळजी दिसत नाही, या काळात गावात अनेक अफवा पण पसरल्या.

उदा. १) प्रत्येक कोरोना रुग्णांमध्ये डॉक्टर ला दीड लाख मिळतात.
२) कोरोना वैगरे काही नाही हा माध्यमानीच पसरविला आहे.

तरी पण गावातील एक मोठा वर्ग हा सावधान आहे, आरोग्य यंत्रणा ही तर आपल्या देशातील अतिशय चिंतेची बाब आहे. त्यात ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेची फारच वाईट परिस्थिती आहे.

उदा. - गावातील २२ कोरोना रूग्णांना एकाच रुग्णवाहिकेमध्ये अमरावतीला घेऊन जाण्याचा प्रकार माझ्या गावात घडला. त्यानंतर प्रशासनाने दखल घेतली आता गावातील स्थिति नियंत्रणात आलेली आहे. आरोग्यासोबत ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारित मात्र मागील दिवसात झालेली गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे पिकांचे नुकसान झाले. परिणामता शेतीवर आधारित मजुरी रोजगार कमी आले. यावर्षी अवकाळी पाऊस व गारपिटीने कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे गावातील शेतकरी वर्गाचे व या वर्गावर अवलंबून असलेल्या मजूर वर्गाचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

कोरोना महामारीच्या संकटात शिक्षण क्षेत्राला मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. गावातील शाळा, महाविद्यालये, अंगणवाड्या या सर्व बंद आहेत. त्यामुळे मुले अभ्यापासून दुरावलेली आहेत. सुरूवातीला काही दिवस बरे वाटले मात्र आता गावातील विद्यार्थी शाळा सुरू होण्याची वाट पाहत आहे.

गावातील श्री बालमुकुंद राठी विद्यालयाचे, मुख्याध्यापक श्री. सतिश सुरडकर व त्यांचे सहकारी शिक्षक श्री. बालकिसन हेडा यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी असे सांगितले, शाळा जरी बंद आहे तरी आम्ही विद्यार्थ्यांच्या संपर्कात आहोत शिवाय मुलांचे ऑनलाईन पद्धतीने नियमित वर्ग सुद्धा घेत असतो, मात्र ग्रामीण भागातील सर्वच मुलांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे सर्व मुले ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेऊ शकत नाही त्यावर त्यांनी उपाय काढून प्रत्येकी ५-५ मुलांचे समूह तयार केले व समूहात मुले शिक्षत आहेत तसेच त्यांनी असे सांगितले की, विविध विषयांचे शिक्षक हे मुलांच्या घरी दर दोन दिवसांनी जाऊन शिकवत आहे.

ग्रामीण भाग व आर्थिक मुबलकता नसल्यामुळे बरेच पालक आपल्या मुलांना स्मार्टफोन विकत घेऊन देऊ शकत नाही. त्यामुळे अनेक मुले निराश झाली आहे आणि पालकांना सुद्धा आपण मुलाला स्मार्टफोन घेऊन देऊ शकत नाही याचे दुःख आहे. अश्या मुलांना त्यांच्या घरी जाऊन शिक्षक शिकवितात. असे त्यांनी सांगितले मात्र त्यांनी यावरही भर दिला की काही विषय जे आहेत यामध्ये गणित, विज्ञान, भूगोल यामधील काही भाग प्रात्यक्षिकाद्वारे

च समजू शकतो असा भाग राहून जातो किंवा मुलांना चांगल्या पद्धतीने समजवून सांगता येत नाही. एकंदरीत मुले ही शिक्षक व शिक्षणाच्या संपर्कात आहे आणि बऱ्यापैकी मुलांचा चांगला प्रतिसाद आहे असे त्यांनी सांगितले.

शाळा कधीपर्यंत सुरू होईल याबद्दल विचारले असता त्यांनी सांगितले की शिक्षण राज्यमंत्री म्हणतात. शाळा जानेवारीत मध्ये सुरू होईल मात्र शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी असे म्हटले आहे जे केंद्राचे दिशानिर्देश असतील त्याप्रमाणे राज्य शासन निर्णय येईल असे त्यांनी सांगितले मुख्याध्यापक श्री सुरडकर सर यांनी असे मत मांडले की अगोदर शासनाने कॉलेज, महाविद्यालय पातळीवर वर्ग सुरू करावे नंतर माध्यमिक, प्राथमिक शाळा सुरू करण्याबाबत विचार करावा.

बरेचसे मुले आपल्या समस्या सोडविण्याकरिता शिक्षकाजवळ येत आहे, असे त्यांनी सांगितले.

गावातील महाविद्यालयीन युवक कॉलेज बंद असल्यामुळे मोठ्या प्रमाणात स्मार्टफोन, मोबाईल यामध्ये आपला वेळ घालवत आहे, गावातील मुख्य पीक संत्रा फळबागा असल्याकारणाने संत्रा फवारणी, कटाई या सारख्या कामावर जात आहे.

संत्रातोडीच्या वेळेस गावात मोठ्या प्रमाणात मजूर येत होता मात्र अजूनही संत्रा तोडणी व शेतातील कामे ठप्प असल्यामुळे मजूर आलेला नाही अगोदर जो मजूर गावामध्ये येत होता त्यांनी मोठ्या प्रमाणात आपल्या गृहराज्यांत पलायन केले आहे.

कोरोना च्या संकटात व्यापारी वर्गाला मोठा फटका बसला आहे. गावातील अनेक व्यापारी संकुले, दुकाने बरेच दिवस बंद होती त्यानंतर त्यांना सूट देण्यात आली. तरीपण व्यापारी वर्गाकडे ग्राहकांची कमीच आहे. गावातील व्यापारी संघटनेचे असे म्हणणे आहे की जीवनावश्यक वस्तू, किराणा, भाजीपाला, धान्य यांची सुद्धा मागणी घटली. तर कपडा, स्टेशनरी, कृषी केंद्रे, हार्डवेअर यासारख्या व्यापारी संकुलांना कोरोना महामारीचा जोरदार फटका बसला. त्यांचे असे म्हणणे आले लोक जीवनावश्यक वस्तूलाच पहिली पसंती देत आहे. चैनीच्या वस्तूकडे आर्थिक बाजू कमजोर असल्याने लोक दुर्लक्ष करीत आहे, शाळा, महाविद्यालये बंद असल्या कारणाने गावातील पुस्तकांची दुकाने, झेरॉक्स केंद्रे, सायबर कॅफे या सारख्या दुकानांना फटका बसला आहे.

गावातील शेतीचा विचार करता यावर्षी पीककर्ज वाटपामध्ये खूप उशीर झाला. पीककर्ज मिळविण्यासाठी शेतकरी वर्ग धडपडत होता. मात्र बँकांनी पीककर्ज वाटपासंबंधी मोठ्या अटी व बंधने लादली अनेकांना त्यांच्या मागणीपेक्षा कमी रक्कम पिककर्जाच्या रूपात देण्यात आली. नियमित पिककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अल्पशी वाढीव देण्यात आली. त्यामुळे पेरणीला उशीर झाला. गावातील अनेक तरूण तरूणी नोकरी रोजगारासाठी पुणे, औरंगाबाद येथे गेलेलं आहेत मात्र कोरोना संकटात कंपन्या बंद असल्याने त्यांना अनेक कष्ट सहन करून खासगी वाहनाने गावी यावे लागले. कंपन्या बंद असल्यामूळे व बरचश्या कंपन्यांनी काहीच वेतन दिले नाही यामधील बरेच तरूण हे घरच्या शेतीमध्ये काम करत आहे. काही जण शेतीची कामे फवारणी, खत टाकणे यासारख्या कामावर जात आहे.

यामध्ये असे विद्यार्थी आहेत जे अभियांत्रिकी, वैद्यकीय व स्पर्धा परीक्षा तयारी आणि उच्च शिक्षणासाठी अमरावती, अकोला, नागपूर, पुणे, हैद्राबाद येथे गेली होती ती सर्व परत आलेली आहे. घरीच ते ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेत आहेत. सोबतच गावातील बरेच विद्यार्थी NEET, JEE यासारख्या वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाच्या प्रवेशपरीक्षाची तयारी घरी बसुन ऑनलाईन व झूम ॲप च्या मदतीने करत आहे. बरेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी याद्वारे करताना दिसताहेत. त्यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले अभ्यास करताना बरेचदा नेटवर्क नसते लाईन राहत नाही यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

सोबतच गावात अभ्यासाचे वातावरण नसणे ही देखील एक समस्या आहे. बरेचसे पालक हे शेतकरी, शेतमजूर आहे ते शेतातील कामे करण्याकरिता आपल्या मुलांना शेतात घेऊन जातात त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होते. मुलांची शाळा, कॉलेज बंद असल्यामुळे पालकही चिंतेच्या छायेत आहे. आपल्या मुलांच्या भविष्याबाबत ते संभ्रमाच्या स्थितीत आहे. गावातील शेतीचा विचार केला तर गावातील शेतकऱ्यांची आशा आता संत्रा बागांवर आहे. मात्र गारपिटीने काही भागातील संत्र्यांचे नुकसान झाले आता महिन्याभरानंतर संत्रा तोडीला येईल सर्व शेतकरी वर्ग संत्रा ला चांगला भाव मिळावा या आशेवर आहे. यावर गावातील काही उत्साही तरूणांनी संत्रा फळाचे मार्केटिंग व प्रसार, प्रचार करण्यासाठी फेसबुक, व्हाट्स अप, इन्सटाग्रामवर यासारख्या समाजमाध्यमावर 'संत्रा उत्पादक संघ, शिरजगांव कसबा' सारखे समूह बनविले. यामध्ये कोरोना रोगावर संत्रा हे फळ कसे उपयुक्त आहे हे सांगण्यात येते जसे संत्रा हे फळ रोगप्रतिकारक शक्ती वाढविते. ईमुनिटी वाढविते कोरोना आजाराला हरविण्यासाठी संत्रा हे फळ फार उपयोगी असल्याचे अनेक डॉक्टरांनी सांगितले आहे. अश्या पद्धतीने तरूण संत्रा फळाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न विविध स्तरावर करताना दिसत आहे. एकंदरीत ग्रामीण भागातील स्थिती ही काही फारशी चांगली नाही यासाठी शासनाकडून ग्रामीण विकास व कृषी क्षेत्रात साठी भरीव आर्थिक मदत करण्याची गरज आहे.





# रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि करोना

■ अंशुल वावरे
एम.ए. जेएमसी-१



यंदाच्या करोनाच्या सावटाखाली झालेल्या अनेक कर्मकाडांनी सणवारांनी, उत्सवांनी जुन्या कालबाह्य रूढी, अनावश्यक अंधश्रद्धांना मूठमाती दिली.

करोनाच्या सुरुवातीच्याच काळात काही नातेवाईक सोडून गेले, काही करोनामुळे तर काही नैसर्गिक मृत्यू ! पहिलाच धक्का बसला तो अंत्यविधी या प्रकाराला. जे करोनामुळे गेले त्यांचे तर अंत्यदर्शन ही दुर्लक्ष झाले.

विधींकरता भटजी घराबाहेर पडेनात, मग या भडाब्बी, बघू नंतर, दहावा, बारावा, तेराव्या करता देऊळ उघडेना, बिचारे कावळे उपाशी राहू लागले.

ज्यांचे अंत्यविधी झाले नाहीत त्यांच्या आत्म्याच काय? त्यांना गती कशी मिळाली असेल? की ते लॉकडाऊन उठून आपले अंत्यविधी होतील या आशेवर ताटकळत बसले असतील ?

ज्यांची या काळात वर्षश्राद्ध होती त्यांच्या नातेवाईकांना भटजी म्हणू लागले की अहो श्रद्धेने काढलेली आठवण/पूजन म्हणजेच श्राद्ध ! गेलेल्यांच्या फोटोला हार घाला मनोभावे स्मरण करा, झालं श्राद्ध ! (मग हजारो वर्षे आमच्याकडून पैसे का उकळत होतात भाऊ?)

गुढीपाडव्याला गुढीला गाठ्यांची माळ वहावीच लागते म्हणणाऱ्यांनी गुढीवर नुसता खण आणि तांब्या उपडा घालून पूजा केली आणि मानसपूजा कशी सगळ्यात श्रेष्ठ समजावू लागले. (कारण हार, फुल, दुर्वा, तुळशी, गाठ्यांच्या माळा मिळाल्याच नाहीत यंदा)

मुंबईतला दुसरा सगळ्यात मोठा उत्सव तो म्हणजे दहीहांडी तोही शांततेच पार पडला.

मुंबईचा/महाराष्ट्राचा सगळ्यात मोठा उत्सव गणेशोत्सव! प्रचंड प्रमाणात होणारी आर्थिक उलाढाल, भक्तांची पिळवणूक, धक्काबुक्की, हेही सगळं करता येईल की या चिंतेत आयोजक, सरकारला विनंत्या करू लागले की लॉक डाऊन उठवा. पण लॉक डाऊन काही उठला नाही. आणि तसही अनेक बलाढ्य प्रायोजकांनी करोनामुळे कंबरडे मोडल्याने हात आखडते घेतले आहेत. भक्त घरातून बाहेर पडतील की नाही याची शाश्वती नाही अश्या परिस्थितीत, अनेक प्रतिथयश राजांनी एकतर उत्सवच रद्द केले किंवा अगदी घरगुती स्वरूपात साजरे केले (काही मंडळांनी तर अगदी दीडच दिवसाचा गणेशोत्सव साजरा केला)

पंचाईत झाली ती दरवर्षी गावाला गणपती साजरा करणाऱ्यांची. आमचे देव हलवता येत नाहीत म्हणणारे, किंवा मंत्रालयातून पत्र आणलंय, कोण अडवतो गावाला जायला, असं म्हणणारे तोंडावर आपटले जेव्हा त्यांच्याच गावकऱ्यांनी त्यांना गावाला यायला बंदी केली. ज्या गावाला जायचं तिथं आधी १० दिवस जाऊन क्वारंटाईन व्हा, गणपतीचे ६ दिवस तिथे काढा, मग परत आल्यावर स्वतःच्या सोसायटीत १४ दिवस क्वारंटाईन व्हा. एवढं कसं जमणार ???

मग देव न हलवणाऱ्यांनी हळूच इथेच गणपती बुक केले. देव काय सगळीकडे असतो, इथे काय आणि गावाला काय एकच की असं म्हणू लागले.

भटजीशिवाय आम्ही पुजाच करत नाही म्हणणारे, * पूजेचे ऑनलाईन app किती छान आहेत म्हणू लागले. गणपतींचं विसर्जन वाहत्या पाण्यातच करावं असं म्हणणाऱ्यांना एकदम पर्यावरणाची काळजी वाटू लागली आणि बादलीत, पिंपात विसर्जन करू लागले.

खरंच करोनानी किती शिकवलं नाही? जे टिळक, आगरकर धुरीणांना अपेक्षित होतं ते करोनानी करून दाखवलं.

शेवटी काय, तर स्वतःची समाजाची सुरक्षा, सोय हे महत्त्वाचं ठरलं, त्यापुढे श्रद्धा, रूढी, परंपर, कर्मकांड सगळं बाजूला पडलं.

पण ही सुधारणा ह्यावेळीच फक्त की आता पुढे येणाऱ्या वर्षातही हा खरा प्रश्न आहे.

(संकलित माहिती)

# कोरोना काळातील विवाह (कथा लग्न घरची)

■ पराग सुनीलराव राऊत
बी.ए. भाग-३



अचानक उद्भवलेल्या कोरोना संकटाने आणि त्याच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या देशव्यापी लॉकडाऊन मुळे अनेकांची अनेक कामे रखडली. परंतु सर्वात मोठा पेच निर्माण झाला तो लग्न घरामध्ये असाच पेच माझ्या घरातही निर्माण झाला. ते म्हणजे माझ्या बहिणीचे लग्न. लग्नाच्या धामधुमीची सुरुवात झाली असतांनाचा कोराना वायरस ची बातमी ऐकली. सुरुवातीला सर्वाप्रमाणे आम्ही ही या वायरसला दुर्लक्षित केले. पण जसाजसा वायरस वाढू लागला. तशी तशी धाकधूकही वाढू लागली. हळूहळू अनेकांची ठरलेली लग्ने पुढे ढकलण्यात आली.

लग्नाची तारीख थोडी लेट असल्यामुळे आम्ही थांबुनच गेलो. आणि लॉकडाऊन उठण्याची वाट बघत होतो. पण लॉकडाऊन उठण्याऐवजी अजून शिस्तीत/कडक असे होत होते. कारण दिवसेंदिवस कोरोनाचे पेशंट वाढतच होते. म्हणून मोठ्या भावासह घरच्यांची चिंता दिवसेंदिवस वाढतच होती... कारण लग्न म्हटले की काळजी ही आलीच... अनेकांनी लग्नाची तारीख रद्द करुन लग्न पुढे ढकलण्याचे सल्ले दिले. परंतु कोणी कितीही सल्ले दिले तरी निर्णय हा सर्व गोष्टींचा विचारविनीमय करूनच घ्यावा लागतो... कोरोनाची स्थिती हाताबाहेर गेली होती.

योग्य काय आहे ते सुचत नव्हते. कोरोना आताच काही संपणार नाही हे सर्वाच्या लक्षात आले होते. आता मग हळूहळू सरकारच्या नियमाप्रमाणे लग्न घरी लग्नाची चाहूल लागली होती. पहिले मध्यम वर्गानी आणि नंतर श्रीमंतांनीही लग्न घरीच उरकवण्याचा निर्णय घेतला. आता आमच्याही मनात घरीच लग्न करण्याचा पालव्या फुटु लागल्या...

नंतर सर्व विचार विनिमय करुन आणि ज्येष्ठ लोकांचे/ नातेवाईकांचे सल्ले घेवून शेवटी लग्न घरीच करण्याचा एकमताने निर्णय झाला. अचानक मे महिन्यात ग्रॅंड होणारा हा लग्नसोहळा रद्द झाला. माझ्यासह अनेकांमध्ये नाराजीचे सूर सूरू झाले. पण कोणताही मोठा निर्णय घेत असताना त्या घडीला कोणताही पर्याय नसतो. म्हणून तो निर्णय घेतला जात असतो... आणि लग्न घरीच करण्याचा निर्णय आम्हीच घेतला असे नाही. अनेकांनीही असे निर्णय घेतलेच. म्हणून लगेचच अनेकांचे नाराजी नाट्य दूर झाले. आणि सर्वांनी या लग्नाला ऑनलाईन हजर राहण्याला होकार दिला.

आता पेच होतो तो बुकिंग केलेले मंगल कार्यालय, गाड्या, कॅमेरामॅन, कॅटर्स आणि अजूनही इतरत्र बुकिंग रद्द करण्यात







कोणताही विलंब न करता या तारखीची सर्व बुकिंग रद्द करण्यात आली. कमी लोकात लग्नाची तयारी करण्याला वेग आला. कारण लग्नाची तारीख जवळ पावले टाकत होती. आता टेंशन जरी कमी असले तरी लग्न समारंभ संपेपर्यंत धाकधुकही होतीच. सर्व गोष्टी त्या दिवसाच्यां नियोजनात बसल्या. कारण सर्व लग्न समारंभ शासनाने ठेवलेल्या अटी आणि नियमाचे पालन करूनच करायच्या होत्या. अशा छोट्या विविहामध्येही अनेकांना कोरोनाची लागण झाल्याच्या बातम्या कानावर येत होत्या. त्यामुळे अगदी म्हणजे अगदी क्वचितच लोकांना लग्नाचे निमंत्रण देण्यात आले.

याच काळात अशा लग्नांना आदर्श विवाह म्हणून प्रसिद्धी मिळत होती. त्यामुळे बरेही वाटतच होते. आता लग्नाच्या पूर्वी होत असलेल्या समारंभाला सुरुवात झाली होती. घरात नवचैतन्य नवउत्साह निर्माण झाला होता. गोंधळा पासून तर हळदी पर्यंत सर्व समारंभ थाटामाटात उत्साहात पार पडले होते. सर्वाच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू होते.

शेवटी तो दिवस ऊजाडला. घरातच छोटेखाणी भव्य दिव्य असे मंगल कार्यालय तयार झाले होते. अखेर घरात अत्यंत कमी लोकांच्या उपस्थितीमध्ये पण ऑनलाईन भरमसाठ लोकांच्या उपस्थितीत शुभ मंगलम् सावधान पार पडले. खरतर एकंदरीत मोठ्या ग्रॅंड लग्नापेक्षाही हा लग्न समारंभ अतिशय उत्तम पद्धतीने पार पडला. सर्वानी वाहवाह केली. चार भिंतीच्या आवारात संपन्न झालेल्या या लग्न सोहळ्याची घरच्या ईतिहासात नोंद झाली. भारतीय संस्कृतीतील विवाह एकतर तेवढ्या कालावधीसाठी रद्द केले. नाहीतर पुढे ढकलण्यात आले. पण अनेकांनी कमी लोकांत लग्न करून एक आदर्श निर्माण केलाच पण परिस्थिती कितीही कठीण असो त्याला सामोरे कसे जायचे याचे जीवंत उदाहरण समाजापुढे ठेवले. लग्न समारंभ पार पडल्यानंतर सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

त्याच दरम्यान असे अनेक विवाह समारंभ सर्वत्र सुरू होते. असेच उदाहरण म्हणजे कोल्हापूरात शक्कल लढवत एका विवाह सोहळ्यात अगदी कमी लोकांमध्ये हा विवाह सोहळा उरकला. त्यासाठी पाहुण्यांना निमंत्रण व्हाट्सॲपवर देण्यात आले. तर त्यांना फेसबुक लाईव्हवर विवाहात सहभागी होण्याचा आग्रह केला. नातेवाईकही आनंदाने सहभागी झाले. फेसबुकवर शुभेच्छाही दिल्या अन् मोबाईलवर अक्षताही टाकल्या. या विवाह सोहळ्यासाठी ज्यांना आहेर करायचे होते त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा अकाऊंट नंबर देण्यात आला होता. या माध्यमातून कोरोनाशी लढाईला हातभारही लावला. या अनोख्या लग्नाने गर्दी करणाऱ्यांना नवीन आदर्श घालून दिला. अनेकांकडून हीच प्रथा सुरू राहायला पाहिजे असे शब्द बाहेर पडत होते. कारण लग्न म्हणजे वाजत गाजत, धुमधाक्यात होणार हे काही नवीन नाही. पण लॉकडाऊनच्या काळात सरकारचा आदेश पाळून आणि सामाजिक भान राखून केलेल्या या अनोख्या आणि अविस्मरणीय विवाहसोहळ्यांची चर्चा आणि कौतुक नेहमी होणारच हे मात्र नक्की.

कोरोना योध्दा



महाविद्यालयाची बी.कॉम.भाग-३ ची विद्यार्थीनी कु. मृणाल भोयर हीने लॉकडाऊनच्या काळात कोरोना योध्दा म्हणून दिलेल्या सेवेबद्दल तिचा चंद्रपूरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक यांनी प्रशस्ती पत्र देऊन सत्कार केला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठानेही कोरोना योध्दा म्हणून कु. मृणाल भोयरचा सन्मान केला.

# कोरोना : भ्रम, संभ्रम आणि राजकारण

■आकाश दे. बोदिले
एम.ए.-२ (राज्यशास्त्र)

कोरोना हे एक जागतिक संकट आहे आणि लोक मोठ्या प्रमाणात मरत आहेत. त्यामध्ये कोरोनाचे राजकारण या विषयावरील हेडींग पाहून आपण नक्कीच विचारात पडला असाल. मुळात ही विचार करण्यासारखीच गोष्ट आहे. कोरोनो ही महामारी आहे या विचाराशी मी सहमत नाही. मुळात कोरोना हा एक संसर्गजन्य व्हायरस आहे. आता आपण म्हणाल हा एक सामान्य व्हायरस आहे तर मिडिया, वर्तमानपत्र, डॉक्टर काय मूर्ख आहेत का? हो अर्थातच! परंतु ते नाही, आपण आहोत मुर्ख. जेवढ्या मोठ्या प्रमाणात कोरोनाची जाहीरातबाजी करण्यात आली वास्तवात येवढ्या मोठ्या संख्येने पेशंट आहेच नाही. राज्यकर्ते, सत्ताधारी नेहमीच सामान्य जनतेला मूर्ख बनवत आपल्या राजकारणाच्या आणि सत्तेच्या पोळ्या भाजत आले आहेत. आणि आता तर चक्क ऐका महामारी वरच राजकारण करण्यात आले आहे. आणि आज संपूर्ण जगाच लक्ष कोरोना या विषयाकडे वेधले गेले आहे आणि या कोरोनाने स्वस्थ मानसांना अस्वस्थ करून सोडलयं. कोरोना हा ऐक असा विषय झाला कि स्वस्थ असणाऱ्या एका व्यक्तीला सांगणे तुला सर्पदंश झालाय. आणि त्याचा चक्क जागीच तडफडून मृत्यु होणे असा प्रकार आहे. हा येक मनोविज्ञानाचा भाग झाला. आणि या राजकर्त्यांनी सामान्य असणाऱ्या व्हायरस ला महामारी घोषीत करण हा असाच एक प्रकार आहे. एखादया व्यक्तीला माहीत झाल की आपल्याला कोरोना झाला आहे तर भितीपोटीच त्या व्यक्तीचा जिव जाईल अशी स्थिती निर्माण करण्यात आली आहे. जनमानसांचे वारंवार सोशल मिडिया, वर्तमानपत्र या माध्यमातून मनोबल कमी करण्याचे आणि भिती निर्माण करण्यात आली आहे. पण असे कोणी का करेल? हा प्रश्न आपण मला कराल. तर जाणून घेऊया यामागील जागतिक राजकारण.




आज पूर्ण जगामध्ये वर्ल्ड economal अमेरिका आहे. अमेरिकेच्या अर्थव्यस्थेचा GDP २० ट्रिलियन डॉलर आहे आणि चाईना या GDP १२ ट्रिलियन डॉलर आहे. भारताचा विचार केला तर फक्त २ ट्रिलियन डॉलर येवढा GDP आहे. चाईनाच एक स्वप्न आहे वर्ल्ड पावर बनण्याच. चाईनाचे राष्ट्रपती शि जिनपिंग खूप महत्वकांक्षी व कुटील व्यक्ती आहेत. यांना चाईनाच्या जनतेला आव्हान केल आहे. '' कि तुम मुझे आजीवन राष्ट्रपती बनोओ, मे २०३९ चे पहिले चाईना को वर्ल्ड पॉवर इकोनॉमी बनाऊंगा. चाईनाचे Expart म्हणतात, चाईना USA या आमने सामनेच्या लढाईमध्ये कधी जिंकू नाही शकत. त्यामुळे चाईनाने कोरोना महामारी नावाच्या मास्तरप्लॅन बनविला. आज संपूर्ण जगामध्ये मोबाईल फोन बनविण्याचे व सप्लाय करण्याचे काम चाईना मोठ्या प्रमाणात करत आहे. हाइड्रो इलेक्ट्रीकल पॉवर व प्रोडक्शन जास्त प्रमाणात करत आहे, जुने, ॲपल त्याचबरोबर पूर्ण जगामध्ये सोलर पॅनल सप्लाय करण्याच काम चाईना करत आहे. इत्यादी चाईनाकडून अनेक देशामध्ये केला जातो. चिनला उन्नत करण्यासाठी चिनने मॅन्युफ्रॅक्चरींग आणि प्रोडॅक्श ला महत्व दिल. आज चाईना वर्ल्ड पॉवर ग्लोबल लिस्टमध्ये नंबर दोन वर आला आहे आणि नंबर ऐकवर येने हे चाईनाचं स्वप्न आहे. आज महामारीच्या नावाखाली संपूर्ण जग बंद आहे आणि ऐकटा चिन पूर्णपणे खुला असून संपूर्ण जगाला साहित्य पुरविण्याच काम करत आहे.

चाईना आणि who या विषयी थोडक्यात पाहुया -

who चे director general होते. Dr. Tedros Ahanom ghebreyesus हे मूळ Ethopia चे Ethiopia ला ऑफ्रीकेमध्ये लिटल चाईना म्हणून ओळखले जाते. चाईनाने २०१७ मध्ये Dr. Tedras यांची ॲपाईमेंट केली. तेव्हापासून तो चाईनासाठी





कटपूतलीसारखा काम करतो आणि या मास्टरप्लॅन मध्ये त्याला मोहरा बनविण्यात आले. Dr. Tedras आपल्या देशामध्ये ज्या संघटनाशी जुडला होता ते संघटन १९९० च्या दशकात मध्ये USA वर्ल्ड टेरेरिस्ट ऑर्गनाइझेशन मध्ये लिस्टेड होती. या ऑर्गनाईझेशन मध्ये तो ३ नंबरचा मोठा पदाधिकारी होता. चाईनामध्ये डमी टिम पाठवून आणि चाईनाच्या आयत्या रिपोर्टवर शिक्के मारण्याचे काम who ने केले आहे. ३१ डिसेंबर ला कोरोनाची पहिली केस मिळते. १२ मार्च त्या कोविडला महामारी म्हणून घोषित करतो. तोपर्यंत १५० पेक्षा अधिक देशांमध्ये कोरोनाचे सक्रीय मामले समोर येतात. २३ जानेवारीलाच वूहानमध्ये लॉकडाऊन करण्यात आल होत. त्यानंतर वूहानमधून चाईनाच्या कोणत्याही शहरामध्ये व्यक्ती जाऊ शकत नव्हता, ना शंघाई, ना बिजिंग नाही सत्ता किंवा शेजारील कोणत्याही भागात परंतु वूहानमधून इंटरनॅशनल फ्लाईट चालू ठेवण्याचे स्वातंत्र्य चिन देतो. म्हणजे संपूर्ण जगामध्ये व्हायरस पोहचवणे हा मूळ उद्देश होता. इटलीमध्ये चायनिज स्त्रियांनी व्हायरस पसरविला. साऊथ कोरियामध्ये एक पेशंट ५००० पेशंट कोरोना फैलविण्यासाठी जिम्मेदार आढळला. संपूर्ण देश आज चाईनाला दोषी ठरवायला लागलेत. तेवढ्यात who वूहान चा मृत्यूदर ० चा डाटा जगासमोर मांडतो. व चिनने कोरोनावर विजय मिळविला. कोरोनाचा वूहानमधून नाईनाट करण्यात आला असे स्पष्ट करतो. आणि काय who सांगत की, हा व्हायरस मानसातून मानसामध्ये फैलत नाही. म्हणजे प्रत्येक वेळी who चाईनाला सेफगार्ड बनविण्याच काम करतो. वूहानमधून संपूर्ण जगामध्ये कोरोना पसरला आणि वूहानव्यतिरिक्त चिनच्या कोनत्याच भागात शहरात पसरला नाही ही गोष्ट खटकण्यासाठी आहे. आज वूहान कोरोना महामारीचे केंद्र पूर्णपणे चालू आहे. व जग बंद आहे. बस, विमाने, व्यापार सर्व काही जोरात चालू आहे. मास्क, व्हेल्टीलेटर सॅनिटायझर, पीपीई किट, टेस्टिंग किट इत्यादी उत्पादन चिन मोठ्या प्रमाणात करून संपूर्ण जगात सप्लाय करत आहे. दिल्लीसाठी भारताने ५ लाख रॅपिड टेस्टिंग किट ची ऑर्डर ३० मार्च ला चाईना ला दिली होती. दिल्लीसाठी विमान चाईनामधून उडान येणार होते. परंतु चाईनाने ऑर्डर कन्सल केली व विमान दुसरीकडे पाठविण्यात आले. कारण त्या देशाकडून जास्त पैसे घेण्यात आले. यावरून स्पष्ट होते कि चाईनाला काय हव आहे. हे झाल जागतिक राजकारण परंतु देशातील स्थानिक सरकारने सुद्धा कोरोनाच्या ह्या काळामध्ये अनेक राजकीय हेतू साध्य करून घेतलीत. त्यावर आपण थोडक्यात प्रकाश टाकूया. कोरोना काळामध्ये भारतात अयोध्या मंदिर राजकारण करण्यात आले. जनतेला मुर्ख बनवून लुटण्यात आले. हजारो मंदिरामधील पैसा सरकारने गोळा केला. काही श्रीमंतानी सुद्धा करोडो रु. दान केलेत. भारताची लोकसंख्या ऐवढी आहे कि त्यांनी १ रु. प्रत्येकी जरी जमा केला तर किती करोडो रु. होतील. त्यावरून अंदाज करा सरकारकडे किती पैसा जमा झाला असे अब्जोवधी रुपयांचे विदेशी लोन, वर्ल्ड बॅंक कडून कर्ज असे अनेक प्रकार झालेत.




या सत्ताधारी पक्षावर जनतेमार्फत अनेक प्रश्न उठविल्या जात होते. सर्वात भ्रष्ट सरकार, देशाला कर्जबाजारी करणारी सरकार, आर्थिक मंदी आणणारी सरकार, सुशिक्षित बेरोजगार वाढविणारी सरकार इत्यादी आणि असे प्रश्न उदभवले कि राजकारण्यासमोर एकच विषय असतो तो म्हणजे जनतेचे लक्ष त्या विषयावरून दूसरीकडे वळवणे. मग धर्मभेद केल्याशिवाय कोणता मार्ग असेल. परंतु या वेळेस आजपर्यंत अयोध्या हे त्यांची वोटबॅंक असलेल स्थन तीसराच इतिहास घेऊन जगासमोर आल. ते म्हणजे सम्राट अशोककालीन बौद्ध मुर्त्या. सरकारने कोरोना काळाचा फायदा घेऊन हे प्रकरण सलटविले व राममंदिर बांधण्यास सुरूवातही करून टाकली. म्हणजे पुढील निवडणुकीला कधीतरी कारण सापडले. व एका समुदायाची वोटबॅंक फिक्स झाली अस म्हणायला हरकत नाही. त्यानंतर जनतेला कधी पैशाची लालूच व तांदूळ वाटून खूष करण्यात आले. आज अनेक लोक त्या १०००, २००० रु. खूष होऊन सरकार चांगला आहे या भ्रमात पडले आहेत. पण त्यांनी हे लक्षात घ्याव करोडो खर्च केले तर अब्जोवधी रू. सरकारने जमा केलेत. आणि बाकी काही नाही येणाऱ्या निवडुकांमध्ये त्यांचे हेच मुद्दे राहणार आहेत. आम्ही मदत केली, पैसा पाठविला, हिंदू मंदिर समस्या सोडविली. इत्यादी आज अनेक व्यक्ती आपल्या आजूबाजूला आढळत आहे. त्यांना कोरोनाचे काही लक्षण नसतांना सुद्धा जबरदस्ती कॉरन्टाईन केल्या जात आहे. आणि तेथे नेऊन १०-१२ दिवस क्रिकेट, गाने, नाच इत्यादी करून घरी वापस पाठविल्या जात आहे. आणि पॉझिटिव्ह पेशंट बरा होत आहे कोणतीही व्हेक्सीन न घेता. खरंच ही गोष्ट किती हास्यापद आहे. मग ही सरकार पेशंट चा आकडा का वाढवत असेल हा प्रश्न उभा होतो? तर माझ्या मते who वर अध्यक्षपदी आता भारतीय व्यक्तीला

बसविण्यात आले आहे. भारतात जास्त पेशंट म्हणजे कडून भारताला मदत ती कोट्यावधी रू. असेल आणि या सरकारचा तर प्रश्नच नाही. १ लाख लोकांची घरे बांधली तर ती कागदावर १० लाख दाखवली जातात. तेवढे आपण जानकार आहातर. कोरोना हा मुळात महामारी नाही हे सिद्ध करणारी काही Expart ने केलेली विधाने पाहूयात. कोरोना महामारी नाही हे सिद्ध करणारी काही विधाने -

१) Dr. Tarun Kothari (MBBS, MD) from Goa यांनी press मध्ये आपले मत व्यक्त केले.

कोरोना व्हायरस हा एक सामान्य फ्लू व्हायरस आहे. याला भिण्याचे कोणतेही कारण नाही. कोरोनाची मृत्यूदर म्हणजे फक्त कोरोनावर होणारा मृत्यूदर ०.१ ते ०.०१ आहे.

१००० कोरोना पेशंट आहेत तर त्यापैकी ६०० लोक आपोआप ठीक होतात. त्यांना माहीतही नाही पडेल कि केव्हा कोरोना झाला आणि निघून गेला. ३०० लोकांची तब्येत इम्युनिटी पॉवर चांगली नसल्या कारणाने ठीक होते. १००० मधून ९०० लोक गेले आता राहिला प्रश्न १०० लोकांचा जे की खूप आहेत या १०० मधून २ या ३ लोकांचा मृत्यु होते तर आपल्या भारतामध्ये मृत्युदर ३% निघतो. परंतु डॉ. कोठारी म्हणतात १०० मधून ३ लोक मरतात म्हणजे याचा अर्थ मृत्यूदर जो आहे तो ०.३% आहे. ना की ३% हे आपल्याला लक्षात घेण महत्वाचे आहे.

डॉ. तरूण कोठारी यांनी आव्हान केले आहे की भारतामध्ये कोणताही डॉक्टर, साईटीस्ट, कोणतेही हॉस्पिटल, कोणताही नेता, मंत्री, सांसद सदस्य किंवा कोणताही व्यक्ती याने साबीत करून दाखवावे कि कोरोना ऐक महामारी आहे आणि १ लाख रू. बक्षीस घेऊन जावे.

डॉ. Dr. KK Agarwal (MBBS, MD) Senior physician or ordiologist presdent of Heat core foundation आणि राहले आहे. म्हणजेच मध्ये पदमश्री पारितोषिकाने सन्मानित, ते म्हणतात की कोरोणामुळे मानवाची मरण्याची संभावना ही खूप कमी आहे.

-:-:-

## कोरोना : सॅम्पल टू हॉस्पीटल



कोरोना रुग्णालयात बाळाला जन्म देवून बरी होवून घरी जाणाऱ्या महिलेच्या बाळाला पालकमंत्री ना. यशोमती ठाकूर यांनी जवळ घेतले.





# कोरोना आणि सध्यस्थिती

■ भक्ती संतोष टाले
बी.ए. जेएमसी भाग-3

आज माझा लिहिण्याचा मूड होता. मी कॉलेजमध्ये होते सहाजिकच लिहायला मी कॅन्टीनवर गेले पेन पेपर हातात घेतला पण लिहायला विषय सुचेना मग मी चहा आणि माझी आवडती खारी ऑर्डर केली आमच्या कॉलेजला चहा आणि खारी खूप भारी मिळते काही क्षणातच तिथे दोन मुलं आली मला विषय सुचत नसल्याने मी त्यांच्या गोष्टी ऐकायला सुरुवात केली टीनेजर्सच्या गोष्टी भारी असतात मला नेहमी यांच्याच गोष्टीतून प्रेरणा मिळते मी त्यांच्या गोष्टी खारी खात खात ऐकायला लागले जवळ पास सर्वच खुर्च्या रिकाम्या होत्या त्यांच्या पण कॉलेजची पोरती अरे सॉरी सॉरी कॉलेजचे पोट्टे ते नाही ते कसं हाये, आमच्या ईदर्भात पोरांना पोट्टे म्हणतात. शेवटी कट्यावरच बसणार आणि संवाद सुरू झाला.




विजय :-काय रं गावाकडे राह्यतोन तुला पास बरी मिळाली यायले अमरावतीले ?

अजय :- मी कुठं पास काढतो का? तुले तर माहीत हायेच की लेका मी कसा हायते.

(दोघे हसायला लागले)

याचाच अर्थ त्यांनी पास काढलीच नव्हती शेवटी विजय म्हणाला तसं अमरावतीची पोरंती. हाहाहा...

विजय :- तुले काय वाटते आपल्या परीक्षा व्हतील का ?

अजय :- ते काय बा मला म्हाइत न्हाय, परिक्षा व्हतील की न्हाय. पण भावा जर परीक्षा झाल्या न्हाहीत तर मला लई म्हणजे लई... दुःख होईल.

तुला काय वाटलं मले आनंद व्हिइन का? मी पण सिंसीयर इयार्थी हाये लेका.

विजय :- हो म्हाइत हाये तुझी सिंसीएरिटी. पण पायन तू आज्या सालं आपलंया कोरोनां एक वर्ष खाऊन राह्यलाले का. माझ्या मनात व्हतं पटापट ग्रॅज्युएशन पूर्ण केलं असतं आनं शेतीकडे लक्ष दिलं असतं. पण या कोरोनानं सर्वांचं जगणंच जणू बंद केलंय. यांच्या या बोलण्यावरून विद्यार्थी फायनल इयरचे वाटत होते, वाटत होते काय होतेच ते फायनलइयरचे त्यांच्या बोलण्याचा मी सुद्धा विचार केला की खरचं याने त्या लोकांनी आणि सर्वांनी फायनल इयरच्या विद्यार्थ्यांच्या डोक्यावर टांगती तलवार ठेवली आहे ना तो विद्यार्थी मरत आहे न जगत आहे. आज माहीत होते परीक्षा होणार तोच उद्या निर्णय येतो की परीक्षा होणार नाही आणि आता इतका वेळ उलटून गेलाय की काही अभ्यास लक्षात सुद्धा नाही.

अभ्यास लक्षात नाही त्यामुळे परीक्षा होण्याची भीती वाटते आणि भविष्यात नोकऱ्या मिळतील की नाही म्हणून परीक्षा होऊन येअसे वाटते. खूप गोंधळ चाललाय डोक्यात.

आम्हाला कितीही त्रास होत असला तरी मला एक गोष्ट आवडली की या लोकडाऊनमुळे कोरोनांमुळे निसर्ग पुन्हा पुर्वपदावर आला आहे. प्राणी रस्त्यावर येत आहेत, पक्षी निरभ्र-आभाळात मुक्त विहार करत अहेत. वर्षा आपल्या मर्यादेत आहे, अनेकांची कौशल्ये बाहेर येतांना दिसतात कुणी स्वयंपाक करत आहे, कुणी विणकाम, कुणी डेकोरेशन तर कुणी मेहेंदी, रांगोळी काढत आहेत. एरव्ही व्यस्त असलेले लोक कुटूंबासोबत वेळ घालवत आहे. जीवन खूप छान होत चाललंय.

महत्वाची गोष्ट म्हणजे स्वच्छता जी आपण या काळात केली ती यापुढेही तशीच करत राहा. म्हणजे भारतस्वच्छ होईल. थोडा वेळ कुटूंबालाही देत जा हो त्यांना सुद्धा तुमच्याशिवाय आहे तरी कोण? आणि माझ्या या विचारावर विचार करा बरं.

-:-:-

# मोबाईल मी आणू-तरी कुठून

■ आशिष अशोकराव नागापुरे
एम.ए.भाग-१ (राज्यशास्त्र)



एकाऐकी कोरोनाची महामारी आली
महामारी आली आमची पचाईत झाली...
कामधंदा हातातला गेला माया सुठून
मुल पण घरीच आहे. शाधा गेली सुठून
परिस्थिती नाही मावी गेलो पुरा तुटून
सांगा गुरूजी मोबाईल मी आणू-तरी कुठून... ।।
खाले घरात नाही माया अन्नधान्याचा दाणा.
लेकरं मनते मले, बाबा मोबाईल द्या ना ।
शेतीवाडी नाही आमचं काम नाही मोठं
मजुरीच्या भरोस्यावर आहे आमचे पोटं
अशातच लेकरानं मोबाईलची मागणी धरली रेटून
सांगा गुरूजी मोबाईल मी आणु तरी कुठून... ।।
पोठ भागुन जराशे, पैसे शिल्लक पाडतो
त्याच्यातच अडचणीचे दिवस आम्ही काढतो
लॉकडाऊनच्या काळामंदी, थेंच कामी आले.
होते काही गुरूजी जमा, सारे खर्च झाले.
होत नवंत कोरोनान नेल सार लुटून
सांगा गुरूजी मोबाईल मी आणू तरी कुठून.
शेजारी एक दिवस पोरगा माया गेला
अभ्यासाले हातामंदी त्याने वही पेन नेला.
शेजारी राजेहो असा गरम झाला.
मने कोरोनाची साथ आहे इथ कायला आला
अस-कस मने तुम्ही ध्यानात येत नाही
अस घरी कोणाच्यासी जाता येत नाही.
पोराले गुरूजी माया देलं त्यान ऊठून
सांगा गुरूजी मोबाईल मी आणू तरी कुठून... ।।
काल गुरूजी पोरगं माया जवळ आल.
म्हण माय शिक्षण ऑनलाईन झाल.
आता मोबाईल पायजे नेटवाला
बारा-पंधरा हजार अशा रेटवाला.
म्या मनल बाबु पैसे नाही आपल्या पाशी.
तं पोरग मने, बाबा मग मी येतो आता फाशी
लेकराचे इचार पाहून आईचे मन आले दाटून
सांगा गुरूजी मोबाईल मी आणुतरी कुठून ... ।।
सांगा गुरूजी पोराले मी कस समजावून सांगू
पैशासाठी सांगाना भीक कोणाले मांगू.
करनं पोरगं कमीजास्त जीवच पडला धाकी.
ऐकच ईचार डोक्यामंदी, सुचत नाही बाकी.
घडी-घडी डोयातला बांध येतो फुटून.
सांगा गुरूजी मोबाईल मी आणू तरी कुठून.







# कोरोनाचे पडसाद / परिणाम

■ शुभम ना. तावडे
बी.ए. भाग-३

साधारणत: डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या वुहान शहरात कोरोना वायरसचा उगम झाला. सुरुवातीला हळूहळू आणि नंतर रौद्र रूप प्राप्त होत हा वायरस संपूर्ण जगभरात पसरला. मुख्यत: कोरोनाचे पडसाद कोणा एका विशिष्ट व्यक्तीवर गोष्टीवर / वस्तुवर पडले नाहीत. खरेतर प्रत्येकावरच कोरोनाचे परिणाम पहायला मिळाले. कोरोनाच्या संकटामुळे जागतिक मंदी येणार हे निश्चित आहेच. पण त्याचा फटका भारताच्या संकटात असलेल्या अर्थव्यवस्थेला बसला. याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात झाला.

कोरोनामुळे यावर्षी सर्वच धर्मातील उत्सवावर परिणाम झाले. सर्व धर्मीयांना आपले सण उत्सव घरीच साजरे करावे लागले. अनेक जुन्या रूढी परंपरा कोरोनामुळे यावर्षी खंडीत झाल्या. २४ तास सुरू असणारे मंदिरे एक मिनीटही ऊघडी नव्हती. इंग्लंडच्या पंतप्रधानांपासून तर धारावीतल्या मजूरापर्यंत कोणालाही कोरोनाचा संसर्ग होवू शकतो. त्यामुळे एक गोष्ट सिद्ध झाली की हा व्हायरस गरीब, श्रीमंत, उच्चशिक्षित, अशिक्षित, शहर, ग्रामीण जात-धर्म-पंत या आधारावर भेदभाव करीत नाही. पण लिंग गुणोत्तरामध्ये कोरोना व्हायरस स्त्री पुरुषांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे परिणाम करतो, हे सिद्ध झाले आहे.

कोरोना वायरस हा काही भारतात आलेला पहिला वायरस नाही. या अगोदर कितीतरी वायरस भारतात आले अन् गेलेही. पण त्या वेळच्या दळणवळणाचा वेग, माहिती प्रसारणाचा वेग आणि आताच्या दळणवळणाच्या वेगात माहिती प्रसारणाच्या वेगात खूप फरक आहे. क्षणाचाही विलंब न लागता कुठलीही माहिती कुठपर्यंत पोहचतेही आणि दळणवळणाचा विचार केला तर वाहतुकीच्या असंख्य साधनांमुळे नागरीकांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे ताबडतोब होते. दळणवळणाचे प्रमुख साधन म्हणजे विमान कोरोनामुळे विमान उद्योगावर दुरगामी परिणाम पहायला मिळाले. गेल्या अनेक महिन्यांपासून हा उद्योग संकटात आहे. कर्मचारी इंधन किंवा विमानतळावरील सेवा देखभाल दुरुस्ती त्याचबरोबर हवाई नियंत्रण कक्ष विमानतळ शुल्क हे सगळे ठप्प आहे. विमान उद्योगावर याचा परिणाम दिर्घकाळ राहण्याची चिन्ह आहेत.

या वायरस ने संपूर्ण जगाला दहशतांच्या सावटाखाली आणले आहे. वायरसचे क्रीडाविश्वावरही पडसाद दिसून आले. त्यामुळे येणारे टोकियो ऑलम्पिक पुढे एकलण्यात आले आहे. तसेच टी २० क्रिकेट वर्ल्डकप पुढे ढकलण्यात आले आहे. क्रीडा विश्वाबरोबरच कला / साहित्य रंगभूमीवर कोरोनाचे पडसाद पहायला मिळाले. सर्वच चित्रपटाचे चित्रीकरण तसेच नाटकाचे चित्रीकरणही अर्ध्यावर थांबवण्यात आले होते. त्यामुळे मनोरंजन क्षेत्र बंद होते. एकमेकांशी येणाऱ्या जवळच्या संबंधामुळे कोरोनाचा वेगाने प्रसार होतो म्हणून केंद्र सरकारने भारताचे भवितव्य लक्षात घेऊन केंद्रबिंदू असलेल्या विद्यार्थाचे आरोग्य लक्षात घेता शाळा, महाविद्यालय, क्लासेस बंद करण्यात आले व ऑनलाईन शिक्षणावर (लर्न फ्रॉम होम) वर भर देण्यात आला व सरकारी कामकाज तसेच काही खाजगी कंपन्यांनीही कर्मचारांना कार्यालयात न येता घरुन काम करण्याची (वर्क फ्रॉम होम) मुभा दिली. यातून एक नवी कार्यप्रणालीही उदयास येऊ शकते यात दुमत नाही. याचा भविष्यात काय परिणाम होईल हे आताच सांगणे कठीण असले तरी अर्थव्यवस्थेवर याचा थेट परिणाम होईल हे मात्र नक्की !

ऐरवी पर्यटकांमुळे शोभित दिसणारे पर्यटन स्थळ / ऐतिहासिक स्थळ सुद्धा ओसाड पडलेले दिसते. तेथील लोकांचा रोजगार हा पर्यटकांवरच अवलंबून असलेला दिसतो. आता पर्यटक नाही तर तेथील लोकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच व्यापार, उद्योगावरही त्याचे दुरगामी परिणाम पहायला मिळाले. कारण अनेक दिवस उद्योग बंद पडले होते. कारण मालाची आयात निर्यात करण्यासाठी दळणवळणाचे साधनच बंद होते. आयात निर्यातीवर प्रबंध असल्यामुळे त्याचे परिणाम सर्वच उद्योगावर पहायला मिळाले.

एकंदरित परिस्थिती लक्षात घेता सर्वच व्यवसायावर कोरोनाचे पडसाद पहायला मिळाले. त्यानिमित्ताने मानवाची जीवनशैली बदलली. सर्वच जनजीवनावर याचे फार मोठे परिणाम झाले. केंद्राने लागू केलेल्या नियमांनूसार अत्यावश्यक कामाशिवाय सर्वांना घरी बसणे, सक्तीचे करण्यात आले. नागरीकांची उपासमार होऊ नये. अन्नधान्याचा तुटवडा भासू नये म्हणून रेशन दुकानदार तीन महिन्याचे राशन देण्याचा निर्णय झाला.

शेवटी व्यक्तिगत स्वच्छता आणि आवश्यक ती दक्षता घेतली तर हा रोग नियंत्रणात राहील मात्र या रोगामुळे निर्माण झालेल्या अर्थसंकटातून देशाला सावरण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आखणे, हाच एकमेव प्रभावी मार्ग ठरेल.

# लॉकडाऊनची सकारात्मकता

■ कु. समीक्षा राजेंद्र हुड
बी.ए. भाग-२




काही दिवसांपासून कुठे जाण्याचा तर प्रश्नच नाही पण जिकडे तिकडे, प्रत्येक वाहिनीवर फक्त कोरोना आणि लॉकडाऊनची चर्चा सुरू आहे. कोणत्या ठिकाणी किती लोक कोरोना बाधित आहेत, किती लोक मरण पावले आणि किती सुधारले. कधी कधी खूप कंटाळा येतो त्या सततच्या बातम्या ऐकून पण शेवटी त्या आपल्यासाठी महत्वाच्या आहेत.

अनेकांना या लॉकडाऊन काळाचा वैताग आलाय. परंतु वैताग आला तरी त्याला काही पर्याय नाही म्हणून सांगते घराच्या बाहेर पडू नका. ह्या झाल्या कोरोना, लॉकडाऊन सुरू झाल्या पासूनच्या वाईट गोष्टी. पण याच लॉकडाऊनमुळे अनेकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल सुद्धा झालेले दिसून येतात. याकडे कुणाचे लक्ष होते की नाही काय माहीत.

थोडी नजर टाकूया लॉकडाऊन काळात नेमके कोणते सकारात्मक बदल घडून आले.

सर्वात प्रथम आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकांचे दारू पिणे सुटले. दुकानेचं बंद झाली शिवाय बाहेर पडताच फटके त्यामुळे लोकांनी फटके न निवडता दारू बंद हा पर्याय निवडला. या निर्णयाचा सर्वात जास्त आनंद या लोकांच्या बायकांनाच झाला. लोकांचे दारू पिणे बंद झाले म्हणून लोक स्वत:च्या कुटूंबासोबत वेळ घालवायला लागले, एकत्र जेवायला लागले, खेळायला लागले. घरातले वातावरण संपूर्ण बदलले. घरात सर्वत्र आनंदी आनंद पसरला आहे. रिकामा वेळ जास्त असल्याने तो सतकर्णी लावण्या करीता लोक नवनवीन पदार्थ करून पाहत आहे, पेटी काढून संगीताचा रियाज करत आहे, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करत आहे, या निमित्ताने त्यांचे सुप्त गुण जगासमोर येत आहे. कुणी बागवानी, कुणी साफसफाई, कुणी नृत्य, कुणी लेखन, कुणी कविता तर कुणी वाचन करत आहेत.

लोक नोकरीवर जातात पण सध्या लॉकडाऊन मुळे घरीच सर्व असल्याने त्यांना कंटाळा येतो हे लक्षात आल्यावर प्रसिद्ध जुन्या मालिका पुन्हा सुरू करण्यात आल्या. उदाहरणार्थ रामायण, महाभारत, श्री कृष्णा, बुनियाद, हम पांच, एका लग्नाची दुसरी गोष्ट, दिल दोस्ती दुनियादारी, इ. जुन्या मालिका सुरू व्हाव्यात अशी अनेकांची इच्छा होती पण त्याला मुहूर्त लॉकडाऊन मुळे लावला. आज जेव्हा रामायण, महाभारत तीन पिढ्या एकत्र बसून पाहतात तेव्हा आनंद होतो. आपले आई वडील बालपणीचे किस्से सांगतात तेव्हा त्यांच्या डोळ्यातील आनंद बघण्यासारखा असतो.

लोक लोकांच्या नावाने ओरडायचे की, लोकांमध्ये माणुसकी उरली नाही, त्यांना फक्त एकमेकांचे पाय ओढणेच जमते. परंतु आज जेव्हा गरजूंच्या घरी किराणा, धान्य पोहोचावे म्हणून जे लोक दान देत आहे. यावरून कळतंय माणुसकी अजून जिवंत आहे. सामान्य माणसाला धान्याची, उपचाराची, औषधांची मदत व्हावी म्हणून देशातल्या सर्व श्रीमंतांनी मदत केली आहे शिवाय देवस्थानांनी सुद्धा मदत केली. पैसे, वस्तू, अन्न धान्य याची मदत केली. स्वयंसेवक स्वत:चा जीव धोक्यात घालून गरजूंना मदत पोहोचवत आहेत.

कोविड-१९ नष्ट करायचा असल्यास हात स्वच्छ धुणे, कुठल्याही व्यक्ती बरोबर हात न मिळवणे, सॅनिटायजर चा वापर करणे अशा प्रकारची स्वच्छता आपल्याला पाळावी लागते. यामुळे आपल्याला काही प्रमाणात तरी स्वच्छतेची सवय लागली. नाहीतर मोदीजी तिकडून सांगतात स्वच्छ भारत अभियान पण आपल्या काही डोक्यात जात नाही. १९४७ रोजी आपण स्वतंत्र झालो, स्वातंत्र्य मिळवण्यासाठी क्रांतिकारकांनी खूप कष्ट केलेत. आपल्याला त्याची किंमत राहिली नव्हती. पण आज जेव्हा महिनाभर जास्त घरात राहण्याची वेळ आली तेव्हा कुठे आम्हाला स्वातंत्र्याचे मोल कळाले. लॉकडाऊन संपल्यावर भारतीय पुन्हा नव्याने स्वतंत्र होतील.

पूर्वी लोक बाहेर मोकाट फिरत होती आणि प्राणी, पक्षांना





पिंजऱ्यात ठेवायचे परंतु आता लोक घरात लॉकडाऊन आणि प्राणी पक्षी मोकळे फिरत आहेत. प्रदूषित झालेली शहरे सुद्धा प्रदूषण मुक्त झाली आहेत. लॉकडाऊन काळात मुंबई, पुणे, दिल्ली अशा शहरांचे प्रदूषण बऱ्याच प्रमाणात कमी झाले आहेत म्हणून मोर, हरीण, काळवीट तिथे दिसत आहेत. शहरातील लोकांना कधी नव्हे ते निरभ्र आकाश पाहण्याची संधी मिळाली आहे.

आपले पंतप्रधान सदैव आपल्या पाठीशी आहेत ते आपल्याला संकटात एकटे टाकून जाणार नाही. लोक खूप बोलत असतात; भारतीय लोक असे तसे, त्यांना हे येत नाही ते येत नाही, ते एकमेकांचे नेहमी पाय खेचत असतात, भारतीय लोक कधी मदत करत नाही ते जास्त भांडण करतात. अशा लोकांना मला आवर्जून सांगावे वाटते मी पूर्वी सांगितल्या प्रमाणे ''जो आम्हाला नडला तो खड्यात जाऊन पडला' आमच्या देशासाठी आम्ही एकत्र येणार, काही फालतू लोकांमुळे कोरोना ने भारतात पसरण्याची हिम्मत केली याचे वर्चस्व कमी करण्यासाठी डॉक्टर, नर्स आणि सर्व मेडिकल कर्मचारी आहेत. हे लोक आपली काळजी घेत आहेत तर आपणही यांची काळजी घ्यावी हे आपले कर्तव्य आहे. पण आपल्याकडे काय ती त्यांच्यावर हल्ले होत आहेत.

माझ्या मते आपला जीव वाचवणाऱ्यांवर जर कोणी जीवघेणे हल्ले करत असतील तर त्या हल्लेखोरांना जगण्याचा काही अधिकार नाही.

पंतप्रधानांनी त्यांच्या उद्बोधनात सांगितल्या प्रमाणे ताट वाजवणे, टाळ्या वाजवणे, दिवे लावणे असे प्रत्येक प्रसंग आपण साजेर केलेत, या प्रसंगांनी सर्वांना धीर दिला.

या पुढेही जितक्या दिवस लॉकडाऊन असेल तितक्या दिवस घरीच बसा. बालपणीचे खेळ खेळा, स्वयंपाक करून पहा, पुस्तकं वाचा, लिखाण करा, कविता करा, गायनाचा सराव करा, रांगोळी काढा, चित्र काढा, काही करा पण घराच्या बाहेर निघू नका हो.

सध्या आपले आयुष्य आपल्याच हातात आहे.

कोरोना आणि पर्यावरण

कोरोना विषाणूच्या साथीने संपूर्ण जगाला कैद केले आहे. ना रस्त्यावर वाहनांचा आवाज येत आहे, नाही आकाशात कारखान्यांमधून निघणारा धूर दिसत आहे. या महामारी चा संसर्ग थांबवण्यासाठी केलेलं लॉकडाऊन मुळे जगाला अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड यावे लागत आहे. म्हणजेच आर्थिक उपक्रम रखडले आहे, आणि बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे, परंतु या सर्व समस्यांमध्ये लॉकडाउनचा पर्यावरणावर सकारात्मक परिणाम झालेला दिसत आहे.

या दिवसांमध्ये कार्बनचे उत्सर्जन कमी झाले असून, अनेक प्रकारचे प्रदूषण बऱ्याच प्रमाणात कमी झाले आहे. ज्यामुळे हवा स्वच्छ आहे, आणि लोकांना स्वच्छ हवेमध्ये श्वास घेण्याची संधी मिळाली आहे. चीनची भिंत, माउंट एव्हरेस्ट आणि हिमालयाच्या पर्वतरांगाची कांती तरी दुरून लोक बघत आहे आणि असेच किती तरी बदलाव पर्यावरणामध्ये झालेले दिसत आहे.

या काळात कोरोना संकट संपूर्ण जगासमोर एक महत्त्वाचं आव्हान ठरलं आहे. जगामध्ये या महामारीच्या घेरात लाखो लोक आले आहेत, या मधून बाहेर निघण्यासाठी पूर्ण लोक घरामध्ये राहत आहे. सामाजिक अंतर, धार्मिक यात्रा बंद, हात वारंवार स्वच्छ करणे, या सारख्या नियमांचे पालन जनता करत आहे. शाळा, कार्यालय, कारखाने यांना आपले उपक्रम बंद ठेवण्याचे आदेश देण्यासोबतच, लॉकडाउनचा अवलंब केला आहे. यामध्ये रस्ता वाहतूक कमीत कमी झालेली आहे. आणि हवाई वाहतूकीचे प्रमाण तर ६० ते ९० टक्के पर्यंत कमी केले आहे, हे चालू असतांनाच मार्च महिन्यापासून आत्तापर्यंत कार्बन उत्सर्जनामध्ये प्रत्येक दिवशी जवळ जवळ १७ टक्के पेक्षा ही जास्त कमी झालेली आहे. हे सोडून अनेक प्रकारच्या प्रदुषणांमध्ये बऱ्याच प्रमाणात कमी झालेली आहे.

तरी या परिस्थिती दरम्यान जागतिक उत्पादन आणि रोजगाराची पातळी कमी झाली असून, आर्थिक आणि सामाजिक आघात होत आहे. लॉकडाउनचा पर्यावरणावर झालेला सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे, या दरम्यान ग्रीन हाऊस उत्सर्जनामध्ये बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे, जागतिक समुदायांनी ग्रीन हाऊस उत्सर्जन ला कमी करण्यासाठी, आता पर्यंत अनेक प्रयत्न केले, अनेक जलवायू परिवर्तन संमेलन झाले, परंतु या दिशेमध्ये कोणतेही उल्लेखनीय परिवर्तन दिसत नाही. परंतु लॉकडाऊन मुळे हे परिवर्तन फार कमी कालावधीत बघायला मिळाले. मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये जगातील प्रमुख शहरांची वायू गुणवत्ता पातळीमध्ये अपेक्षेपेक्षा ही जास्त सुधारणा झालेली आहे. कार्बन डायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साईड, ओझोन गॅस आणि पार्टिक्युलेट वाटाण्या अभावी हवेची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात सुधारत आहे.

हवामान आणि हवामानाच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या माहिती नुसार, कोविड १९ साठी अवलबविण्यात आलेले विविध महत्त्वपूर्ण उपायांमुळे राष्ट्रीय राजधानी दिल्लीत P.M2.5 मध्ये ३० टक्के कमी झालेली आहे आणि तसेच नायट्रोजन ऑक्साईडच्या पातळीत सुमारे ४० टक्के कमी झाली आहे. या शिवाय धोकादायक स्तरापर्यंत प्रदुषण पावलेल्या गंगा आणि यमुना नद्यांसोबतच अनेक नद्यांच्या पाण्याच्या गुणवत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली



लॉकडाऊनमध्ये पडले माणुसकीचे दर्शन

आहे. या बदलांना साफ करण्यासाठी अनेक योजना राबविल्या होत्या. शिवाय गंगा नदीच्या स्वच्छतेसाठी वेगळ्या मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली होती, सर्वात मोठा गंगा नदी प्रकल्प 'नमामि गंगे' सुद्धा राबविण्यात आला परंतु हे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले आहे. परंतु या लॉकडाऊनच्या काळापर्यंत जल प्रदुषणात बऱ्याच प्रमाणात कमी झालेली आहे आणि नदी या पाण्याच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा झालेली आहे.

या परिवर्तनाचे दोन मुख्य कारण आहे, पहिले म्हणजे पाण्याची मागणी कमी झाली आहे, उद्योग धंदे बंद असल्यामुळे, पाण्याचा वापर कमी होत आहे. आणि दुसरे म्हणजे उद्योग धंदे बंद असल्याने, घातक कचरा नदीच्या पाण्यामध्ये फार कमी प्रमाणात टाकला गेला आणि नदीचे पाण्याचे प्रदुषण कमी झाले. निसर्ग आणि वन्यजीवांनी स्वतःला पुन्हा पुन्हा: जिवित आणि स्वच्छ केले आहे.' बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' च्या अनुसार २०१९ पासून अटलांटिक हंस प्रमाणामध्ये २५ टक्के वृद्धी झालेली आहे. या शिवाय गंगा डॉल्फिन सोबतच अनेक जलीय जीव किंवा अन्य जीवजंतूंच्या परिसर प्रजाती आणि निवासामध्ये निश्चित: सकारात्मक परिवर्तन दिसत आहे.

भारतासाठी हे बदलाव अत्यंत महत्वाचे आहे. प्रत्येक भारतामध्ये दरवर्षी लाखो लोक वायु, जलीय आणि भूमी प्रदुषणाच्या वाईट परिणामामुळे मृत्यू पावतात. वायु प्रदुषणाचा मानवाच्या फुफ्फुसांवर परिणाम होतो. विशेष म्हणजे तो वृद्ध व्यक्ती आणि मुले यांच्यावर जास्त प्रमाणात होतो. वायु प्रदुषणामुळे दरवर्षी जवळ जवळ १.२ मिलीयन लोकांचा मृत्यू होतो. परंतु तरीही आपण प्रदुषणातून मुक्त होण्यासाठी प्रभावी योजना राबु शकलो नाही, जगातील २० प्रमुख प्रदुषित शहरांपैकी १५ शहरे ही भारतातील आहेत, या परिस्थिती वरुन आपण या परिस्थितीच्या व्याप्ती व भयाचा अंदाज घेऊ शकतो, आणि अशी अनेक शहरे आहेत, जी जागतिक आरोग्य संघटनेच्या हवेच्या गुणवत्तेच्या मानकांची पूर्तता करु शकत नाही.

मुख्यत: केंद्रीय हरित न्यायाधिकरण किंवा सुप्रिम कोर्टाचे आदेश व दिलासा, केंद्र सरकार किंवा राज्य सरकार गांभीर्य स्विकारण्याच्या दृष्टीने किंवा त्यावर कार्य करण्यासाठी, कोणतीही कार्यवाही करण्याच्या दिशेने कार्य करत नाहीत.

अशा परिस्थितीत जेव्हा निसर्ग स्वत: च हादरतो, तेव्हा बदल भविष्यासाठी आशा निर्माण करतो.

❖❖❖





# सावधान... शेवटी करोना हरलाच

■ देवाशिष शेळके
एम.ए. (जर्नालिझम ॲंड मास कॉम) वर्ष -२



काल : जानेवारी २०२०

२०२० हे साल भारताचे माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांनी खूपच आधी व्हिजन २०२० या नावाने आपल्या देशासाठी खूप महत्वाचं असेल हे भाकीत केलं होतं. भारत एक बलशाली राष्ट्र म्हणून उदयाला येईल हा त्याच्या मागचा मतितार्थ. खरंतर त्यांनी भाकीत केल्याप्रमाणे अनेक क्षेत्रात भारताने गौरवास्पद मुसंडी मारली पण दुर्दैवाने आटोकाट प्रयत्न करून सुद्धा सद्यस्थितीत आपण डॉ. कलाम यांच्या त्या व्हिजन २०२० पासून अजूनही कितीतरी मागे आहोत. आजही अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजा सुद्धा आपण भागवू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे आणि येत्या काही वर्षात विशेष काही बदल होईल अशी फारशी अपेक्षा करण्यासारखी परिस्थिती आतातरी दिसत नाही. अन्न आणि वस्त्र या दोन मूलभूत गरजा भागवणारा बळी राजा, हा नावापुरताच राजा उरलाय, विषम सामाजिक व्यवस्थेने, अस्मानी आणि नव-सुलतानी संकटांनी त्याचा कधीच बळी घेतलाय. राजकारण्यांनी, दलालांनी आणि सामान्य जनतेने बळीराजाला त्राही भगवान करून सोडलंय. बळीराजाच्या आत्महत्येचं प्रमाण दिवसेंदिवस वाढतंच चाललंय, इतकं की त्याचं आता कोणालाच काहीही वाटेनासं झालंय.

असं जरी असलं तरी बळीराजाच्या दुष्टचक्राला काहीप्रमाणात तो स्वत: ही कारणीभूत आहे, कर्जा मागे कर्ज, पिकनिवडीच्या चुका, फालतू बडेजाव ही कारणं सुद्धा प्रामुख्याने बळीराजाच्या आजच्या परिस्थितीला कारणीभूत आहेतच. पैकी मुलीच्या लग्नाचा फालतू बडेजाव हे एक प्रमुख कारण, ऋण काढून सण करणे, मानजेवणं घालणे, हुंड्याची अनिष्ट परंपरा अभिमानाने मिरवणे आणि इतकं सगळं होऊनही मुलगी वर्ष दोन वर्षात घरी परत येणे हे निरयाचेच झालेले.

काल : मार्च २०२०

कोविड-१९ अर्थात कोरोनाचा कहर संपूर्ण जगात धुमाकूळ घालायला सुरवात झालेली. सोशल डिस्टंसिंग (हा शब्द तसा चुकीचा, खरा शब्द फिजिकल डिस्टंसिंग हा) मास्क घालणे आणि वारंवार साबणाने हात धुणे किंवा सॅनेटाईझ करणे या त्रिसूत्रींनी जगाचा जो ताबा घेतलाय तो अजूनही आहे आणि अजून किती वर्ष राहिल ते कुणालाच सांगता येणार नाही.

पहिलं देशव्यापी लॉकडाऊन २५ मार्च ला लागलं आणि पूर्ण देशभरात जवळजवळ कर्फ्यूच लागला, सगळेच व्यवहार ठप्प पडले. लोकांचं बाहेर पडणंही बंद झालं. हा काळ म्हणजे खरंतर लग्नसराईचा काळ, अनेकांनी लग्नाचे, साखरपुड्याचे मुहूर्त काढलेले. असं म्हणतात की लग्नाच्या गाठी प्रत्यक्ष परमेश्वर जुळवतो, पण एका य:कश्चित विषाणू पुढे सर्वशक्तिमान परमेश्वर ही हतबल ठरला. आपल्याकडे कुठल्याही कारणाने लग्न रद्द झालं किंवा पुढे सरकलं तर वधूपक्षाला दोष द्यायचा शिरस्ताच आहे. मुलीतच काही खोट असेल, असं म्हणून सरळ आपण मोकळे होतो. वधूपक्षाला लग्नाआधी आणि लग्नानंतर ठोक भावात दोषी धरणे हा आपला राष्ट्रीय छंद आहे. पण कोरोनामुळे लग्न पुढे सरकल्याने वरपक्षाला, वधूपक्षाला दोष देता येईना, त्यामुळे त्यांची खरंतर खूपच गोची झाली. सगळे वरपक्ष सैरभैर झाले.

बरं कोरोना आज जाईल उद्या जाईल म्हणता म्हणता, पठ्ठ्या काही हलायला तयार नाही. मायबाप सरकार, डॉक्टर्स, शास्त्रज्ञ, भविष्यवेते, फेंगशुई एक्सपर्टस सगळ्यांच्याच विकेट कोरोना

ने काढल्या. कोणालाही काहीच सांगता येईना, बरं कोरोना इतका सहिष्णू आहे की, गरीब-श्रीमंत, हिंदू-मुस्लिम, काळे-गोरे, सुशिक्षित-अशिक्षित, तरुण-वयस्कर, नेता-अभिनेता असा कसलाच दुजाभाव त्याला नाही. तो सगळ्यांना खुल्या दिलाने उरी भेटतो. इतका जेण्डर, सोशल, कल्चरल, पोलिटिकल आणि इकोनॉमिकली निष्पक्ष असा विषाणू एकमेवाद्वितीव. ज्या समता आणि बंधुता करिता मोठमोठाले तत्त्ववेते, धुरंधर राजकारणी आणि प्रकांड पंडित अहोरात्र झटले, ते या बेट्याने एका झटक्यात करून दाखवले, अगदी गौतम बुद्धापासून, ऍरिस्टॉटल, टिळक, आगरकर, सावरकर, गांधी, शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्यापर्यंत सगळ्यांनीच या कोरोनाला वैश्विक समता आणि बंधुभावाचा वस्तुपाठच घालून दिल्याबद्दल अगणित अगणित दुवा दिल्या असतील.


कोरोनाकाळात रक्तदान

तर ज्यांचे विवाह ठरले होते, त्यांची तगमग दिवसागणिक वाढत चालली आणि मग सरकार ने एक तोडगा सुचवला, की लग्न तर करता येईल पण फिजिकल डिस्टंसिंग पाळून, मास्क लावून आणि हात वारंवार धुवून नाहीतर कोरोना लागेल मागे हात धुवून. वरपक्ष सुखावले, वधूपक्ष जरा धास्तावले आणि वऱ्हाडी-वाजंत्री आणि डी जे वाले पस्तावले कारण सरकारने अजून एक अट घातली की वरपक्ष आणि वधूपक्षाकडून लग्नाला फक्त ५० माणसंच उपस्थित राहू शकतील. त्यामुळे वऱ्हाडी-वाजंत्री आणि डी जे वाल्यांची दुकानं बंद झाली, अहो काय ते आक्रीत, डी जे म्हणजे लग्नाची शान, डेसिबल्स ला धाब्यावर बसवून जेव्हा डी जे दणादण वाजतो ना, तेंव्हा खरतरं लग्नात जान आल्यासारखी वाटते. अमक्याच्या लग्नात वरातीत तीन तास हायवे ब्लॉक केला, तमक्याच्या लग्नात मुहूर्ताच्या चार तासानंतर लगीन लागलं कारण पोरं इतकी झिंगाट-बुंगाट नाचली डी जे वर, एक नंबर लग्न... आणि आता डी जे नाही? अरारारा... एकदम सदाशिव पेठी ढक्कू पाणी लग्न, असं काय कूट असतं व्हय?

दुसरीकडे, २५ माणसात बोलवावं कुणाकुणाला हा वर आणि वधू पक्षापुढे यक्ष प्रश्न? आधीच लग्नात लै मान-पान, रुसवे-फुगवे, शेवटी बरीचशी नावांची यादी करून दहावीस करून आणि कुठे टॉस करून माणसं निवडली, रेल्वे प्रमाणे काही आर ए सी आणि काही वेटिंग लिस्ट वर ठेवली, न जाणो निवडलेल्यांना कोरोना झाला तर? राखीव खेळाडू नको का? काही कॅप राऊंडच्या पहिल्या लिस्ट मधे आल्यामुळे सुखावले, काही वेटिंग लिस्ट मधे असल्याने आशावादी होते की मेरा नंबर आयेगा, जे कुठल्याच लिस्ट मधे नव्हते त्यांनी अधिकृतरीत्या वर आणि वधू पक्षाशी संबंध तोडल्याची जाहीर दवंडी पिटली, गावातील काही लब्धप्रतिष्ठित सीरिअल किलर सारखे सीरिअल वऱ्हाडी झाले, काही ठिकाणी पैजा लागल्या काही ठिकाणी बेटिंग सुरू झालं की पाटलाच्या लग्नाला पहिले पंचवीस कोण? टेनिस प्रमाणे काही ठिकाणी सीडींग पद्धती (नामांकन) चा अवलंब करण्यात आला. गावाच्या पारावर या गप्पांना पारावार नाही राहिला आणि हो सर्वात महत्वाचं म्हणजे आपली उपस्थिती हाच आहेर, हे वाक्य पहिलं बाद करण्यात आलं. ५० माणसच असल्याने पंगत, वाढपी, पाणके सगळेच वधूच्या बाजूचे असणारं, त्यामुळे वधूकडच्या काही लोकांनी ऐनवेळी काहीबाही कारणं देऊन माघार घेतली आणि वधूकडील आर ए सी आणि वेटिंग वरील निमंत्रितांना लग्नाला चाट मारण्याचा सल्ला दिला, वर शहाजोगपणे पुढच्या कार्यापर्यंत कोरोना जाईल मग आम्ही येऊ ना तोरणाला असा शब्दही दिला. एक एक मोहरा गळत गळत शेवटी वधू, तिचे आई वडील, एक दूरचा भामटा मामा, आणि तिच्या चार बहिणी हाच काय तो गोतावळा राहिला, वरपक्षाने मात्र वधूपक्षातील माणसांची सगळी कसर भरून काढली आणि नवरदेवाच्या मामेबहिणीच्या सासरकडची माणसं कॅप राऊंड च्या पहिल्या लिस्ट मधे आणून, तिचा काडीमोड होण्यापासून तिला वाचवलं आणि मग तिच्या मनाने पण उभारी घेऊन संसाराच्या पडझडीपासून सावरत वधूच्या आईबापाला आणि वधूला कसं छळता येईल याचं प्लानिंग वराच्या बहिणीबरोबर सुरू केलं आणि दहा हजाराच्या पैठणीसाठी भर मांडवात कल्ला सुरू केला आणि मगच वरमायेला लग्न लागल्यासारखं वाटलं.

ता क : लवकरच सर्वप्रकारचं लॉकडाऊन संपून लग्न पुन्हा थाटामाटात आणि बेगडी बडेजावानी सुरू होतील अशी ग्वाही सरकारकडून देण्यात येतं आहे आणि... शेवटी कोरोना हरलाच...





# कोरोना आणि राजकारण

■ कु. पूजा अशोकराव बोलखलकर
एम.ए. भाग-२ (राज्यशास्त्र)

'कोरोना' या एका विषाणूने अख्या जगाची झोप उडवली यामध्ये उच-निच, श्रीमंत गरीब, जात, पात, धर्म, देश यामध्ये भेद केलेला नसून तो प्रत्येक जाती धर्मातील लोकांना झालेला दिसून येतो.



२२ मार्च २०२० ला पहिल्यांदा भारतात भारत बंद करण्यात आला. त्यावेळी कुणाला वाटले ही नसेल की हा कोरोना इतका भयावह आणि आपल्या जिवनाची 'वाट' लावेल परंतु जसजसे दिवस गेलेत तस तशा अनेक समस्या निर्माण झाल्यात, यात माणसाची सर्वात मोठी गरज ही 'अन्न' म्हणजे भोजन असते परंतु त्यावेळी काही मजूर हे दुसऱ्या राज्यात मजूरीसाठी गेले असतांना अचानक या कोरोनामुळे स्थलांतर बंद करण्यात आले व मजुरांना त्याच्या घरी जाण्यासाठी कुठल्याही प्रकारची वाहतूकीची सोय नसून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली.

या सर्व कारणामुळे काही मजूर त्यांच्या घरी जाण्यासाठी पायीच निघाले परंतू या सर्वांमध्ये काहींचा जीव सुद्धा गेला. तरीही सरकारने तेवढ्या तत्परतीने मंजूराचे हित साध्य करण्याचा प्रयत्न केला नाही. हो मग नंतर त्यांनी काही बसेस किंवा रेल्वेची व्यवस्था करून सर्वांना आपआपल्या घरी पाठवले. परंतू या सर्वात त्या कालावधी मध्ये त्या मजूरांवर जी वाईट परिस्थिती आली ती आलीच नसती जर का सरकारने पूर्व तयारी करुन व जनतेला या 'भारत बंद' ची माहिती दिली असती तर सर्व मजूर आपआपल्या घरी गेले असते.

एकीकडे सरकार 'भारत बंद' ची घोषणा करतो व दुसरीकडे सरकारी खजिन्यात कमी येवू नये म्हणून मद्यपानाची दुकाने खुली करून कोरोनाच्या संख्यामध्ये वाढ झाली कारण खूप दिवसाचे मदयपानाची दुकाने बंद असल्या कारणामुळे अचानक दुकाने उघडल्यामुळे दारोड्यांची एक लंबी लाईनच लागली ! ही गोष्ट थोडी हास्यास्पद असून यातून सरकारने स्वत:चे हीत साध्य करण्याचा प्रयत्न केला.

आज या कोरोनामुळे देशाचा आर्थिक स्तर खालावला. या कोरोना व्हायरसामुळे भारतासह जगभरातील अर्थव्यवस्थेची अवस्था प्रचंड खराब झाली आहे. नुकताच काढलेले एप्रिल ते जुन या पहिल्या तिमाहीतील जीडीपीचा विकास दर जाहीर झाला जीडीपीमध्ये ४० वर्षातील सर्वात मोठी घसरण झाली आहे आणि ३ करोड लोकांवर बेरोजगारीची वेळ आली.

परंतु या सर्वामध्ये आपणास दिसून येईल की आज ही एका आमदाराला दर माही २ लाख पगार आहे व त्यात ही सर्व गरजा ह्या सरकारी खजिन्यातून जातात जसे त्यांचे मोबाईल रिचार्ज, सरकारी गाडी आणि घर पण तर कुठेना कुठे मला असे वाटते की त्यांच्या पगारामध्ये काही कपात करून तो पैसा देशाच्या विकासास लावावा. पण असे होणार नाही कारण हे बील पास करणारे तेच असतात. परंतू आपणास हे मात्र नक्की दिसून येईल की, ती म्हणजे कर वाढ !

सत्ता ही कुठल्याही पक्षाची असो त्यांना फक्त त्यांचे हीत साधायचे असते जेणेकरून त्यांची सत्ता कायम राहील. पण आजची परिस्थिती खुप वाईट झालेली आहे म्हणून सर्व राजकीय व्यक्तींनी व सत्ताधारी पक्षाने योग्य ते व्यवस्थापन करून आज देश ज्या परिस्थितीत आहे त्यातून देशाला बाहेर काढून सर्वांना रोजगार प्राप्त करून दयावा.

कोरोनाच्या वेळी प्रधानमंत्री राहत कोषमध्ये ज्यांच्याकडून जेवढे होईल त्यांनी तेवढी मदत केली व देशाला आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न केला. यामध्ये प्रत्येक जाती धर्मातील लोकांनी समोर येऊन जर कुणाला जेवणासाठी त्यांच्याकडे काही नसेल तर त्यांना भोजन देण्याची पण व्यवस्था केली तसेच त्यापैकी सर्वात महत्वाचे व्यक्ती ते म्हणजे पोलीस, डॉक्टर्स आणि सफाईकर्मचारी यांनी सुद्धा आपली कामगिरी चोखपणे बजावली. म्हणूनच भारताला 'अनेकता में एकता' असे म्हटले जाते !

# मी पोलिस बोलतोय

## ''सद्रक्षणाय खलनिग्रहणाय''

■ कु. अंकिता रामेश्वर पावडे
एम.ए. भाग-२



नमस्कार, खुप दिवसापासुन तुमच्याशी बोलायचं होत पण dutyमुळे वेळच मिळाला नाही. कस आहे ना ! आम्हा पोलीसांना सहजासहजी सुट्टी मिळत नाही ना! आपल्या सर्वांना ज्ञात आहे असंख्य नागऱ्या अजूनं अजुनही सदावहा वगैरे एखादी एक दासाचा संप नाही की काम बंद आंदोलन नाही म्हणजेच स्वतंत्र भारतातही आम्हा पोलीसांना संपाचा अधिकार नाही. पण आज काळ या कोरोनामुळे खुप पोलिसांना सुट्या मिळाल्यात... त्यातलाच मी एक!

उत्साहत कर्तव्य... दिवाळी असो या दसरा.. ईद असो, या बुद्धजयंती... सगळे सण त्यांच्याकडे साजरे होतात आमचे... सरकार बदलले की धोरणे बदलतात. सर्वात जास्त फटका बसतो तो पोलिस खात्याला... पण तक्रार देत नाही की सांगता येत ही नाही... पण असो !

सध्या विदांत आहे साहेबांची ऑर्डर नाही, नाका बंदी नाही, कोणाला शिक्षा देणे नाही, दिवस-रात्र बाहेर राहणे नाही, त्यावर झोपणं. एर तर आम्हा पोलीसांना एक किंवा दोन दिवसांची सुट्टी खूप असते, पण या कोरोनामुळे आमची कायमची सुट्टी झालीय. आता माझ्या या सुट्टीत माझ्या सोबत हे Hospital ज्यात मी माझे शेवटचे दिवस काढतोय. 'पण खर सांगू का?' या Hospital च्या काटी पेक्षा हवरी त्यांच्याकडे दाज झोप लागायची, इथे मिळणाऱ्या जेवणापेक्षा दिवसभरात खाल्लेल्या एका वडापावचर माझे पोट भरायचे आणि इथे सतत येणाऱ्या Ambulance च्या जीव घेणा सायरन पेक्षा आमच्या Police Van च्या सायरनचा आवाज कधीही चांगला... आता माझ्या आयुष्याचे काही शेवटचे दिवस उरलेत आणि या उरलेल्या काळात आठवतात ते आमचे कॉन्स्टेबल... आता त्यांना यानंतर कधीच बोलु शकणार नाही, 'चला गाडी काढा Round ला जाऊन येऊ!' असे काय आमचं पोलीसाचे आयुष्य असते, पूर्ण शहराला Round मारुन येऊ शकतो आम्ही पण आम्हाला आमच्याच स्वत:च्या घरी Round नाही हो मारता येत. बिचारे माझ्या घरचे मी बरा होवून येईल म्हणून वाट बघत बसले असतील पण त्यांना काय माहित येथे आधिच माझ्या आल्याने स्वर्गाचे दार गाठले.

या कोरोनाच्या वाईट परिस्थितीमध्ये थोड अजुन लढु शकलो नाही, माझ्या सहकार्यांना, जनतेला पाठिंबा देवू शकलो नाही. पण मीच काय करणार जेव्हा मला माहित झाले आपल्याला कोरोनानी ग्रासले तेव्हा स्वत:साठी रडु पण शकलो नाही.

जगामध्ये कोरोना व्हाइरसमुळे महामारीचे मोठे संकट निर्माण झाले, या परिस्थितीची संपूर्ण जाणीव जनतेला होती, जनतेसाठी; त्याच्या सुरक्षितेसाठी सरकारकडून वेळोवेळी विविध नियम निर्माण करण्यात आले. पण आजच्या काळात कायदे नियम पाळण्यापेक्षा ते मोडण्यातच आपल्याकडील लोकांना भुषण वाटते आणि यावर कडक भाषेत जो पोलीस बोलतो वा समज देतो त्याला म्हणतात, की याला वर्दीची मस्ती आहे हाच प्रकार आपल्याला कोरोनाच्या काळातही दिसुन आला... मी काठी उगारली याचा राग कधी मनात ठेवु नका, अहो सर्वांना सांगतो भल्यासाठीच होत ते तुमच्या मनावरही घेवु नका. आणि सर्वात महत्वाचे हात जोडतो कृपा करुन घरातुन बाहेर येवु नका. कालपर्यंत तुम्ही आम्हा पोलिसांना शिव्या घालत होता... पण लोकांनी एकदा विचार करावा की ड्युटी संपताच पुन्हा ड्युटी लागणाऱ्या पोलीसाला कसं वाटत असेल? आज तोच पोलीस तुमच्यासाठी मृत्युच्या दारात चालतोय, घरदार सोडुन तुमच्यासाठी जीव पणाला लावतोय, उन्हातान्हात Lockdown मध्ये जीव मुठीत घेऊन तुमच्यासाठी धावतोय. शेवटी जाणीव ठेवा ऐवढेच सांगतोय.

तुमच्यासाठी हा पोलीस रोज मृत्युशी झुंज देत फिरतोय, जीव घेण्या परिस्थितीमध्ये ही आपल्या कर्तव्याशी एकनिष्ट राहून प्रामाणिकपणे कर्तव्य बजावतो.

आम्हाला पांडू हवालदार म्हणणारे आज आम्हाला पांडुरंग बोलत आहेत हे शब्द त्यांच्या कडुन ऐकताना समाधान वाटतय. हा पोलीसरूपी पांडूरंग वर्दीतला देवमाणूस तुमच्यासाठी रात्र-दिवस राबतोय याची जाणीव नेहमी ठेवा ऐवढच सांगतोय. कस आहे ना; उदया मी नसेल तर माझी ड्युटी पूर्ण करण्यासाठी हजारो कर्तव्यदक्ष, प्रामाणिक, निष्टावंत पोलीस निर्माण होतील परंतु जर तुम्हाला काही झाले तर कुटुंबातील तुमची उणिव कोणीही भरून काढू शकणार नाही म्हणून सांगतोय,

"Stay Home, Stay Safe"

आम्ही पोलिस हा जनतेचा मित्र असल्याचे सांगितले जाते, पण जनता आणि आमच्यात नेहमीच एक अदृश्य अंतर असतेच. त्याला कारण आम्हा पोलीसाच्या अंगावरची खाकी वर्दी... या वर्दीच्या आतला माणुस नेहमीच सामान्यांसाठी कुठ असला, तरी तो ही माणुसच असतो. त्याला ही भावना असतात वेदना असतात, विवंचनाही असतात यासर्वांची जनतेला जाणीव झाली पाहिजे. तुमच्यासाठी जीवघेण्या परिस्थितीतही कर्तव्य बजावतो.

मी आज आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर आलोय म्हणून माझी शेवटची इच्छा म्हणून या खाकी वर्दी सोबतच माझा देहांत करा; कारण या वर्दीचा अभिमान आणि इमान आम्हा पोलिसांना खुप महत्वाचा आहे.

आम्हा पोलिसांना पांडुरंग होऊन कमरेवर हात ठेवून चालायचं नाही म्हणून आम्ही खाकीतले पोलीसचं बरे.

''काळजी घ्या, सहकार्य करा आणि घरात राहा!''

कोरोना सोबत लढा देणाऱ्या डॉक्टर्स, सफाई कर्मचारी तसेच आपले रक्षण करणाऱ्या सर्व पोलिसांना मानाचा मुजरा.

# कोरोना-समज गैरसमज

■ भक्ती संतोष टाले
बी.ए. जेएमसी भाग-३

दुपारची वेळ होती. जेवण झाल्यावर आजी ओसरीत बसली होती तिला पाहून दुसरी मग तिसरी आणि मग चौथी अशा चौघीजणी ओसरीत जमल्या त्या चौघींच्या चर्चेचा विषय होता कोरोना आणि लॉकडाऊन पण त्या जी काही चर्चा करत होत्या ती सर्व खोटी होती अजून पर्यंत खरी आणि बरोबर माहीती त्यांच्यापर्यंत पोहचली नव्हती. आजीची नात जवळचं उभं राहून सारं काही ऐकत होती जेव्हा तिला कळलं की यांना अजून व्यवस्तित काही माहिती नाही तेव्हा तिने बोलायला सुरुवात केली.

नात :- आजी, तुम्ही जे काही बोलताय ते सगळंखोटं आहे तुमच्यापर्यंत चुकीची माहिती पोहचली आहे आणि चुकीच्या बातम्या.

आजी :- पण या बातम्या आणि माहिती तर फेसबुक, व्हाट्सअप्पवर आलेली आहे.

नात :- आजी... त्या सर्वच बातम्या, माहिती काही खरी नसते तिचे फेकन्युज असतात.

आजी :- तुला खरं काय ते माहीत असेल न, मग सांग की,

नात :- हो सांगते, कोरोना म्हणजे कोविड १९ या नावाचा हा चिनी व्हायरस आहे याची निर्मिती चीनमध्ये झाली आणि प्रसार सुद्धा चीनमधूनच झाला यावर लस शोधणं सुरू आहे याचे सॅम्पल घेतांना नाकातून घेतात.

आजी :- सॅम्पल घेतल्यावर त्यापेशंटला तिथेच ठेवतात म्हणे खरं आहे का ?

नात : हो तिथेच ठेवतात जर तो पेशंट पोझिटीव्ह असेल तर त्याच्या संपर्कातील इतरांना कोरोना होऊ शकतो म्हणून तो पेशंट तिथेच राहतो म्हणजेच रोगाचा प्रसार होणार नाही.

आजी :- आपण सुरक्षित राहण्यासाठी कशी काळजी घ्यावी? काय करावं ?

नात :- आपण आपली काळजी घ्यावी म्हणजे आपण कुठे बाहेर जायचे नाही. नेहमी सॅनिटायझरचा वापर करावा, कोणाशी हात मिळवू नये, मास्कचा नेहमी वापर करावा, भाजीपाला धुवून घ्यावा, फास्ट फूड टाळावे, असे काही नियम पाळावे लागतील फक्त.

आजी :- बरं झालं बाई तू आमचे गैरसमज दूर केलेत.

नात :- आता तुम्ही इतरांचे गैरसमज दूर करा तुमच्या मैत्रिणींचे, परण्यांचे वगैरे.

आजी :- हो आम्ही नक्की करू.

# अफवेच्या बाजारात देशाची करुणावस्था

■ प्रशांत निर्मला शिवा
एम.ए. जेएमसी भाग-१

''कोरोना बोले तो पैसे कमाने का धंदा ही है. वो मोदी सर से चीन वालो ने झगडा किया है इसीलिये उनोने ये कोरोना भेजा. पर अपने इंडियावाले भी उसको खतम देंगे. अपने लोगो को ये नवी होता जो लोग चीन के साथ हो उनको हि ये होता है'' अमरावती शहरातील रमेश नामक ५६ वर्षीय सायकल रिक्षा चालकाचे हे मत. हे मत काय सिद्ध करते? कुणाचा संबंध इथे दिसत? ह्या अफवा कशा पसरल्या असतील राजकीय पक्षांनी ह्या अफवा पसरविल्या कि माध्यमांनी? कि आपल्या सगळ्यांना सुपरिचित असलेल्या सोशल मीडिया युनिव्हर्सिटीने. हे समजून घेण्याकरिता काही महत्वाच्या बाबी समजून घ्याव्या लागतील.




देशात ३ मिनिटाला २ मृत्यू टीबीने, तर २०१७ च्या NCRB च्या रिपोर्ट नुसार ३ मिनिटात १ शेतकरी आत्महत्या करतात मात्र देशात सर्वाधिक चर्चा कोरोनाची आहे. तेव्हा हे समीकरण समजून घेणे गरजेचे. चार लोग एक जगह पर न आयीये ''म्हणणारे पंतप्रधान मोदी आणि प्रथमच देशात मोबाईल कंपन्यानी खोकला डायलर टोन लावली. म्हणूनच कोरोना हि आमच्या देशाची करुणावस्था ठरली आहे. कोरोना नावाचा एक व्हायरस आला आणि जगाने धास्ती घेतली, ज्या चीनमध्ये हा व्हायरस जन्माला आला त्या चीनचा निवडक भाग सोडला तर सर्व व्यवहार सुरळीत आहेत मात्र भारताला मात्र मोठा फटका बसला मात्र जगाला याची मोठी किंमत मोजावी लागली आहे. एक डॉक्टर म्हटले, अहो व्हायरस कमी आणि अफवाच वेगाने पसरत आहेत, या अफवेच्या मागे कोण आणि कुणाचा हेतू असतो हे सांगणे कठीण मात्र परिणाम त्यांना सुद्धा भोगावेच लागत आहेत. कोणत्या आहेत या अफवा? कोविड झाला तर पैसे मिळतात, हा व्हायरस म्हणजे चीन ची चाल, हे तिसरं महायुद्ध आहे, कोविड नाहीच हे फक्त गरिबांना लुटायचे धंदे आहेत, टेस्ट केली म्हणजे १००% positive येतेच अशा कित्येक. येथे फक्त समाजात फिरत असणाऱ्या अफवांना बघणे गरजेचे नाहीये तर राजकीय अफवा सुद्धा लक्षात घेणे गरजेचे आहे. जसे कि, केंद्राच्या म्हणण्यानुसार आम्ही थाळ्या वाजवल्या आणि दिवे सुद्धा लावले मात्र कोरोना आणि अफवा थांबल्या नाहीत. राज्याने देखील आमची तयारी पूर्ण झाली आहे त्यामुळे विना वैद्यकीय सेवेने कुणालाही आपले प्राण गमवावे लागणार नाही असे आश्वासन दिलेच होते मात्र उदा. द्यायचे झाल्यास पांडुरंग रायकर या पत्रकाराचा कोविड मृत्यू याच आश्वासनाची पोल उघडते. त्यामुळे अफवा सामाजिक असो अथवा राजकीय त्या कोरोनापेक्षा जास्तच पसरल्यात. त्यामुळे हे आपल्या व्यवस्थेचे दुर्दैव नाही काय? पोल्ट्री हा व्यवसाय करणारे किती तरी शेतकरी आर्थिक अडचणीमध्ये सापडले, खोट्या अफवेने कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले याला कारण आपण या अफवांवर विश्वास ठेवला म्हणून. आधीच शेतकरी जास्त किंवा कमी पावसामुळे अडचणी आला आता हि परिस्थिती थोडी सुधारली पण येणाऱ्या काळा काय? थोडं मागे वळून बघितलं तर कित्येक वर्षापासून मानवजातीला अनेक साथीच्या रोगांना सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे कोरोना काही नविन नव्हे. पण विज्ञान आणि तंत्रज्ञान यातून विकसित असलेल्या जगातील मानव ह्या बुद्धिमान प्रजातिला कोरोनशी लढने जरा





अवघडच जातयं. ३१ डिसेंबर, २०१९ रोजी, जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) चीन कार्यालयाने पूर्वेकडील चीनमधील ११ दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असलेल्या वुहानमध्ये निमोनियाच्या अनेक घटनांमागील विषाणुचे प्रथम अहवाल बघीतले. हा आजार वुहान सीफूड मार्केटमधून उद्भवला आहे असे म्हणणे आहे. जेथे जंगली जनावरे, ज्यात मॉरमोट्स, पक्षी, ससे आणि साप यांचा, श आहे. कोरोनाव्हायरस प्राण्यांपासून माणसांकडे जाण्यासाठी ओळखले जातात, म्हणून असा विचार केला जातो की रोगाचा संसर्ग होणारे प्रथम लोक मुख्यत: सीफूड मार्केटमधील स्टॉलधारक असू शकतात. सुरुवातीला जिथे चीनचा हा हलगर्जीपणा इतर देशांना एवढा मोठा वाटत नसला तरी जेव्हा भारतात पहिला ३० जानेवारी रोजी कोरोना बाधित रुग्ण सापडल्याने देशात भितीचे वातावरण झाले. आज रोजी भारतात १५ सप्टेंबर नुसार ४९ लाख रुग्ण सापडले आहेत. मात्र यापेक्षा अधिक संख्येत लोक अफवेच्या व्हायरसने ग्रस्त झालेत. याला कारणीभूत जगाच नेतृत्व करणारे नेतेच. कधी ट्रम्प यांचे जबाबदारी झटकणारे विधान जसे कि, ''हा व्हायरस चीनने मुद्दाम बनविला तर WHO ने त्यांना साथ दिली.'' असे विधान, तर कधी ब्राझीलच्या बोल्सुनारो यांचे रोजगारकडे दुर्लक्ष करणारे विधान. रशिया, चीन, भारत सारख्या अनेक मोठ्या देशांनी अशा चुका केल्या आहेत ज्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. मात्र ह्या सर्व चर्चेत काही महत्वाचे मुद्दे मागच राहिले. कोरोनाच्या अपप्रचाराने, वाढत्या लॉकडाऊन आणि बेरोजगारीने ज्या कोट्यावधी मजुरांना स्थलांतरन करावे लागेल हे चित्र फाळणी प्रसंगीचा भारत दाखविणारे होते. या स्थलांतरणामुळे ४९८ पेक्षा जास्त मजुरांना पायी चालताना जीव गमवावा लागला तर श्रमीक स्पेशल ट्रेनमध्ये उपाशी पोटी ९७ लोकांचा जीव गेला. मात्र बातमी झाली ती फक्त औरंगाबादच्या रेल्वे खाली मेलेल्या १६ मजुरांची आणि त्यातही सुप्रीम कोर्ट यावर उत्तर देत कि 'रेल्वे रूळ हे झोपण्यासाठी नव्हे कुणी रुळावर जावून झोपत असेल तर त्याला कुणी कस थांबवणार' हे उत्तर सिद्ध करते कि कोरोनामध्ये अफवांच्या आड देखील सरकारे बचावली, काही दगावली तर काही त्यामार्गाने आहेत. भविष्यात कोविड काळातील बातम्या हेच सांगतील कि विकास, राष्ट्रवाद नावाच्या फेकून्यूज, होत्या ज्यामुळे लोकशाही राष्ट्रे संपली.....

## अमरावतीचे लॉकडाऊन : छायाचित्र दर्शन


इतवारा बाजारातील गर्दीला पांगवताना पोलीस


चित्राचौक ते इतवारा बाजार संपूर्ण लॉकडाऊन


छत्रीतलाव जवळील पर्यायी बाजार


परपोच भाजीपाला सेवा देताना शुभम वानखडे

# कोरोना-निदान आणि उपचार

■ अनुयोग पावडे
एम.ए.जेएमसी -१



कोरोना इलाजा बाबतीत विविध माध्यमातून अनेक समज/गैरसमज पसरत आहेत. त्याचे निदान आणि उपचार संदर्भात समाजात अनेक संभ्रम निर्माण झाले आहेत. त्यामुळे या मुलाखत/लेखाद्वारे, कोरोनाचा इलाज आणि निदान करणारा तज्ज्ञ डॉक्टरांकडून, शास्त्रशुद्ध माहिती सुज्ञ आणि जिज्ञासू वाचकांसाठी उपलब्ध करण्याचा प्रयत्न करत आहोत.

माहितीदाते :

AP - डॉ. अभिषेक पिंप्रोळेकर (फिजिशियन)

DW - डॉ. दिनेश वाघ (फुफ्फुस / छाती रोग तज्ज्ञ)

RM - डॉ. रुपाली माळी (सूक्ष्मजीव/विषाणूतज्ञ)

आणि

प्रश्नकर्ते, शब्दांकन आणि लेखन :

SF - डॉ. समीर फुटाणे (न्यूरोसर्जन)

१) एखाद्या व्यक्तीला कोरोना संसर्ग झाला असेल अशी शंका केव्हा घ्यावी ?

DW - ताप (आणि सतत येणारा आणि वाढणारा), अंगदुखी, थकवा, चव आणि वास लक्षात न येणे, सुका खोकला, धाप लागल्या सारखे होणे. ऑक्सिमीटर असल्यास त्यावर आधी-पेक्षा ऑक्सिजनची मात्रा कमी होणे. इत्यादी लक्षणे असल्यास सद्यपरिस्थितीमध्ये कोरोनाची शक्यता गृहीत धरावी आणि त्वरित डॉ ना भेटावे.

२) पण ही लक्षणे तर इतर नेहमीचे आजार जसे डेंगू, मलेरिया, लघवीचे इन्फेक्शन मध्ये पण येऊ शकतात ?

AP - अगदी खरे आहे. पण सध्या ज्या आजाराचा जगभर प्रादुर्भाव/साथ आहे, संख्याशास्त्रा (स्टॅटिस्टिकली) नुसार त्याची शक्यता सगळ्यात जास्त असते, त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करून, इतर निदानाचा प्रथम विचार करणे संयुक्तिक ठरणार नाही. कोरोना नसल्याचे पक्के झाल्यास, दुसऱ्या आजारांचा जरूर विचार केला जातो. साथी-नुसार हे निदान बदलत जातात.

३) बरं ! मग अश्या पेशंटच्या निदानासाठी कोरोनाची टेस्ट पुरेशी आहे का ?

AP - नाही. पेशंटची लक्षणे, ऑक्सिजन लेवल, छातीचा सिटी स्कॅन (HRCT Chest) किंवा एक्स रे आणि स्वाब (कोरोना) टेस्ट या तिहेरी गोष्टींचा विचार करून निदान केले जाते. छातीचा सिटी स्कॅन, यामध्ये अतिशय महत्वाचा आहे कारण कोरोनाच्या न्यूमोनियाची अगदी विशिष्ट लक्षणे सिटी स्कॅनवर खूप लवकर आणि खात्रीलायक रित्या दिसून येतात.

नुसता विषाणू (वायरस) शोधणे नाही, तर त्याने होणारे शरीरा वरील विशिष्ट परिणाम याचे समीकरण सोडवणे यात महत्वाचे आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे पडलेला गुन्हा आणि ते करू शकणारा गुन्हेगार ह्या दोघांचा मेळ घालणं गरजेचं आहे.

काही व्यक्तींची टेस्ट पॉजिटीव्ह आलेली आहे पण त्याना काहीच लक्षणे नाहीत असे असल्यास त्यांना asymptomatic carrier म्हटले जाते. याचे कारण म्हणजे नैसर्गिक रित्या यांच्या शरीराच्या इम्युनिटीने विषाणू नेस्तनाबूत केला असू शकतो. पण यांना स्वत:ला त्रास नसला तरी इतरांना त्यांच्यापासून संसर्ग होऊ शकतो.

४) कोरोना Swab test कशी केली जाते आणि त्याचा अर्थ काय ?

RM - स्वाब स्टिक द्वारे नाक आणि घशातील स्त्राव जमा केले जातात. त्या स्त्रावामध्ये विषाणू आहे किंवा नाही यासाठी, RT-PCR या अद्ययावत तंत्रज्ञानाने विषाणूच्या गाभ्याचा (nucleus, RNA) चा शोध घेतला जातो. ही प्रक्रिया संगणीकृत असते. ह्या प्रक्रियेला साधरण बारा ते चोवीस तास लागतात. सध्या निदानासाठी





RT-PCR किंवा Trunat सगळ्यात जास्त प्रमाणात वापरली जाते. त्याशिवाय विषाणूच्या कवचावरील प्रतिजनाचा (अँटीजेन) शोध सुद्धा काही रॅपिड कार्ड टेस्ट द्वारे केला जाऊ शकतो. अँटीजेन टेस्ट पॉजिटीव्ह असल्यास निदान लगेच पक्के करता येऊ शकते. विषाणूसंसर्गामुळे शरीरात प्रतिद्रव्य (अँटीबॉडी) तयार होते, हे सुद्धा कार्ड टेस्ट द्वारे तपासता येऊ शकते. त्यामुळे संसर्ग होऊन गेला आहे किंवा नाही याबद्दल अनुमान करता येते.

या सगळ्या तपासण्याची गरज वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये पडते. मुख्य म्हणजे प्रत्येक टेस्टला स्वत:च्या मर्यादा आहेत, कुठलीच टेस्ट पूर्णत: फुल-प्रूफ नसते.

५) ओके! स्वाब टेस्ट निगेटिव्ह असेल तर याचा अर्थ काय? म्हणजे कोरोना नाहीये असा होतो का RM - स्वाब टेस्ट (RTPCR) आजाराच्या कुठल्या दिवशी घेतली गेली आहे, विषाणुसंख्या (Viral load) किती आहे, स्वाब व्यवस्थित जागेवरून (नाकातील किंवा घशातील) घेतला गेला आहे का, लॅब पर्यंत नेणारी कोल्ड चेन/शीतसाखळी (म्हणजे ट्रान्सपोर्ट) व्यवस्थित आहे का इत्यादी अनेक बाबींवर अवलंबून आहे.

आजारपणाच्या पहिल्या आठवड्यात सुद्धा ही टेस्ट साधारणत: फक्त साठ टक्के रूग्णामध्ये पॉजिटीव्ह येते. नंतरच्या आठवड्यात तर त्याहून कमी. टेस्ट ज्या भागातून घेतली गेली तेव्हा तिथे विषाणुसंख्या किती आहे त्यावरही रिपोर्ट अवलंबून असतो. त्यामुळे एखाद्या लॅब मध्ये निगेटिव्ह आलेली टेस्ट दुसरीकडे पॉझिटिव येऊ शकते किंवा उलटे सुद्धा होऊ शकते. यात काहीही आश्चर्याचे नाही. शीतसाखळीत डिफेक्ट आल्यास सुद्धा रिपोर्ट निगेटिव्ह येऊ शकतो.

संख्याशास्त्रानुसार (statistics) प्रत्येक टेस्टला काही सेन्सिटिव्हिटी आणि स्पेसिफिसिटी असते. त्यामुळे निदानासाठी टेस्ट च्या पॉजिटीव्ह रिपोर्टचा दुराग्रह धरणे अ-शास्त्रीय आहे. आधी सांगितल्या प्रमाणे पेशंटची लक्षणे ह्यात सगळ्यात महत्वाची आहे. शिवाय छातीचा सिटी स्कॅन सुद्धा महत्वाचा पुरावा देऊ शकतो.

कित्येक रूग्ण अतिगंभीर परिस्थितीला पोहचून सुद्धा त्यांचे स्वाब टेस्ट निगेटिव्ह राहिलेले आहेत. केवळ टेस्ट निगेटिव्ह आहे म्हणून कोरोना नाही (इतर पुरावे असताना) असे म्हणणे म्हणजे ढगाळ वातावरणात ऊन नसेल तर आज सूर्यच उगवला नाही असे म्हणण्यासारखे आहे.

६) बरं । टेस्ट पॉझिटिव आली किंवा नाही आली आणि संयुक्तिक लक्षणे आणि सिटी स्कॅन वगैरे आल्यावर, मग पुढे काय केले जाते ?

DW - पेशंटचे वय, त्याला आधीपासून असलेल्या व्याधी (डायबेटीस, दमा, उच्च रक्तदाब इ), सध्याच्या त्रासाची तीव्रता (म्हणजे दम लागणे किंवा न उतरणारा ताप, हृदयगती), ऑक्सिजन लेवल, सिटी स्कॅनवर दिसत असलेला फुफ्फुसांचा डॅमेज अशा अनेक गोष्टींचा हिशोब लावून रूग्णांची तीन भागात वर्गवारी करण्यात येते.

ज्यांना फार तीव्र लक्षणे नाहीत अशा व्यक्तींना (mild) गटात ठेवलं जातं. ज्यांना तीव्र लक्षणे आहेत, ऑक्सिजन पुरवठा लागतोय असे पेशंट मध्यम (moderate) गटात मोडतात. त्याहीपेक्षा तीव्र लक्षणे आणि ऑक्सिजनवर पूर्णत: अवलंबून असणाऱ्यांची तीव्र (severe) गटात वर्गवारी करण्यात येते. या वर्गवारी नूसार इलाज-क्रम (ट्रीटमेंट प्रोटोकॉल) ठरतो.

७) सगळ्या रुग्णांना ऍडमिट केले जाते का ?

DW - नाही. सगळ्यांनाच ऍडमिशनची गरज नसते. बहुतांशी रुग्ण सौम्य गटात येतात. सौम्य गटातील रुग्णांना शक्यतो होम-आयसोलेशन (गृह-विलगीकरण) चा सल्ला दिला जातो. अर्थात ज्यांच्याकडे स्वतंत्र खोली (वेगळ्या संडास/बाथरूम सकट) असेल, ऑक्सिमीटर वापरण्याची सुविधा आणि लागल्यास तात्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध करता येत असेल तरच होम-आयसोलेशन वापरावे. अन्यथा अशा रूग्णांना कोविड केअर सेन्टर (CCC) मध्ये भरती करता येऊ शकते. बहुतेक रुग्णांना सौम्य लक्षणे असतात आणि त्यांची प्रगती पण समाधानकारक असते. सुदैवाने बऱ्याचशा रुग्णांना फारसा काही त्रास होत नाही.

पण पहिले दोन आठवडे त्यांच्या-पासून इतरांना संसर्ग होण्याचा धोका फार असतो म्हणून साधारणत: पंधरा दिवसाचे विलगीकरण केले जाते. त्यानंतर हा धोका नगण्य होतो. म्हणून वैयक्तिक त्रास किंवा धोका फारसा नसेल तरीही विलगीकरणाची प्रक्रिया पार पाडावी लागते. म्हणून कोविड केअर सेन्टर (CCC) मधील रुग्ण पूर्णत: निरोगी भासतात.

अर्थात इतर दोन्हीही गटातील पेशंटना ऍडमिट करणे अत्यावश्यक असते. सौम्य गटातील काही व्यक्तींची प्रकृती खराब होऊन त्यांना सुद्धा हॉस्पिटल मध्ये ऍडमिट करण्याची गरज केव्हाही लागू शकते.

८) कोविड-१९ हा विषाणू शरीरात गेल्यावर नक्की काय होतं ?

AP - हा विषाणू श्वासावाटे फुफ्फुसामध्ये स्थिरावतो आणि तिथल्या पेशींना नुकसान करू लागतो. फुफ्फुस हवे तून आलेला ऑक्सिजन शरीरामध्ये शोषून घेण्याचे काम करते. विषाणूबाधीत पेशी योग्य तेवढा ऑक्सिजन शोषून घेऊ शकत नाही. ऑक्सिजनची मात्रा कमी होऊ लागते म्हणून रुग्णाला धाप लागते.

विषाणूची एन्टी होताच शरीराची प्रतिकार क्षमता (Immune System) लगेच कार्यान्वित होते. पण विषाणू आणि

इम्युनिटी च्या युद्धात शरीराचं पण नुकसान व्हायला लागतं (innocent by stander effect). त्यामुळे फुफ्फुसांवर सूज येणे, रक्ताच्या गुठळ्या बनण्याचं प्रमाण वाढणे इ.

ऑक्सिजन आणि रक्त पुरवठा कमी झाला की सगळ्या अवयवांची कार्यक्षमता कमी होऊ लागते. काही तरुण व्यक्तींमध्ये हृदयाचे स्नायू शिथिल होऊ लागतात (Viral myocarditis). काही रुग्णामध्ये स्वतःची इम्युनिटी अति प्रमाणात काम करते त्यामुळे सायटोकाईन स्टॉर्म (विषाणू-विरोधक स्त्रावाचा अतिरेक) येतो. ही सगळ्यात बिकट परिस्थिती असते. या सगळ्या प्रक्रिये मुळे धाप लागणे, हृदय गती वाढणे, ताप चढत जाणे, लघवी कमी होणे, छातीत दुखने इत्यादी लक्षणांना सुरुवात होते.

सुदैवाने बहुंशी सदृढ रुग्णांचे शरीर या सगळ्या प्रकाराला यशस्वीरित्या सामोरे जाते आणि दोनेक आठवड्यात त्यांची सुधारणा होऊ लागते. परंतु काही वयस्कर किंवा दमा किंवा डायबेटीस, कॅन्सर, अतिस्थूल (obese) असलेले रुग्ण हे अंतर्गत विषाणू-विरोधक युद्ध सहन करू शकत नाहीत. अनपेक्षितपणे काही सुदृढ आणि तरुण असलेल्या व्यक्ती सुद्धा या सायटोकाईन स्टॉर्मला बळी पडतात.

या सगळ्याचा परिणाम म्हणून फुफ्फुसाची आणि हृदयाची कायमस्वरूपी क्षमता कमी होण्याची (Lung fibrosis, myocarditis) शक्यता पण नाकारता येत नाही. कुठल्या व्यक्तीमध्ये हा आजार कसे वळण घेईल याबद्दल ठोकताळा बांधणे सध्यातरी कठीण आहे. म्हणून सरसकट सगळ्यांनी काळजी घ्यावी असे आवाहन केले जाते.

मध्यम किंवा तीव्र स्टेज मधून संपूर्णतः सुधारणा झालेल्या काही जणांना या आजाराचे दूरगामी परिणाम भोगावे लागण्याची पण शक्यता असते.

८) कोविड-१९ या विषाणू-वरती काहीच इलाज नाहीये असं म्हणतात, हे खरं आहे का ?

AP & DW - असं आहे बघा, कोविड-१९ च नाही तर इतर कुठल्याही आजारासाठी उपाययोजना साधारणतः चार प्रकारे विभागली जाते, १) प्रतिबंध (Prevention), २) क्युअर (cure), ३) नियंत्रण (control) व आधार (supportive) आणि ४) उपशमन (Palliation).

आजार होण्यापासूनच रोखला जावा म्हणून प्रतिबंधात्मक उपाय असतात. कोरोना प्रतिबंधासाठी शासन-दर्शित उपाय-योजना आपल्या सगळ्यांनाच माहिती आहेच. व्हॅक्सिन संदर्भात युद्धपातळीवर प्रयोग सुद्धा सुरू आहेत.

क्युअर म्हणजे डायरेक्ट विषाणू-नाशक औषधी, Fabipiravir आणि Remdesivir ही औषधे काही प्रमाणात कोरोनासाठी विषाणू नाशक म्हणून काम करतात अर्थात त्याला फार मर्यादा आहेत. ओव्हरऑल बघायचं झालं तर, कोरोना सोडून इतर बऱ्याच आजारांवरती सुद्धा क्युअर उपलब्ध नाहीयेत. किंबहुना काही विशिष्ट जंतुसंसर्गावरतीच डायरेक्ट इलाज उपलब्ध असतात. याचा अर्थ अश्या आजारांचा इलाज होतच नाही असे अजिबात नाही. वैयक्तिक इम्युनिटी आणि त्याला सपोर्ट करणारी औषधे असे दोन्ही मिळून काम करत असतात. नियंत्रण हा सगळ्यात महत्वाचा भाग आहे. बहुतेक आजारांमध्ये शरीराला होणारा डॅमेज कंट्रोल करणे अत्यावश्यक असते. उदाहरण द्यायचे झाले तर, समजा काही अतिरेकी बॉम्बस्फोट करून पसार झाले तर त्यांना नुसतं पकडून किंवा मारून, स्फोटाने झालेले नुकसान भरून निघणार नाही. स्फोटामुळे झालेल्या हानीसाठी पण काहीतरी आपत्ती व्यवस्थापन (disaster management) करावे लागते. त्याच-प्रकारे नुसते विषाणू मारल्याने पूर्ण फायदा होत नाही. (आधी सांगितल्या प्रमाणे) इम्युनिटी आणि विषाणू यांच्या युद्धात होणारे नुकसान सुद्धा मर्यादित करणे तितकेच महत्वाचे असते. यासाठी Tocilizumab, स्टिरॉइड्स, cytosorb इत्यादी औषधे वापरली जातात.

त्याशिवाय ताप, खोकला, अंगदुखी इत्यादी शारीरिक त्रास कमी करण्यासाठी PCM, व्हिटॅमिन, कफ सिरप दिली जातात. सगळ्यात महत्वाचे म्हणजे ज्या पेशंटमध्ये प्राणवायूचे प्रमाण कमी होते त्यांना, ऑक्सिजन पुरवठा सतत सुरू ठेवावा लागतो.

वायरल इन्फेक्शन मुळे शरीराची प्रतिकार क्षमता थंडावते, फुफ्फुसे खराब होतात त्यामुळे इतर जंतुसंसर्ग (bacterial infection) पण जोर धरतात, ते ओळखून त्यावर पण प्रति-जैवके (अँटिबायोटिक्स) वापरावे लागतात.

रक्ताचं गुठळी होण्याचं प्रमाण वाढत असल्याने रक्त पातळ करणारी औषधे द्यावी लागतात. आधीच्या एखाद्या पूर्ण बऱ्या झालेल्या रुग्णाचा प्लाझ्मा (रक्तघटक) देण्याचा प्रयत्न सुद्धा केला जातो. याद्वारे दुसऱ्या व्यक्तीमध्ये ॲन्टीबॉडी तयार असलेली प्रतिकार क्षमता आयती वापरता यावी यासाठी ही कल्पना पुढे आली आहे.

शेवटी ज्या रुग्णांची परिस्थिती अगदी जास्त हाता बाहेर गेलेली असते, अशा रुग्णांसाठी palliation म्हणजे थोडक्यात शेवटचा प्रयत्न म्हणून काही ऑप्शन्स वापरावे लागतात यामध्ये इंव्हेजीव व्हेंटिलेशन, ECMO (Extra corporeal membrane oxygenator), tracheostomy असे काही पर्याय असतात.

९) सौम्य किंवा मध्यम तीव्रतेच्या आजारावरती काय इलाज असतात?

DW - सौम्य तीव्रतेच्या रुग्णांना hydroxychloroquine (HCQ), Fabipiravir आणि सपोर्टिव्ह औषधे दिली जातात आणि





ऑक्सिजन-चे प्रमाण चेक करण्यात येते. आजार पुढे बळावण्याच्या शक्यतेकडे लक्ष दिले जाते. नशिबाने ९०% पेक्षा जास्त रुग्ण यात विशेष त्रास न होता बरे होतात. मध्यम तीव्र गटामधल्या रुग्णांना फार जपावे लागते कारण अतिशय वेगाने कुठल्याही क्षणी अतिगंभीर परिस्थिती मध्ये रूपांतर होण्याची शक्यता असते. फिजिओथेरपी, पोटावर झोपवून, ४५ अंशात बसते करून येनकेनप्रकारे त्यांच्या फुफ्फुसाची क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला जातो, जेणेकरून ऑक्सिजन चे प्रमाण वाढीस लागेल. योग्य त्या वेळी विषाणू-नाशक औषधे आणि सायटोकाईन स्टॉर्म आटोक्यात आणणारी औषधे दिली जातात. उच्चदाबाने ऑक्सिजन पुरवठा करणारी यंत्रे (HFNC, BiPAP) वापरून प्राणवायू चे योग्य प्रमाण राखले जाते. योग्य आणि वेळेवर इलाज झाल्यास ८०% च्या आसपास रुग्ण या परिस्थितीतून सहीसलामत बाहेर पडू शकतात.

सौम्य गटातील रुग्णाचा आजार बिघडत चालला आहे हे ओळखण्यासाठी अनुभवी तज्ज्ञाची गरज असते कारण सुरुवातीला पेशंटला स्वतःला फारशी लक्षणे जाणवत नाही आणि अचानक तब्येत ढासळायला लागते. त्यामुळे कोरोनाची शंका असल्यास अजिबात वेळ न दवडता तज्ज्ञांचा सल्ला घेणे उत्तम ठरेल.

१०) तीव्रता वाढलेल्या रुग्णामध्ये आणखी काही तपासण्या केल्या जातात का ?

AP - हो नक्कीच. रक्त तपासण्या (CBC, ESR, CRP, Ferritin, D dimer, IL 6, RFT इत्यादी) प्रामुख्याने केल्या जातात. या रिपोर्टवर तब्येत बिघडते आहे का याचा अंदाज लावता येतो आणि ट्रीटमेंटने काही फरक पडतो आहे का याचाही अदमास घेता येतो. छातीचा एक्स रे, ABG (arterial blood gas) सुद्धा आजाराची प्रगती बघण्यासाठी जवळ जवळ दररोज केले जातात.

११) अतिगंभीर रुग्णांवर काय इलाज केले जातात ?

AP - अतिगंभीर कोरोना न्यूमोनिया हा अतिशय चिंताजनक आजार आहे. उच्च दाबाने/प्रवाहाने प्राणवायू देऊन सुद्धा जेव्हा धाप लागणे कमी होत नाही. कमी ऑक्सिजन मुळे मेंदू, हृदय, किडनी वर परिणाम व्हायला लागतो तेव्हा परिस्थिती अतिगंभीर होते आहे असं समजलं जातं. श्वसनलिकेत नळी टाकून व्हेंटिलेटर (कृत्रिम श्वसन) सपोर्ट द्यावा लागतो. सगळ्या प्रकारची औषधे (सायटोकाईन स्टॉर्म किंवा hyper-immune response आटोक्यात आणणारी) वापरली जातात. श्वासनलिकाछिद्र (tracheostomy) करण्याची गरज भासते. बरेच रुग्ण या फेज मध्ये इतर जिवाणूसंसर्गाला बळी पडतात. या स्टेज मधून वाचण्याची शक्यता फक्त ८-१०% असते.

कुठला रुग्ण या अतिगंभीर गटात जाईल याची शाश्वती देणे अवघड असते. कधी कधी इतर अनेक आजार असलेले वयस्कर रुग्ण यातून बाहेर पडतात आणि सुदृढ तरुण व्यक्ती याला बळी पडतात. कोरोना संदर्भातील सगळी भीती ही या गटामुळे प्रकर्षाने जाणवते.

११) साधारणपणे किती कालावधी रुग्ण बरा होण्यास लागतो ?

DW - साधारणतः २ ते ३ आठवड्यांचा कालावधी रिकव्हरी ला लागतो जेव्हा आजार साधारण स्वरूपाचा असतो. अर्थातच अतिगम्भीर रुग्णांना कितीही दिवस लागू शकतात.

१२) रुग्ण बरा झाला आहे हे सिद्ध करण्यासाठी, पुन्हा कोरोना स्वाब निगेटिव्ह येणे गरजेचे असते का ?

AP - अजिबात नाही. रुग्णाची प्रकृती स्थिरावरली, विना ऑक्सिजन, दम न लागता कमीत कमी ६ मिनिटे चालता येऊ लागले, ताप संपूर्ण उतरला, रक्ताचे रिपोर्ट सगळे नॉर्मल आले की बहुतेक रुग्ण बरे झाले आहेत असे ठरविता येते. कोरोना स्वाब टेस्ट करणे यात गरजेचे नाही. स्वाब टेस्ट कित्येक दिवस पॉजिटीव्ह राहू शकते (रुग्ण पूर्ण बरा झालेला असताना सुद्धा) आणि साधारणतः २ आठवड्याने अशा रुग्णापासून दुसऱ्याला संसर्ग होण्याची शक्यता पण नगण्य असते.

ज्या रुग्णामध्ये स्वाब टेस्ट कधीच पॉजिटीव्ह आलीच नाही अश्या व्यक्तींमध्ये IgGanitbody पॉजिटीव्ह येते. कोरोना विरोधात प्रतिकार क्षमता विकसित झाल्याचे हे द्योतक असते.

१३) ओके ! हे सगळं मान्य. पण कोरोनावर काही १००% इलाज नाहीये का ?

AP & DW - व्यक्ती तितक्या प्रकृती अशी आपल्याकडे एक म्हण आहे. वैद्यकीय दृष्ट्या त्याचा अर्थ असा आहे की प्रत्येक व्यक्तीची शरीर-रचना, फिजिओलॉजी ही वेगळी असते. कुठलंही औषध किंवा इलाज हा ढोबळमानाने जास्तीतजास्त व्यक्तींना फायदा होतो आहे असा संख्याशास्त्रीय निष्कर्ष आल्याशिवाय वापरला जात नाही. परंतु वापरात आल्यावर सुद्धा प्रत्येक डॉक्टरांना आपल्या रुग्णात दिसणारा प्रतिसाद हा वेगवेगळा असू शकतो. कुठलाही इलाज किंवा औषध हे सर्वसमावेशक असेल अशी अपेक्षा करणं हे कदाचित निसर्ग-नियमाविरुद्ध ठरेल.

उदाहरणार्थ तापासाठी देण्यात येणारी साधी पॅरासिटॅमॉलची गोळी क्वचित काही जणांच्या यकृताला घातक ठरू शकते. याचा अर्थ पॅरासिटॅमॉल वापरू नये असा होत नाही, कारण अनेक वर्षांपासून लाखों लोकांना त्या गोळीचा फायदा झाला आहे/होतो आहे. कोणत्या रुग्णामध्ये कुठल्या औषधाचे दुष्परिणाम होतील किंवा फारसा फायदा होणार नाही असा खात्रीलायक अंदाज प्रॅक्टिकली लावणे शक्य नाही. शरीर हे मानवनिर्मित मशीन नाहीये. शरीराच्या कामकाजाबद्दल मानवाला काही प्रमाणात समज आली आहे परंतु

आपल्याला सगळं समजलं आहे असा दावा करणे म्हणजे निसर्गाची सूत्रे आपल्या हातात आहे असे म्हणणे होईल.

जे सध्यातरी शक्य नाही. त्यामुळे सध्या १००% इलाजचा वायदा करणे म्हणजे भूल-थापा आहेत हे सुज्ञास सांगणे गरजेचे नाही.

१४) कोरोना हे थोतांड आहे याबद्दल आपले काय मत आहे ?

SF + AP + DW -

एखाद्या अघटित किंवा भयभीत करणाऱ्या घटनांचे आकलन नाही झाले की त्याला अंधश्रद्धेचे रुप देण्याचा कमजोर मनाचा सहाजिक प्रयत्न असतो. यामध्ये अनाठायी भीती किंवा कमालीची बेफिकिरी हे दोन्हीही भाव




येतात. शास्त्रशुद्ध विचारसरणी असलेले मन मात्र घटनांचा खोलवर जाऊन तर्कसंगत विचार करते आणि त्या-संदर्भात ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करते. आणि तद-नुसार आलेल्या ज्ञानामुळे भीतीवर मात करण्यास मदत होते.

उदाहरण सांगायचे म्हणजे तीन शतकापूर्वी प्लेग या आजाराला परमेश्वराचा कोप, धर्माचा अवमान केल्याने होणारी अवकृपा समजले जात होते. पण पुढे चालून, काही तर्किकबुद्धी शास्त्रज्ञांनी त्यामागे Yerseniapestis नावाचे जिवाणू असतात आणि त्यांच्यावर प्रतिजैवके उपयोगी पडतात वगैरे असा शोध लावला. अश्या असंख्य शास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नाने प्लेग, स्मॉल पॉक्स, पोलिओ सारखे अनेक आजार आज हद्पार झाले आहेत किंवा त्यावर ठोस उपाय उपलब्ध आहेत. त्यांना अनेक विरोध झाले पण शेवटी हे सगळे शक्य झाले कारण काही सामान्य लोकांनी या विज्ञानाधिष्टीत विचारसरणीला महत्व दिले. कुठल्याही विज्ञानाला लोकाश्रयाची तितकीच गरज असते.

अर्थात आज जग पुढे चालले आहे तरी अ-शास्त्रीय विचारांचा ऱ्हास झालेला नाहीये. आलेल्या आपत्तीस इतर जबाबदार आहेत किंवा फक्त आपणच त्यात बळी आहोत किंवा असे काही नाहीच या खोट्या आनंदात राहणे ह्या तर्कभ्रष्ट वलग्ना आहेत.

त्यामुळे येणाऱ्या काळात लिहिल्या जाणाऱ्या जगाच्या इतिहासात, आपण सायंटिफिक विचारांच समाजभाग होतो की अतर्किक अनागोंदी (chaos) करणाऱ्या गर्दीचे, हे ठरवणे, प्रत्येकाचा वैयक्तिक हक्क आहे, ऐच्छिक बाब आहे यात शंका नाही.

कृपया नोंद घ्यावी:

१. कोव्हीडोलोजी (Covidology) हे अजून उलगडत जाणारे शास्त्र आहे. भविष्यात होणाऱ्या संशोधनानुसार इलाज प्रणालीत महत्वाचे बदल होणे अपेक्षित आहेत. त्यामुळे प्रस्तुत लेखातील माहिती ही फक्त आत्ता-पुरती सत्य आहे. परंतु त्यात नक्कीच आमूलाग्र बदल घडत राहतील.

२. प्रस्तुत माहिती जन-सामान्यासाठी आहे. यात कुठलाही विशिष्ट ट्रीटमेंट प्रोटोकॉल सुचवण्याचा प्रयत्न नाहीये.

३. या लेखाचा एकमेव उद्देश कोविड-१९ आणि त्याच्या इलाजाबद्दल विज्ञाननिष्ट दृष्टिकोन विकसित व्हावा असा आहे.

४. कोविड संदर्भात सगळी माहिती इंग्रजीत उपलब्ध असल्याने, मराठीतून भाषांतर करताना काही अनपेक्षित चुका झाल्या असतील तर त्याबद्दल मनापासून क्षमस्व आहो.

(वरील सर्व चिकित्सक सध्या सह्याद्री सुपर-स्पेशालिटी हॉस्पिटल, नाशिक येथे कार्यरत आहेत)

(संकलित माहिती)

⁂

'तरुणांना सकारात्मक बदलासाठी लॉकडाऊनचा काळ हा एक संधी असून इन्टरनेटमुळे भरपूर माहिती उपलब्ध झाली आहे. या माहितीचा उपयोग करून आपली परिस्थिती बदलण्यासाठी तरुणांनी प्रयत्न करावे. शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख हे त्याचे मोठे उदाहरण आहे. अत्यंत कठीण काळात ग्रामीण भागातील हा तरुण संस्कृत व कायद्याचा आणि इंग्रजीचा पंडित झाला व जगात नाव कमावले. त्यांचा आदर्श घ्या'.

- महेश म्हात्रे, संपादक न्यूज १८ लोकमत.
(शिवाजी मीडिया क्लबच्या मुलाखतीतून साभार)





# कोरोना आणि लग्न

## 'शुभमंगलम... आता जरा जास्तच सावधान !!

■ वैष्णवी भुसारी
बी.ए. (जेटमसी) वर्ष -२

लग्न म्हटले की उत्साह, आनंद, जल्लोष, स्त्रियांची लगबग, पाहुण्यांची रेलचेल, लगीन घरची धामधूम सुरू होऊन जाते. लग्नकार्य ही कुठल्याही वधू-वरासाठी आयुष्यातील सगळ्यात खास घटना असते. नवरीला तर लग्नाच्या साड्या आणि दागिन्यांच्या खरेदी नंतर कधी एकदा तयार होते असे वाटते. दुसरीकडे नवरदेव-नवरी दोघांच्या ही घरात दिवस-रात्र लग्नाचीच धांदल असते. विशेषत: मुलींना पडणारा सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे पार्लरला कधी जायचे, कपड्यांची खरेदी कधी करायची, नटायचे कसे याचीच हौस असते. मात्र या वर्षी या आनंदाच्या घडीत नेमकी कोरोनाने दस्तक देऊन आनंदावर पाणी फेरले.



सरकारकडून मॉल्स, थेटर, शाळा, महाविद्यालय सगळे बंद करण्यात आले. गर्दीत जाऊ नका, शक्यतोवर घराबाहेर पडणे टाळा असे आवाहन सरकार कडून करण्यात आले अशी बातमी येताच या परिस्थितीत लग्न समारंभ कसा करायचा? असा प्रश्न दोन्ही कुटूंबाला पडला. लग्नासाठी रंगवलेले स्वप्न, हौस सर्व जागेवर राहले. लग्नासारखा सोहळा आता थोडक्यातच करावा लागेल याचे दुःख अनेकांना झाले. नातेवाईकांना लग्न समारंभात सामील होणे सुद्धा अवघड झाले. एवढेच नाही तर मंगल कार्यालय, डीजे, बँड वाले, कॅटर्स, बिछायत केंद्रे, डेकोरेशन वाले, एकंदरीत सर्वांचेच नुकसान झाले. एप्रिल ते जून या लग्नसराईच्या कालावधीत या सर्वांचे वर्षभराचे आर्थिक अंदाजपत्रक अवलंबून असते. मात्र या वर्षी बाजारपेठांपासून ते मंगल कार्यालयांपर्यंत सर्व ठप्प होते.

सर्वांच्या आरोग्याचा विचार करता या कोरोनाकाळात लग्न समारंभ थोडक्यात होणे काळाची गरज होती. पण असे म्हणतात की वाईट परिस्थिती ही माणसाला काही ना काही चांगले शिकवून जाते. तसेच या कोरोनाकाळात ही आपल्याला अनेक गोष्टी अनुभवायला मिळाल्या. जसे कुठला ही दिखावा न करता थोडक्यात ही लग्न समारंभ उत्तमरीत्या पार पडू शकतो. आपल्याकडे धुमधाम लग्न करणे ही गोष्ट मुलीच्या शिक्षणापेक्षा ही जास्त महत्वाची व प्रतिष्ठेची वाटते. कमी खर्चात लग्न करणे ही गोष्ट समाजात लाजेची मानल्या जाते. घरात मुलगी जन्माला येताच तिच्या शिक्षणासाठी नाही मात्र लग्नासाठी पैसा जमवला जातो. एवढी लग्न समारंभ थाटामाटात करण्याची आपल्याकडे परंपरा आहे. मात्र या घातक कोरोना वायरसनेच लोकांच्या डोक्यातील लग्नाविषयीचा वायरस काढला आणि लग्न साधेपणात ही चांगल्या पद्धतीने होऊ शकतात हे सिद्ध करून दाखवले.

एका दिवशीच्या लग्नासाठी एवढा पैसा खर्च करण्यापेक्षा तोच पैसा आपल्या भविष्यासाठी गुंतवून कामात आणला जाऊ शकतो आणि कोरोना सारख्याच अचानक आलेल्या संकटात तो कामी पडू शकतो हे शिकवून दिले. लग्न ही आयुष्यातील अत्यावश्यक घटना असली तरी ती एवढी ही महत्वाची नाही की त्यासमोर मुलीच्या बापाचा जीव विकावा लागेल. लग्नासाठी काढलेल्या कर्जाची परतफेड न करता आल्याने बापाला जीव द्यावा लागण्याच्या अनेक घटना आहेत. यावर्षी या कोरोनामुळे मिळालेल्या धड्यातून आपण शिकवण घ्यायला पाहिजे की अनावश्यक खर्च टाळून कमी लोकांमध्ये आणि कमी खर्चामध्ये सुद्धा चांगल्या प्रकारे लग्न पार पडू शकतात. म्हणून भविष्यासाठी पुन्हा एकदा म्हणावे लागते 'शुभमंगलम. आता जरा जास्तच सावधान !'

⁂

# कोरोना आणि मानवी संवेदना

■ मनिषा देशमुख
एम.ए. जेएमसी भाग-२

मानवी मन किंवा विचार हे खूप गहन आहे याचा थांगपत्ता लागणे कठीण आहे. मानवी मनाची संवेदना ही तेवढीच नाजूक आणि हळुवार आहे. कधी ते भावुक हळुवार होते तर थोड्या कठीण प्रसंगात तिच्यावर ओरखडे उमटले जातात.

२०२० साल उजाडले आणि आपल्या शारीरिक आणि मानसिक क्रियांना आभासी जगापर्यंत सिमीत करून ठेवले. संपूर्ण जगात कोरोनाचा सामना करण्यासाठी मास्क वापरणे, शारीरिक अंतर ठेवणे यासाठी प्रोत्साहन देण्यात आले परंतु मानवी संवेदनांचे काय? या आजारापासून बचाव करण्यासाठी उपाय पुष्कळ आहेत परंतु त्याची भावनात्मक किंमत संवेदनशील आणि निरोगी लोकांना चुकवावी लागत आहे. या काळात नैराश्य एकटेपणा ही नवीनच समस्या निर्माण झाली आहे. कोरोनाने जगावर कब्जा तर केलेलाच आहे दुसरीकडे मानवी संवेदना हळव्या झालेल्या आहेत एकटेपणा आलेले आहे. मन शांत नाही. मुलांना शाळेत गणिताचा फॉर्मूला तर शिकविला जातो पण आपल्या मनाला शांत ठेवण्याचा फॉर्मुलाच यात नाही. आपल्यात असलेल्या रागाची किंवा उदासीनतेची भावना समजून घेऊन त्याचे निराकरण करणे महत्त्वाचे आहे.

माणसाला मुळातच मानसिक आधाराची गरज असते. या कोरोना काळात तर जास्तच आहे. मानसिक आधार व प्रेमाची गरज आहे. या काळात एकटेपणाशी लढण्यासाठी मनाला शांत ठेवणे गरजेचे आहे. मानवी संवेदना व्यक्त करण्यासाठी, मनमोकळे बोलण्यासाठी कोणीतरी हवे असते. बहुतेक वेळा सल्ल्याची गरज नसते पण एक मनाला दिलासा हवा असतो. समजून घेण्यासाठी मानसिक आधार हवा असतो अतिशय घाबरून भीतीच्या आहारी गेलेल्या व स्वत: संघर्ष करणाऱ्या व्यक्तीच्या मानवी संवेदना जपणे गरजेचे आहे. अशा व्यक्तींना मानसिक आधार देऊन तुम्ही भयमुक्त करू शकता. आर्थिक व आरोग्य दृष्ट्या सुदृढ होणे याकडे सर्वांचे लक्ष असते पण मानसिक सुदृढतेकडे कमी लक्ष दिल्या जाते. आज मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न केले गेले नाही तर ती विकृती बनेल व ही विकृती समाजात पसरल्यावर देशाला त्याची किंमत चुकवावी लागेल.

आपल्या बाजूबाजूला पाहिले तर एकटेपणामुळे निराशेत असलेले खूप लोक आहेत. वयस्कर मंडळी एकटी पडलीत. युवक नोकरी गेल्यामुळे चिंतेत आहेत. मुले घरात बसून कंटाळली तर महिला ऑफिसच्या कामा सोबतच घरकामाचा बोजा सहन करीत आहेत. या काळातील मानवी संवेदनेवर वय आणि लिंगानुसार प्रत्येक व्यक्तीवर वेगवेगळे परिणाम झालेले दिसून आलेत. यूकेच्या युनिवर्सिटी ऑफ एसेक्स आणि ऑफिस ऑफ नॅशनल स्टॅटस्टिकच्या एका अभ्यासात अनेक गोष्टी समोर आल्या आहेत. त्यात असे दिसले आहे की कोरोना काळात एकटेपणा व मन संवेदनशील होण्याचे दुष्परिणाम महिला व युवकांवर झालेले आहेत. पुरुषांच्या तुलनेत महिला मोठ्या संख्येने मानसिक आरोग्य समस्यांना बळी पडल्या आहेत. त्यासोबतच आर्थिक अडचणींचेही हे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर दिसू लागलेले आहेत. मुलांची व काही प्रमाणात मोठ्यांची ही ऊर्जा विसर्जन केंद्रे बाहेर बंद होऊन घरापुरती मर्यादित झाली आहे. ती ऊर्जा सकारामकतेकडे कशी वळेल हे बघणे गरजेचे आहे. यावरील उपाय म्हणजे व्हर्च्युली एकमेकांना भेटणे, वेबिनार, व्हिडीओ कॉन्फरन्स, व्हिडिओ कॉल हे या काळात उपयोगी पडतात नियमितपणे योग्य दिनचर्या ठरवून लोकांशी बोलून ताण कमी होऊ शकतो. नवीन गोष्टी शिकून आपले मनाचे आरोग्य जपणे गरजेचे आहे. सर्वजण या आजाराचा सामना करीत आहे. त्यामुळे आपल्या संवेदना कमजोर न होऊ देता उत्साह टिकवून ठेवता आला पाहिजे. जीवनात नेहमी अनिश्चितता असते. त्यामुळे वर्तमान स्थिती समजूतदारपणे, सुरक्षितपणे, धाडसाने सर्व गोष्टींचे सामना करावा लागतो. स्वत:सोबत जवळच्या लोकांसाठी, समाजासाठीही काहीतरी करणे गरजेचे आहे. याद्वारे आपण कोरोनाकाळातही मानवी संवेदना जपू शकतो. मानवी संवेदना अजूनही जीवंत आणि संवेदनशील असल्यामुळेच या कोरोना काळातही समाजातील माणसे एकमेकांच्या मदतीला धावून आली. माणसानेच एकमेकांना मदत करावी. मानवी संवेदना जपावी. या काळातच नव्हे तर इतर वेळेसही आर्थिक मानसिक व शारीरिक समस्येवर लढण्यासाठी एकमेकांना मदत करून मानवी संवेदनेचे दर्शन घडवावे.

यासाठी गीतकार जावेद अख्तर यांच्या या ओळी सार्थ ठरतात.

'कंधो से मिलते हे कंधे। कदमो से कदम मिलते है।
हम चलते है जब ऐसे। तो दिल दुष्मनके हिलते है।'





# मुलाखत-कोरोनाशी लढलेल्या तरुणाची

■ पराग सुनीलराव राऊत
बी.ए. भाग-३



मुलाखत : सुमित गुल्हाने
मुलाखतकर्ता : पराग सुनीलराव राऊत

१) तुला कोरोना व्हायच्या अगोदर तू या आजाराकडे कसा बघत होता ?

उत्तर - मी या आजाराला गंभीरपणे बघत होतो. म्हणजे सर्व काळजी घेवून तोंडाला मास्क लावणे. हात योग्य रितीने धुणे आदी काळजी घेतली तर आपल्याला काहीच होणार नाही याची मला खात्री होती.

२) तुला कोरोना होण्याआधी शासनाने दिलेले नियम तू पाळत होता का ?

उत्तर - हो, मी शासनाने दिलेले सर्व नियम योग्य रितीने पाळत होतो.

३) तुला जेव्हा कळल की तुला कोरोना झाला, तेव्हा तुझी भावना काय झाली ?

उत्तर - रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यानंतर थोड दु:ख वाटलं कारण मी कोणाच्याही संपर्कात आलो नाही. परंतु शासनाने दिलेले नियम पाळून खुप पेशंट चांगले होत आहे. आपणही नक्कीच बरे होऊ ही आशा होती.

४) तुला कोरोना झाला हे जेव्हा समजलं, तेव्हा तुझ्या मनात भीती निर्माण झाली का ? तू या वायरस चा सामना करू शकतील असा तुला विश्वास होता का ?

उत्तर - नाही, मला अजिबात भीती वाटत नव्हती, कारण मला माहित होते की माझी प्रकृती चांगली आहे. आणि मला पूर्ण विश्वास होता की मी नक्कीच या वायरसचा सामना करेल.

५) तु कोरोना पेशंट असतांना लोकांच्या नजरेत तू शत्रू होता परंतु लोक तुझ्या नजरेत कोण होते ?

उत्तर : माझ्या नजरेत सर्व सामान्यच होते. परंतु माझा विलिगिकरणाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरही क्वचित लोक माझ्याकडे वाईट नजरेने पाहत होते.

६) तू कोरोना पेशंट असताना रुग्णालयातील परिस्थिती काय होती? तुला तिथे भीती वाटत होती काय ?

उत्तर : रुग्णालयात कोरोना आणि सारी असे दोन्ही रोगाचे पेशंट माझ्या अवती भवती होते. माझ्या सोबत १५ ते २० लोक पूर्ण निमोनियाचे होते परंतु त्यांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला होता. म्हणून पेशंट वाढत असल्याचे मला काही नवल नव्हते व व्यवस्था चांगली होती त्यामुळे भीती वाटत नव्हती.

७) तुझा कोरोना रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यानंतर सर्वात जास्त धीर कोणी दिला ?

उत्तर : माझा रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यानंतर मला सर्वात जास्त धीर माझ्या बहिणीने दिला.

८) या कोरोनाच्या महामारीत अविरत सेवा देणाऱ्या डॉक्टर, पोलीस, सफाई कर्मचारी यांच्याकडे तू कसा बघतोस ?

उत्तर : योग्यच... विशेष म्हणजे डॉक्टर यांचा या महामारीत कोणताच दोष नाही. कोठे जर व्यवस्था/प्रणाली कमी जास्त होत असल्यास डॉक्टरांचा दोष नाही.

९) तू नेमका कोठे व कुणाच्या संपर्कात आला होता, याची तुला चाहुल लागली होती का ?

उत्तर : नाही, अजिबात नाही कारण मी सतत शेतीच्या कामात व्यस्त होतो. कोठेही बाहेर गेलो नाही आणि शासनाचे नियम वेळोवेळी पाळत राहिलो.

१०) जेव्हा तू कोरोनामुक्त झाला म्हणजे या लढ्यात तू जिंकला तेव्हा तुझी भावना कशी होती? आणि जे पेशंट अजूनही कोरोनाशी लढत आहेत त्यांना तू काय संदेश देशील ?

उत्तर : माझा रिपोर्ट जेव्हा निगेटिव्ह आला तेव्हा मी भरपूर आनंदी होतो. आणि जे पेशंट अजूनही कोरोनाशी लढत आहेत त्यांना मी येवढच सांगेल जेवण वेळेवर करणे व कोणतीही चिंता/टेंशन न घेता राहणे. त्यामुळे आपली ह्युमिनिटी पॉवर आपोआप वाढेल व आपण यातून सुखरूप बाहेर पडू..

# कोरोना आणि युवा पिढी

■ चैताली रामेश्वर देशमुख
बी.ए. भाग-३




आज सर्वत्र जगभर कोरोना नावाची बिमारी थैमान घालत आहे सर्वत्र कोरोनाचा कहर निर्माण झालेला आहे आणि यावर उपाययोजना करणे हे आपल्या युवापिढीचे कर्तव्य आहे. कारण युवावर्ग म्हणजेच की युवा अवस्थेत स्वतंत्र संग्रामापासून ते प्रत्येक कार्यामध्ये युवा वर्गाचा वाटा खूप मोठ्या प्रमाणात आहे. आज आपल्याला या कोरोना महामारीच्या संकटापासून वाचण्यासाठी या मधून आपली सुटका करण्यासाठी डॉक्टर्स, नर्सेस, सैनिक, पोलिस, कर्मचारी, अतोनात रात्रंदिवस कष्ट करून आपल्याला या मधून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. आज खरोखर खूप भयावह आणि भीतीदायक परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे सर्वत्र भीतीदायक शांतता पसरली आहे. मात्र याच शांततेत आज कुठे? तरी असंतोषाचा कलह निर्माण झालेला आहे.

आज ही महामारी? की बिमारी च्या नावाखाली चालवलेला खुला व्यापार? हा प्रश्न? एक युवा म्हणून माझ्या मनात निर्माण होतो. कारण याच बिमारीच्या नावाखाली चालवलेला भ्रष्टाचार मी बघत आहे. आज आपल्या या समाजात आम्ही कुठे? तरी कोणाला तरी देव मानतो त्याचा आदर करतो. मात्र त्याच 'सन्मान' आदराच्या नावाखाली आज कुठे तरी माणुसकीला लाज वाटेल असे वर्तन काही भ्रष्ट लोक करताना आपल्याला आढळत आहेत. आणि याच बिमारीच्या नावाखाली माणुसकीची अवहेलना होताना मी बघते आहे. आज माणुसकीच्या नावाखाली माणूस मानसाला जातीभेद करून त्यामध्ये दुजाभाव निर्माण करायला निघालेला आहे. आज आम्ही या कोरोना नावाच्या बिमारीला जातीच नाव देऊन बदनाम करत आहोत. आज याच बिमारीच्या नावाखाली पैशांचा व्यवहार करून लोकांच्या भावनांशी खेळल्या जात आहे. आणि हेच कुठे तरी थांबायला हवे असे मला वाटते. आणि याला थांबवण्याची क्षमता फक्त व फक्त आपल्या युवापिढीमधेच आहे. खरोखर आज बोलायचे झाले तर नेमके कोरोना म्हणजे काय? हेच आम्हाला आणि आमच्या या मानवी समाजातील लोकांना कळलेलं नाही.

आज कोरोना म्हणजे माणसाने निसर्गाशी आणि माणुसकीशी खेळलेल्या वाईट गोष्टींचे फलित म्हणजेच हा कोरोना आणि आज आम्ही या बिमारीच्या नावाखाली पण भ्रष्टाचार करीत आहोत. माझ्या शब्दात बोलायचे झाले तर कोरोना म्हणजेच धर्माचे नाव देऊन लोकांच्या भावनांशी खेळल्या जाणारा खेळ आणि लोकांच्या भावनांचा चालवलेला मांडलेला खुला व्यापार म्हणजेच कोरोना लोक जिथे विचार करणे चालू करतात. तिथेच विचारांच्या भावनेला तोडणारी 'गाठ' म्हणजेच कोरोना. आज आम्ही काय बघत आहोत तर आज प्रत्येक व्यक्तीच्या जीवाची किंमत आम्ही पैशात मोजायला सुरूवात केली. आज विचारांवर कुठे तरी मात होताना आपल्याला दिसत आहे. कारण आज या कोरोना बिमारीचा परिणाम फक्त व फक्त लोकांच्या शरीरावरच नाही तर त्यांच्या मानसिकतेवर आणि त्यांच्या मनस्थितीवर होताना दिसत आहे. आज सर्वत्र या कोरोना महामारी सोबतच भ्रष्टाचार आणि काही वाईट प्रवृतीतील भ्रष्टविचार याचा काळोख पसरलेला आहे. आणि याला दूर करण्याचं धाडस आपल्या युवापिढीला दावखणे अत्यंत गरजेचे आहे.





# वऱ्हाड हा कोरोनाचा मोठा स्पॉट

## शिवाजीच्या 'जनसंवाद' विद्यार्थ्यांशी ज्येष्ठ पत्रकार संदीप भारंबे यांचा संवाद

■ प्रणाली जाधव
बी.ए.जे.एम.सी. भाग-२




मुंबई, पुणे आणि मालेगाव नंतर वऱ्हाड हा कोरोनाचा मोठा स्पॉट असून आपण मोठ्या संकटाच्या तोंडावर वाढतो आहोत, हे आकडेवारीवरून दिसून येईल. 'अदृश्य वाहक' हे कोरोना वाढण्यासाठी मोठ्याप्रमाणावर कारणीभूत असून त्यांना शोधणे हे यंत्रणेला शक्य नाही त्यामुळे सर्वांनी स्वत:च स्वत:ची काळजी घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व दै. सकाळच्या वऱ्हाड आवृत्तीचे निवासी संपादक संदीप भारंबे यांनी केले.

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या जनसंवाद विभागाच्या वतीने 'झूम' वर 'वऱ्हाडातील कोरोना', या विषयावरील मुलाखतीत ते बोलत होते. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, जनसंवाद विभागप्रमुख डॉ. कुमार बोबडे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. कोरोना हे सर्वात मोठे संकट असून कोरोनाने नात्यानात्यात दुरावा निर्माण केला आहे. त्यामुळे पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी मानवी संबंधाचा विषय अभ्यासासाठी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

वऱ्हाडात आधी यवतमाळमध्ये मोठा उद्रेक झाला. त्यानंतर अमरावतीत शिरकाव झाला. तोपर्यंत अकोला चांगले वाटत होते पण दिल्लीहून कोरोनाचा अकोल्यात शिरकाव झाला आणि आज अकोला विदर्भात पहिल्या क्रमांकावर पोहचले आहे. नागपूर व अकोल्याची तुलनात्मक लोकसंख्या पाहता हे सहज लक्षात येईल. अकोल्यात दररोज रूग्णांची संख्या वाढत आहे. कोरोनाला आळा घालण्यासाठी अमरावती व अकोल्यासारख्या शहरांची दहा भागात विभागणी केली पाहिजे. प्रत्येक भागासाठी उपविभागीय अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वात स्वतंत्र आरोग्य यंत्रणा व पोलीस यंत्रणा राबवावी. लोकांनीही लॉकडाऊनचे कठोर पालन करणे आवश्यक असून स्वत:बद्धल थोडी जरी शंका आल्यास स्वत:चे अलगीकरण करावे, अशी सूचनाही त्यांनी केल्या.

दाट लोकवस्ती, एकाच खोलीत आठ-दहा लोकांचे वास्तव्य, सार्वजनिक स्वच्छतागृहे ही जशी शहरी भागात कोरोना वाढण्याची कारणे आहेत तशीच लोक लॉकडाऊनचे काटेकोरपणे पालन करत नाहीत. हे सुद्धा एक कारण आहे. लोक भाजीच्या दुकानातही गर्दी करतात. कारण नसताना गावभर फिरतात. त्यातून निर्माण होणारे अदृश वाहक कोरोना पसरवतात. दाट लोकवस्त्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना कोरोनाची लागण होण्याचे प्रमाण जास्त आहे, असेही भारंबे यांनी सांगितले.

कोरोनामुळे बेरोजगारीचे मोठे संकट कोसळले आहे व पुढेही अनेक वर्षे या संकटाचा सामना करावा लागणार आहे. ग्रामीण भागातील अनेक तरूणांनी मात्र या संकटाचे रोजगारात रूपांतर केले असून फळे व भाजीपाला विक्रीच्या माध्यमाने थेट शेतातील माल शहरात आणून विकला व विकत आहेत. महाविद्यालयीन तरूणांनीही या काळात अनेक छोटे छोटे कोर्सेस करून रोजगाराच्या नवीन संधी शोधाव्या, असेही ते म्हणाले.

कोरोनामुळे तरुणाई समोर अनेक प्रश्न निर्माण झाले असून या परिस्थितीत त्यांचे मानसिक स्थैर्य कायम राखण्यासाठी पत्रकारांनी पुढे येऊन मार्गदर्शन केले पाहिजे, असे आवाहन प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी यावेळी चर्चेत सहभागी होताना केले. तरूणाईचा हा देश खंगला किंवा पोखरला जाऊ नये. म्हणून माध्यमांसह सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. या मुलाखतीचे सूत्र संचालन शुभम बायस्कर यांनी केले तर जनसंवाद विभागप्रमुख डॉ. कुमार बोबडे यांनी संदीप भारंबे यांचे स्वागत करून मुलाखतीला प्रारंभ केला. या चर्चेत महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी 'झूम' च्या माध्यमाने मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# 'अपुनच अपना भगवान है !'

## कोविड १९ वर मात करणारा माजी विद्यार्थी पत्रकार मनोज भोयर यांची विशेष मुलाखत

■ अनुयोग यावडे
एम.ए.जे.एम.सी.-भाग-१



'पॉझिटीव्ह रिपोर्ट आला की तासातासाला तुमची लढाई सुरू होते. नकारात्मक विचार मनात येतात. थरकाप उडतो. कुटुंबाची चिंता सतावते. पण या तासातासाच्या लढाईत जगण्याची दुर्दम्य इच्छा मनात ठेऊन सकारात्मक विचाराने कोरोनाशी लढावे लागते. "अपुनच अपना भगवान है!" हा मंत्र आत्मसात करूनच मी कोरोनावर मात करू शकलो. कोरोनाचे भय न बाळगता कोरोना तुमच्या जवळही फिरकणार नाही याची काळजी घ्या आणि आपले सामाजिक कर्तव्य पार पाडा, असे आवाहन सुप्रसिद्ध पत्रकार व जय महाराष्ट्र या वाहिनीचे सहाय्यक संपादक मनोज भोयर यांनी 'कोविड १९ वर मात करणाऱ्या पत्रकाराची कहाणी' या विशेष मुलाखतीतून केले.

अडीच तास चाललेल्या मुलाखतीत मनोज भोयर यांनी प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व निमंत्रित मंडळींसोबत दिलखुलास गप्पा मारल्या. मनोज भोयर हे या महाविद्यालयाचे पत्रकारितेचे माजी विद्यार्थी असलेल्या या मुलाखतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते व त्यांचे अनुभव ऐकण्याची सर्वांना प्रचंड उत्सुकता होती. मुंबईत कोविड १९ सारख्या भीषण महामारीचे वृत्तांकन करताना एक दिवस कोरोनाची लागण झाल्याची जाणीव झाल्यापासून कोरोनावर मात करेपर्यंतचा प्रवास उलगडतानाच मनोज भोयर यांनी समाजाला आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीवही करून दिली. सोबतच कोरोनाच्या रूग्णाबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन त्यांना मानसिक बळ देण्याचे काम समाजाने करावे, असे आवाहन त्यांनी केले. कोरोनाचे संकट अजून संपले नसून प्रत्येकाने आपल्या सोबतच इतरांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी मास्क घालणे, कोणाच्या श्वासाच्या अंतरावर येणार नाही, याची खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे. कोरोना झाला की सर्वांनाच व्हेन्टीलेटरची आवश्यक नसते. जे सक्षम आहेत, ज्यांना अन्य आजार नाहीत अशांना व्हेन्टीलेटरची अजिबात गरज पडत नाही. जी साधी उपचार पद्धती आहे त्यानेच उपचार करण्यात येतात. मलाही असेच उपचार मिळाले आणि नियमित बैठे व्यायाम, ध्यानधारणा, वाचन आणि सकारात्मक विचार यामुळे मी या लढ्यात यशस्वी झालो. मलाही सरकारी रुग्णालयात उपचार मिळाले असून माझी या रुग्णालयाबाबत किंवा तिथल्या कर्मचाऱ्याबाबत कोणतीही तक्रार नाही. उलट तक्रार आहे ती रूग्णांबाबतच. समाज सरकारी यंत्रणेवर दोष द्यायला तयार असतो. पण ती व्यवस्था सुद्धा आपला जीव धोक्यात घालून, आपल्या कुटुंबाची काळजी न करता रूग्णांची सेवा करत असते. अशा स्थितीत आपणही सामाजिक जाणीव ठेवून वार्डाच्या स्वच्छतेची काळजी घेतली तर कुठे बिघडले.

मी ज्या रुग्णालयात दाखल होतो तेथे दाखल असलेल्या अब्दुलचाचा हा पासष्ट वर्षाच्या तरुण या रूग्णालयात माझी प्रेरणा ठरला. वार्डात चहा व जेवण आले की सर्वांना ते घेण्याचा आग्रह अब्दुलचाचा करायचे. आपण समाजाचे देणे लागतो या भावनेने काम करणाऱ्या चाचाकडून प्रेरणा घेऊन व वर्धेचा असल्याने लहानपणी वडिलांनी केलेले संस्कार येथे माझ्या कामात आले व मी रूग्णालयात संडास साफ करू लागलो. रूग्णांनी इतरत्र टाकलेल्या जेवणाच्या प्लेट कचऱ्याच्या डब्यात टाकू लागलो. अशी माहितीही भोयर यांनी दिली. मुंबईच्या रूग्णालयात फार चांगले उपचार मिळत असून तिथल्या डॉक्टरांनी विश्वास सार्थ ठरवला आहे म्हणून त्यांना पुन्हा एकदा सलाम करत रूग्णालयात आहार सुद्धा चांगला मिळतो. आरोग्यात सुधारणा होईल याची काळजी आहार देताना घेतली जाते, असे भोयर यांनी सांगितले. कोरोना हे अभूतपूर्व संकट असून जगभरात मोठमोठ्या देशाच्या आरोग्य यंत्रणा त्यामुळे कोलमडून पडल्या आहेत त्यामुळे आपल्या यंत्रणेला दोष न देता स्वतः जितकी काळजी घेता येईल तितकी घेणे आवश्यक आहे. यंत्रणेला नाव ठेवणे सोपे आहे पण मदत करणे तितकेच कठीणआहे. आपण विनाकारण घराबाहेर भटकतो, खर्रा खाऊन थुंकतो, गरज नसताना दुकानात गर्दी करतो. सामाजिक अंतर पळत नाही, मग यंत्रणेला काय दोष द्यायचा? असा सवालही भोयर यांनी केला.

आता आपण ज्या अवस्थेत आहोत ती एक धोक्याची पातळी आहे. त्यामुळे लॉकडाऊन नंतर ही आपल्याला समूहात वावरताना काळजी घेणे आवश्यक आहे.





# कोरोना-समज गैरसमज

■ कु. समिक्षा राजेंद्र हुड
बी.ए.भाग-२

कोरोना विषाणूच्या साथीने संपूर्ण जगाला कैद केले आहे. नार रस्त्यातवर वाहनांचा आवाज येत आहे. नाही कारखान्याचा जीव पुर्वी सारखा आहे. आणि नाही आकाश तयार या कारखान्यांमधून धुर निघतांना दिसत आहे. या महामारीचा संसर्ग थांबवण्यासाठी केलेलं लॉकडाऊनमुळे जगाला अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड यावे लागत आहे.


रुख्मिणी नगरात धुवारणी

म्हणजेच आर्थिक उपक्रम रखडले आहे, आणि बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. परंतु या सर्व समस्यांमध्ये लॉकडाऊनचा पर्यावरणावर सकारात्मक परिणाम झालेला दिसत आहे.

या दिवसांमध्ये कार्बन उत्सर्जनामध्ये कमी झाली असून, अनेक प्रकारच्या प्रदुषणांमध्ये बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे. ज्यामुळे हवा स्वच्छ आहे आणि लोकांना स्वच्छ हवे मध्ये श्वास घेण्यची संधी मिळाली आहे. चीनची भिंत, माउंटएव्हरेस्ट आणि हिमालयाच्या पर्वतरांगा किती तरी दुरुन लोक बघत आहे आणि असेच अनेक कितीतरी बदलाव पर्यावरणामध्ये झालेले दिसत आहे.

या काळात कोरोना संकटसंपूर्ण जगासमोर एक महत्त्वाचं आव्हान ठरलं आहे. जगामध्ये या महामारीच्या घेरात लाखो लोक आले आहेत, यामधुन बाहेर निघण्यासाठी पुर्ण लोकसंख्या घरामध्ये राहत आहे. सामाजिकअंतर, धार्मिक यात्रा बंद, हात वारंवार नेहमी स्वच्छ करणे, यासारख्या नियमांचे पालन जनता करत आहे. शाळा, कार्यालय, कारखाने यांना आपले उपक्रम बंद ठेवण्याचे आदेश देण्यासोबतच, लॉकडाऊनचा अवलंब केला आहे. यामध्ये रस्ता वाहतूक कमीत कमी झालेली आहे. आणि हवाई वाहतूकीचे प्रमाण तर ६० ते ९० टक्के पर्यंत कमी केले आहे, हे चालू असतांनाच मार्च महिन्यापासून आत्तापर्यंत कार्बन उत्सर्जनामध्ये प्रत्येक दिवशी जवळजवळ १७ टक्के पेक्षाही जास्त कमी झालेली आहे. हे सोडून असे अनेक प्रकारच्या प्रदुषणांमध्ये बऱ्याच प्रमाणात कमी झालेली आहे.

तरी या परिस्थिती दरम्यान जागतिक उत्पादन आणि रोजगारची पातळी कमी झाली असून, आर्थिक आणि सामाजिक आघात पोहोचला आहे. लॉकडाऊनचा पर्यावरणावर झालेला सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे, या दरम्यान ग्रीन हाऊस उत्सर्जनामध्ये बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे, जागतिक समुद्रायनी ग्रीन हाऊस उत्सर्जनला कमी करण्यासाठी, आतापर्यंत अनेक प्रयत्न केले, अनेक जलवायुपरिवर्तन संमेलन झाले, परंतु या दिशेमध्ये कोणतेही उल्लेखनीय परिवर्तन दिसायला मिळालं नाही. परंतु लॉकडाऊनमुळे हे परिवर्तन फार कमी कालावधीत बघायला मिळालं. मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये जगातील प्रमुख शहरांची वायु गुणवत्ता पातळीमध्ये अपेक्षेपेक्षाही जास्त सुधारणा झालेली आहे. कार्बनडायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साईड, ओझोनगॅस आणि पार्टिक्युलेट वाटाण्या अभावी हवेची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात सुधारत आहे.

हवामान आणि हवामानाच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या माहितीनुसार, कोविड १९ साठी अवलंबविण्यात आलेले विविध महत्त्वपूर्ण उपायांमुळे राष्ट्रीय राजधानी दिल्लीत P.M. 2.5 मध्ये ३० टक्के कमी झालेली आहे आणि तसेच नायट्रोजन ऑक्साईच्या पातळी सुमारे ४० टक्के कमी झाली आहे. याशिवाय धोका दायक स्तरापर्यंत प्रदुषण पावलेल्या गंगा आणि यमुना नद्यांसोबतच अनेक नद्यांच्या पाण्याच्या गुणवत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. या नद्यांना साफ करण्यासाठी अनेक योजना राबविल्या होत्या. शिवाय गंगानदीच्या स्वच्छतेसाठी वेगळ्या मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली होती, सर्वात मोठा गंगानदी प्रकल्प 'नमामिगंगे' सुद्धा राबविण्यात आला परंतु हे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले आहे.

परंतु या लॉकडाऊनच्या कालावधीत जल प्रदुषणामध्ये

बऱ्याच प्रमाणात कमी झालेली आहे आणि नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा झालेली आहे.

या परिवर्तनाचे दोन प्रमुख कारण आहे. पहिलं म्हणजे पाण्याची मागणी कमी झाली आहे, कारण उद्योगधंदे बंद असल्यामुळे, पाण्याचा वापर कमी होत आहे आणि दुसरे म्हणजे उद्योगधंदे बंद असल्याने, घातक कचरा नदीच्या पाण्यामध्ये फार कमी प्रमाणात वाहून गेला. आणि नदीच्या पाण्याचे प्रदुषण कमी झाले. निसर्ग आणि वन्यजीवांनी स्वतःला पुन्हा पुन: जिवित आणि स्वच्छ केले आहे. 'बॉम्बे नॅचरल हाईवे हिस्ट्रीसोसायटी' च्या अनुसार २०१९ पासून आतापर्यंत हसं प्रवासामध्ये २५ टक्के वृद्धी झालेली आहे. याशिवाय गंगाडॉल्फीनसोबतच अनेक जलीय जीव किंवा अन्य जीवनाच्या परिपिव प्रणाली आणि निवासामध्ये निसर्गत: सकारात्मक परिवर्तन दिसत आहे.

* **'अग्निपथ' काव्य का छात्रोंद्वारा अनुवाद** : डॉ. हरिवंशराय बच्चन की अमर रचना 'अग्निपथ' इस कविता का छात्रों द्वारा विविध भाषाओं में अनुवाद किया गया । 'अग्निपथ' कविता को बंजारा, कोरकू, मराठी, गुजराती, तेलगु, उर्दू, अंग्रेजी आदि भाषाओं में अनुवाद किया गया। विभाग के छात्रों को अनुवाद कौशल्य एवं विविध भाषाओं का ज्ञान हो सके। इस उद्देश से यह अनूठा आयोजन रहा। विभाग के इस प्रयास की प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख इन्होंने सराहना की एवं छात्रों का अभिनंदन किया।

* **समाजोपयोगी कार्य** : महाविद्यालय के हिन्दी एवं अंग्रेजी विभागद्वारा छात्रों की गृहपाठ पुस्तिकाओं में से कोरे, न इस्तेमाल किये गये कागजों का संकलन किया गया एवं जिनसे 'लेखन पुस्तिका' का निर्माण किया गया। करीबन ५०० लेखन पुस्तिकाओं को 'चिल्ड्रेन होप सेंटर' इस सेवाभावी संस्था को प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख इनकी अध्यक्षता में वितरित किया गया। विभाग के बी.ए.भाग-३ के छात्र संजीवन दिवे एवं उनके माता-पिता द्वारा यह 'चिल्ड्रेन होप सेंटर' संचालित किया जा रहा है। जहाँ पर गरीब एवं अशिक्षित परिवार के बच्चों को महाविद्यालयीन छात्रों द्वारा निःशुल्क ट्युशन दी जाती है। कक्षा १ से लेकर १२ वी तक के छात्र इस ट्युशन का लाभ लेते हैं। इस सामाजिक दायित्व का निर्वाह करनेवाले कार्य में विभाग का सदा सहकार्य रहा है। इसी श्रृंखला में प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख इनके मार्गदर्शन में उपरोक्त कार्य के माध्यम से समाजसेवा की गयी।

इनकार्यो के अलावा विभागप्रमुख डॉ. मनोज जोशी ने इस वर्ष बी.कॉम. भाग-३ हिन्दी की पाठ्यपुस्तक 'प्रभास' के संपादन मंडल में कार्य किया। रिफ्रेशर कोर्स एवं ट्रेन द ट्रेनर (एफडीपी) कोर्स पूर्ण किया । आंतरराष्ट्रीय संगोष्ठी में शोधपत्र वाचन, राज्यस्तरीय लघुकथा लेखन प्रतियोगिता में 'मानवता का कर्ज' कथा को द्वितीय पुरस्कार, अतिथि व्याख्यान आदि के माध्यम से विभागोन्नति में सक्रियता निभायी ।

हिन्दी अभ्यास समिति २०१९-२०२०

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष - | मृणाल भोयर | बी.कॉम. भाग-३ |
| उपाध्यक्ष - | संजीवन दिवे | बी.ए.भाग-३ |
| सचिव - | शिवानी नर्रे | बी.ए.भाग-२ |
| सहसचिव - | अनिकेत कराळे | बी.ए.भाग-१ |
| सदस्य - | राधिका वादव | बी.ए.भाग-३ |
| | पूजा घोटे | बी.ए.भाग-२ |
| | खुशाल पांचाल | बी.कॉम.भाग-३ |
| | कांचन कुंभारे | बी.ए.भाग-३ |
| | पवन सरडे | बी.ए.भाग-२ |

■ डॉ. मनोज जोशी

हिन्दी विभाग

# जनसंवाद विभाग अहवाल २०१९-२०





संपूर्ण देशात पत्रकारितेचे उत्कृष्ट शिक्षण देणारा विभाग म्हणून आपल्या महाविद्यालयाचा 'पत्रकारिता व जनसंवाद विभाग' परिचित झाला आहे. गुणवत्तेची परंपरा कायम राखणाऱ्या या विभागाला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून बी. व्होक अंतर्गत तीन वर्षांकरिता १ कोटी ७० लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले. त्यामुळे कौशल्यावर आधारित 'फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी' या विषयात पदवी अभ्यासक्रम सुरु करणारे पहिले महाविद्यालय म्हणून आपल्या महाविद्यालयाचा नाव निघाला.

मुद्रित, इलेक्ट्रॉनिक्स आणि नवप्रसार माध्यमांच्या क्षेत्रात झपाट्याने होत असलेला विकास, नवीन उदयास आलेली ऑनलाईन पत्रकारिता, पत्रकारितेत विकसित झालेली नवनवीन क्षेत्रे, कार्पोरेट कंपन्यांमध्ये जनसंपर्काचे वाढलेले महत्त्व आणि दिवसेंदिवस विकसित होत असलेले इव्हेंट मॅनेजमेंट, जाहिरात, माध्यम संशोधनक्षेत्र आणि या सर्वांमध्ये वाढलेले फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफीचे महत्त्व यामुळे पत्रकारिता व जनसंवादशास्त्राच्या अभ्यासक्रमात अमूलाग्र बदल झाले असून या अभ्यासक्रमांना अत्यंत महत्त्व आले आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन जनसंवाद विभागाने सुरू केलेल्या फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी या अभ्यासक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

पत्रकारिता व जनसंवादशास्त्रातील तीन वर्षीय पदवी (बी.ए.जे.एमसी/बी.जे.एम.सी.) व दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.जेएमसी/एम.जे.एम.सी.) आणि फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी व जर्नालिझम अँड मीडिया मॅनेजमेंट हे दोन बी.व्होक तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रम या विभागामार्फत चालविण्यात येतात. निकालाची गुणवत्तापूर्ण परंपरा या विभागाने कायम राखली आहे. उन्हाळी २०१९ मध्ये झालेल्या परीक्षेत पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या सहा विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान पटकावले असून पदव्युत्तर परीक्षेत प्रथम आलेली कु. पल्लवी श्रीकृष्ण गडेकरही पत्रमहर्षी बाळासाहेब मराठे आणि स्व.पी.के. उपाख्य अण्णासाहेब देशमुख अशा दोन सुवर्ण पदकाची मानकरी ठरली आहे तर पदवी परीक्षेत प्रथम आलेली कु. श्रुतिका विलासराव महल्लेही स्व. जवाहरलाल दर्डा सुवर्ण पदकाची आणि दुसरा मेरीट युवराज मनोहरराव दाभाडे हा स्व.पी.के. उपाख्य अण्णासाहेब देशमुख रौप्य पदकाचा मानकरी ठरला आहे. कु. सुलेखा बाबूलाल सोनी हिने पदव्युतर परीक्षेत विद्यापीठातून द्वितीय व बी.जे.एम.सी.च्या पदवी परीक्षेत प्रशांत शिवा राठोड याने तिसरे स्थान पटकावले आहे बी.व्होक. फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी मध्ये कु. अश्विनी उद्धवराव गाडगे हीने गुणवत्ता यादीत प्रथम स्थान पटकाविले.

विभागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक व सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, अनेक उपक्रम राबवावे या उद्देशाने स्थापन झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिवाजी मीडिया क्लबने यावर्षी विविध उपक्रम राबविले. एम.ए.जे.एम.सी. अंतिम वर्षाची विद्यार्थिनी कु. मोनिका पिंपळा हिने क्लबच्या अध्यक्षपदाची तर बी.ए.जे.एम.सी. द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी कु. प्रणाली जाधव हिने सचिवपदाची जबाबदारी सांभाळली. शिवाजी मीडिया क्लबचा पदग्रहण समारंभ दि. २५ सप्टेंबरला घेण्यात आला. स्पंदन, अमरावतीने तयार केलेल्या 'मोल्या' या माहितीपटाचे प्रथम प्रदर्शन करण्यात आले. यावेळी कॅनॉन फोटोग्राफी कार्यशाळा घेण्यात आली. 'मै भी नायक' या स्पर्धेत एक दिवसाचा मुख्यमंत्री म्हणून निवड झालेल्या प्रशांत राठोड याचा सत्कार एका समारंभात घेण्यात आला. विभागाचे माजी विद्यार्थी चंद्रकांत शिंदे यांना पत्रकारिता या विषयात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार घेण्यात आला. दि.६ जानेवारीला मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात आला. या समारंभात अध्ययन समाचारच्या 'अमरावती जिल्ह्यातील पत्रकारितेची वाटचाल' या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमाला अमरावती विभागाचे माहिती उपसंचालक श्री. राधाकृष्ण मुळी, अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. अनिल अग्रवाल, अध्ययन समाचारचे संपादक श्री. जितेंद्र रोडे, अमरावती प्रेस फोटोग्राफर संघटनेचे अध्यक्ष श्री. मनीष जगताप, आय.आय.एम.सी.चे विभागीय संचालक श्री. विजय सातोकर व जिल्हा माहिती अधिकारी श्री. हर्षवर्धन देशमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमानंतर मनीष जगताप यांनी विद्यार्थ्यांना प्रेस फोटोग्राफीचे धडे दिले.



विद्यार्थ्यांतर्फे प्रकाशित 'संवादक' या अनियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. लॉकडाऊनच्या काळात विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनात खंड पडू नये म्हणून ऑनलाईन कार्यक्रम 'झूम व इंस्टाग्रामच्या सहाय्याने घेण्यात आले. याध्ये न्यूज १८ लोकमतचे संपादक श्री. महेश म्हात्रे, साम टीव्हीचे संपादक श्री. निलेश खरे, प्रसिद्ध शोधपत्रकार श्री. निरंजन टकले, दै. सकाळ वऱ्हाड आवृत्तीचे संपादक संदीप भारंबे, महाराष्ट्र टीव्हीचे श्री. मनोज भोयर यांच्या विशेष मुलाखती घेण्यात आल्या. सामाजिक कार्यकर्ते, व्याख्याते, कवी, गायक, नाट्य कलावंत, खवय्ये, उद्योजक यांच्याशी विशेष बातचीत करण्यात आली.

जनसंवाद विभाग अद्यावत स्टुडीओ, एडिटिंग लॅब व विविध उपकरणे आणि कॅमेरे यांनी सुसज्ज आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे मा. अध्यक्ष श्री. हर्षवर्धन देशमुख यांचे दहा मिनिटाचे मार्गदर्शनपर भाषण स्टुडीओमध्ये संपादित करण्यात आले. यावर्षी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या जनसंवाद अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बबन नाखले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जनसंवाद विभागातील प्राध्यापक प्रा.डॉ.मोईझ हक, दै. लोकमतचे उपसंवादक गणेश खवसे, दूरदर्शनचे कॅमेरामन राजीव गायकवाड, आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विभागाला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या करिअर कौन्सिलिंग व प्लेसमेंट विभागाच्या वतीने यावर्षी चाणक्य इंजिनिअरिंग फाउंडेशन, नागपूरच्या सहकार्याने विविध कंपन्यांसाठी विविध पदाकरिता घेण्यात आलेल्या प्लेसमेंटमध्ये ४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमुळे जनसंवाद विभागाला एक 'ज्ञानात्मक' व 'कार्यात्मक' स्वरूप प्राप्त झाले आहे. सतत नवीनता व सृजनशीलता हे या विभागाचे वैशिष्ट्य आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांच्या मार्गदर्शनात व विभागप्रमुख डॉ. कुमार बोबडे यांच्या नेतृत्वात विभागात कार्यरत असलेले प्राध्यापक प्रतिक करंडे, गजानन गडेकर, रुपेश फसाटे, मनीष भंकाळे, अमित त्रिवेदी, शिल्पा देशपांडे, डॉ. नकुल धरमकर, शिवकुमार साबळे या सर्वांच्या प्रयत्नाने पत्रकारिता व जनसंवाद विभाग निरंतर प्रगतीकडे वाटचाल करीत आहे.

**डॉ. कुमार बोबडे**

विभाग प्रमुख, जनसंवाद विभाग





# गृहअर्थशास्त्र विभाग अहवाल २०१९-२०२०

२०१९-२०२० या सत्रामध्ये गृहअर्थशास्त्र विभागाअंतर्गत खालील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पोषण सप्ताह

१) वृशाली चव्हाण १९/९/२०१९ कुपोषण विषयक मार्गदर्शन

२) सुनिता पोगरे १९/९/२०१९ टेराकोटा आणि कसेच्या दागीण्यांचे प्रात्यक्षिक

३) डॉ. लक्ष्मी भोंडे २०/९/२०१९ मुलींना आरोग्यविषयक मार्गदर्शन

४) गायत्री पाटील २०/९/२०१९ केक आणि रांगोळीचे प्रात्यक्षिक

५) दिपाली बाभूलकर २१/९/२०१९ कटपुटल्याद्वारे मुलींना स्त्रि भृणहत्ये विषयी मार्गदर्शन, स्त्रि साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन, मतदान अधिकार जागृती.

६) गृहअर्थशास्त्र विभागातर्फे पोषणयुक्त खाद्यपदार्थाची विक्री.

७) ५/१०/२०१९ ला रांगोळी वर्कशॉप

८) १०/१०/२०१९ बी.ए.-१ सेमिनार

९) ११/१०/२०१९ ला गृहअर्थशास्त्र विभागातर्फे सेवाग्रामला शैक्षणिक भेटीदरम्यान गांधीजीच्या राहणीमाणाच्या व्यवस्थेचे निरीक्षण केले. तसेच चरख्यावर सुत काढून कापड बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविले.

**डॉ. सुजाता सबाने**

विभाग प्रमुख

गृहअर्थशास्त्र विभाग

# एन.सी.सी. विभाग अहवाल २०१९-२०२०

महाविद्यालयात एन.सी.सी. विभागाची स्थापना सत्र १९५२-५३ ला झाली असून तेव्हा पासून हा विभाग सक्रीयपणे कार्यरत आहे. या युनिटमध्ये ५१ मुले व ७ मुली मिळून एकूण ५८ मुले प्रवेशीत असतात. या विभागाचा कार्यभार डॉ. लेफ्टनंट जी. जी. भारती यांचे कडे असून २०१९-२० मधील केलेल्या उपक्रमाची माहिती पुढील प्रमाणे आहे.



१) योगा दिवस-२१ जून २०१९ ला २४ कॅडेटस्‌चा सहभाग.

२) वार्षिक ट्रेनिंग शिबिर ४० कॅडेटस्‌चा सहभाग.

३) वृक्षारोपण उपक्रम - १३ जून ते १५ जुलै पर्यंत २९ कॅडेटस् सहभागी. ४) कारगिल विजय दिवसाचे आयोजन ज्यामध्ये रॅली व गेट लेक्चर-सुभेदार एन.चक्रे (नायक सुभेदार) ४९ कॅडेटस सहभागी.

५) रक्तदान शिबिरात ५ कॅडेटस्‌चा सहभाग.

अ) संकेत उमेकर ब) अक्षय ढवळे क) अंकूश बारवाल ड) सौरभ तायडे इ) अमय भोयर

६) आर.डी.सी. कॅम्प सहभाग राज्यस्तर १) निखिल गौड (बेस्ट फायटर)

७) आर्मी अॅटचमेंट कॅम्प-अहमदनगर दि.१६ ते ३० सप्टेंबर २०१९ ३ कॅडेटस सहभागी १) अक्षय ढवळे, २) सौरभ तायडे ३) शिवम अब्रुक (राष्ट्रीय स्तर)

८) नर्मदा ट्रीक कॅम्प-गुजरात (राष्ट्रीय स्तर) दोन कॅडेटस् सहभागी दि.२६ नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर-२०१९ १) तेजस कांबळे २) आशिष तायडे ९) भारतीय सैन्यदलात निवड -२ कॅडेटस् १) धनंजय खेडकर २) अजय झासकर दि.१२/०२/२०२०

१०) एन.सी.सी. परीक्षेचा निकाल अ) सी. सर्टिफिकेट - ०२ पास - १००% निकाल ब) बी. सर्टिफिकेट -०६ पास - ६०% निकाल

११) कोव्हिड-१९, कोरोना योद्धा म्हणून-१९ कॅडेटस सहभागी आणि ५८ कॅडेटस सलग्न आरोग्य सेतु अॅप.

१२) एन.सी.सी.विभागातर्फे भव्य प्लॉगिंग रॅलीचे आयोजन ज्यामध्ये ११९ कॅडेटस सहभागी झाले. दि. ७ डिसेंबर, २०१९

■ लेफ्ट. डॉ. जी. जी. भारती

# NCC 4th Maharashtra Girls' Bn Report 2019-2020

The following activities were conducted by the NCC unit of our college. 1) International Day of Yoga 21June, 2019. Hanuman Vyam Prasarak Mandal, Amravati.

2) Tree Plantation and Cleanliness Drive at Shivtekdi, Amravati. 24 August, 2019.

3) Kargil Vijay Diwas 26 July, 2019.

Mr. Chakre was the guest speaker who enlightened the cadets on Kargil war and Kargil Vijay Diwas. He also guided them about examinations conducted for entry in the Army.

4.) Personal Hygiene Day.

Dr. Sujata Sabane, Head of the dept. of Home Science was the guest speaker. She guided the students regarding person care and hygiene.

5.) Handwash Day.

Dr. Varsha Chikle, Head of the dept of Marathi explained the need and importance of washing hands.

6.)Plogging Activity 8 February, 2020.

Plogging means picking up litter while jogging. The cadets cleaned the Zilla Stadium, Amravati as part of Swachhata Pakhwada organized by NCC.

Camps attended by cadets.

1.) Cdt. Vidya Ganesh Puri– Basic Mountaineering Camp Uttarkashi (Uttarakhand)

2.) Cdt. Shruti Suresh Anasane– BLC., Saoner

3.) Cdt. Tanvi Ramratan Chakre– EBSB Camp II Nagpur

4.) Cdt. Kiran Vishwas Athawale – Mumbai

5.) SUO. Anjali Vishnu Bhure.–Para Basic Course (Agra), NCC Attachment Training Camp (First Aid) (Pune), CATC-105(TSC),(IBS)

6.) Many cadets also participated in CATC held at Amravati. The cadets of our college also won a shield In Drill Competition in CATC held at 8 Mah, Amravati.

■ Lt.Dr. Vaishali Vijay Takode.





# रा.से.यो. नियमित कार्यक्रम अहवाल

## सत्र २०१९-२०२०



**१) योग डे :- दि. २१ जुन २०१९ :** हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती उच्च शिक्षण संचालक कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ जुन २०१९ ला हनुमान प्रसारक मंडळ, अमरावतीच्या मैदानावर योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरू, डॉ. संजय जगताप, सहसंचालक, डॉ. राजेश जयपुरकर, प्र. कुलगुरू, डॉ. राजेश बुरंगे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमात श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, प्रा.डॉ. नामुर्ते, डॉ. गाडगे व इतर प्राध्यापक तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.



**२. तंबाखु व्यसन मुक्ती शपथ : दि.११ जुलै २०१९ :** श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यार्थ्यांना तंबाखु मुक्तीची शपथ दि.११ जुलै २०१९ ला देण्यात आली.

**३. वृक्ष लागवड : दि. १२ जुलै २०१९ :** महाराष्ट्र शासनाच्या कोट्यावधी वृक्ष लागवड योजनेत श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून दि.१२ जुलै २०१९ रोजी वृक्ष रोपण केले. या उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे सहकार्याने महाविद्यालयाच्या परिसरात १३० वृक्षांची लागवड करण्यात आली. त्या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. हर्षवर्धन देशमुख, आमदार डॉ. सुनील देशमुख, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, रा.से.यो. संचालक सं.गा.बा.अ.वि. डॉ. राजेश बुरंगे व कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. एस. नामुर्ते, डॉ. सुवर्णा गाडगे व विद्यार्थी उपस्थित होते.

**४. उरि द सर्जिकल स्ट्राईक : दि. २६ जुलै २०१९ :** २६ जुलै या दिवशी देशभरात विजयी दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना हा चित्रपट चित्रपटगृहात दाखविण्यात आला.

**५. युवा प्रशिक्षण शिबिर : दि.३० जुलै २०१९ :** दि.३० जुलै ते ८ ऑगस्ट २०१९ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा आयोजित युवा प्रशिक्षण शिबिर, विभागीय संचालक क्रीडा व युवक सेवा, विभागीय क्रीडा संकुल मोर्शी रोड, अमरावती येथे प्रशिक्षणाकरिता दोन रा.से.यो. स्वयंसेवक १) सुमित रिठे, बी.ए.भाग-१ व २) आरती राठोड, बी.ए.भाग-१ यांना पाठविण्यात आले होते.

**६. क्रांती दिन : ९ ऑगस्ट २०१९**

भारत सरकार फिल्ड आऊटरिच ब्युरो अमरावती व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ रा.से.यो. विभाग द्वारा आयोजित श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे क्रांती दिननिमित्त देशभक्ती गीत गायन स्पर्धा व वृक्ष लागवडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला ब्रिगेडियर संग्राम दडवी, महाविद्यालयाचे प्राचार्य स्मिता देशमुख, श्री. अंबादास यादव, कुलसचिव तुषार देशमुख, डॉ. राजेश बुरंगे रा.से.यो. समन्वयक सं.गा.बा.अम. वि. व कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. एस. नामुर्ते इतर प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

**७. आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा : दि.२०/०८/**



२०१९ : भारत सरकार सूचना व प्रसारण मंत्रालय बोर्ड अमरावती व रा.से.यो. विभाग सं.गा.बा.अ.वि. द्वारा आयोजित आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा दि.२०/०८/२०१९ ला डॉ. आर. जे. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय मुर्तीजापूर, अकोला येथे संपन्न झाले.

**८. वृक्ष दिंडी : दि. ३० ऑगस्ट २०१९ :** श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी भव्य वृक्ष दिंडीचे आयोजन केले होते. ही दिंडी महाविद्यालय परिसरातून ते शिवटेकडी पर्यंत काढण्यात आली होती.

**९. राज्यस्तरीय पूर्व गणतंत्र दिन पथसंचालन शिबिर औरंगाबाद :** दि. १४ ते १६ सप्टेंबर २०१९ या कालावधीत महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय सेवा योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी राज्यस्तरीय पूर्व गणतंत्र दिन पथसंचालन शिबिर आयोजित केले होते. त्या शिबिरात महाविद्यालयातील रा.से.यो. स्वयंसेवक कु. जान्हवी राजेंद्र राऊत बी.ए.भाग-१ ही शिबिरात सहभागी झाली होती.

**१०. पोषण सप्ताह :** दि.२०/०९/२०१९ ला पोषण सप्ताह निमित्ताने महाविद्यालयात आहार-विहार, व्यायाम व आरोग्य यांविषयी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करण्याकरिता श्रीमती शिला जांभूळकर, शिक्षिका धामणगांव रेल्वे व प्रा. डॉ. सुजाता सबाने गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**११. स्वच्छता मोहिम : दि.२३/०९/२०१९ :** महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

**१२. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस : दि. २४ सप्टेंबर २०१९ :** महाविद्यालयात रा.से.यो. च्या माध्यमातून रा.से.यो. स्थापना दिवसानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. संजय कोठारी हे उपस्थित होते. तसेच प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, प्रा.डॉ. नामुर्ते, डॉ. सुवर्णा गाडगे व इतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**१३. महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती निमित्त स्वच्छता प्लास्टिक निर्मुलनाची शपथ :** जगाला सत्य व अहिंसा या मूल्याची शिकवण देणारे राष्ट्रपिता महात्मा यांची १५० जयंती तसेच माजी पंतप्रधान लालबहादुरशास्त्री यांची जयंती महाविद्यालयात रा.से.यो. विभागाद्वारे साजरी करण्यात आली. या दोन महामानवाच्या जयंती पर्वावर महाविद्यालयीन परिसर स्वच्छ करून भारत सरकारच्या आव्हानानुसार प्लॅस्टिक मुक्त भारताची शपथ रा.से.यो. स्वयंसेवकांना देण्यात आली.

**१४. रक्तदान शिबिर : दि.०३/१०/२०१९ :** दि. ०३/१०/२०१९ ला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रमन महर्षी सभागृहात प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांच्या वतीने रक्तदान शिबिर रमन महर्षी सभागृहात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रम प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. त्या प्रसंगी डॉ. राजेश बुंदे रा.से.यो. समन्वयक सं.गा.बा.अ.वि., डॉ. मनोज जगताप, डॉ. चिखले, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील ब्लड बँक विभागातील चमु यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर संपन्न झाले. या रक्तदान शिबिरात २५ विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले.

**१५. मतदान जनजागृती : दि.०५/१०/२०१९ :** राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. ०५/१०/२०१९ ला मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

**१६. जागतिक अन्नदान दिवस : दि. १६/१०/२०१९**

महाविद्यालयातील रा.से.यो. युनिटच्या वतीने जागतिक अन्नदान दिवसाचे औचित्य साधून अनाथ, अपंग व भिकारी या व्यक्तिंना शहराच्या वेगवेगळ्या भागात जावून राष्ट्रीय सेवकांनी भोजन वाटप केले.

**१७. रेड रिबिन क्लबची स्थापना : दि. २१/१०/२०१९**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये व समाजात आरोग्य विषयक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हा सामान्य रूग्णालय, अमरावती (इर्विन) येथील डॉ. गजेंद्र बेलसरे (आय.सी.टी.सी.) समुपदेशक व डॉ. आरती इंगळे समुपदेशक यांची चमु महाविद्यालयात दाखल होवून राष्ट्रीय सेवा योजनेतील १५ स्वयंसेवकांची निवड करून ''रेड रिबिन क्लब'' ची स्थापना करण्यात आली.

**१८. राष्ट्रीय एकात्मता दि.३१/१०/२०१९ :** सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय एकता दिवस ३१ ऑक्टोबरला महाविद्यालयात साजरा करण्यात आला. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना देशाची अखंडता व सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठीची शपथ देण्यात आली.

**१९. राष्ट्रीय युवा दिन (स्वामी विवेकानंद जयंती) :** दि. १२ जानेवारी २०२० ला राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन-स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. युवकांचे प्रेरणा असलेल्या स्वामी विवेकानंदाच्या जीवनावर आधारीत प्रेरक व्याख्यानाचे व विद्यार्थ्यांचे चर्चा विचारांचे आयोजन करण्यात आले होते.

**२०. शिवछत्रपती जयंती :** दि.१९/०२/२०२० रोजी महाविद्यालयात शिवछत्रपती जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी





महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख यांनी शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**२१. संत गाडगे बाबा जयंती :** दि. २३ फेब्रुवारी २०२० ला महाविद्यालयात रा.से.यो.च्या वतीने वैराग्यमुर्ती संत गाडगे बाबा जयंती साजरी करून महाविद्यालयातील परिसर स्वच्छ करण्यात आला.

**२२. कोरोना (Covind-19) लॉकडाऊन कालखंड :** कोरोना (Covind-19) विषाणूचा फैलाव संपूर्ण जगभर सुरू असलेला हा कालावधी आहे. या काळात श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध सामाजिक बांधिलकी कार्यात सहभाग घेण्यात आला. यामध्ये स्वयंस्फूर्तीने स्वयंसेवकांनी मास्क तयार करून त्यांचे गरजूंना वाटप केले. तसेच अनेक स्वयंसेवकांनी आरोग्यदूत म्हणून सेवा दिली. काहींनी पोलीस मित्र म्हणून संरक्षण व सतर्कता बाळगण्यासाठीची माहिती समाजात पोहोचविली. याचदरम्यान रक्तदान शिबीराच्या माध्यमातून रक्तदान सर्वश्रेष्ठदान याची माहिती देऊन महाविद्यालयातील प्रा.डॉ.डी.एस.नामुर्ते, कार्यक्रम अधिकारी, प्रा.डॉ. सुभाष गावंडे व चैतन्य सावरकर, बी.कॉम.भाग-१ यांनी रक्तदान केले. अन्नधान्य वाटप, जंतूनाशक फवारणी, आरोग्य सेतू, सोशियल डिस्टेंशिंग, मास्क बांधणे, सामाजिक अंतर पाळणे इत्यादीबाबत रा.से.यो. स्वयंसेवकांनी समाज माध्यमातून व प्रत्यक्ष गावागावातून जनजागृतीचे कार्य केले. महाविद्यालयातील प्राचार्य, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व रा.से.यो. स्वयंसेवकांनी आपापल्या स्तरावरून होईल ती सर्व संभाव्य मदत, जनजागृती, मास्क तयार करणे व त्याचे वाटप करणे इत्यादी बाबत समाजाचे मनोधैर्य वाढविण्याचे कार्य या लॉकडाऊनचे कालावधीमध्ये करण्यात आले.

**२३. राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा 'उत्कर्ष' २०१९-२० :** दि. १८ ते ३१ जानेवारी २०२० दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरी सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा 'उत्कर्ष' २०१९-२० मध्ये अमर कटोरे, बी.ए.भाग-२ व कु. मृणाल भोयर, बी.कॉम. भाग-२ हे दोन विद्यार्थी सहभागी झाले होते.

**२४. राज्यस्तरीय साहसी शिबीर - २०२० :** महाराष्ट्र शासन उच्चतंत्रशिक्षण विभाग आणि रा.से.यो. विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि राष्ट्रीय साहस फाऊंडेशन, अमरावती द्वारा आयोजित राज्यस्तरीय साहस शिबीर दि.२८/०१/२०२० ते ०१/०२/२०२० या कालावधीत चिखलदरा, जि. अमरावती येथे संपन्न झाला. या शिबीरात अनुप चांदणे, बी.ए.भाग-३ व कु. जान्हवी राजेंद्र राऊत, बी.ए.भाग-१ हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

**२५. राष्ट्रीय एकता शिबीर :** दि.१७ ते २३ फेब्रुवारी २०२० या कालावधीत भारत सरकार, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयाद्वारा आयोजित व राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रिय संचालनालय, पुणे द्वारा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे राष्ट्रीय एकता शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

**२६. जिल्हास्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारा जिल्हास्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर जिल्हा अमरावती दि.२१ ते २८ फेब्रुवारी २०२० या दरम्यान स्थळ-ग्राम ज्ञानदीप लवादा (बोरी), ता. धारणी, जि. अमरावती येथे आयोजित करण्यात आले. या शिबीरात महाविद्यालयाचे रा.से.यो. स्वयंसेवक अनुक्रमे सुमीत रिठे, बी.ए.भाग-१, शुभम उके, बी.ए.भाग-१, पराग राऊत, बी.ए.भाग-२, कु. जान्हवी राऊत, बी.ए.भाग-१, कु. पुजा धंदर, बी.ए.भाग-१ इत्यादी स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**२७. राष्ट्रीय एकता शिबीर (आसाम) - २०२० :** दि. १४ ते २० फेब्रुवारी २०२० या कालावधीत सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कोक्राझार, आसाम येथे राष्ट्रीय एकता शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय शिबीरात महाविद्यालयातील राष्ट्रीय स्वयंसेवक अनुप बाळासाहेब चांदणे, बी.ए.भाग-३, कु. वैष्णवी ठाकरे, बी.ए.भाग-३ हे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**२८. विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण कार्यशाळा :**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारा दि.०८ व ०९ मार्च २०२० या कालावधीत द्विदिवशीय विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्याकरिता महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाच्या वतीने प्रा.डॉ.डी.एस.नामुर्ते, कार्यक्रम अधिकारी व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा गाडगे याशिवाय एकूण ६ स्वयंसेवक मुली अनुक्रमे धनश्री पेटले, बी.कॉम.भाग-२, शिवाणी कोकोटे, बी.कॉम.भाग-२, मोनु राऊत, बी.ए.भाग-१, वैष्णवी मरकाम, बी.ए.भाग-१, स्नेहा राठोड, बी.ए.भाग-१, राणी जाधव, बी.ए.भाग-१ इत्यादी विद्यार्थीनी कार्यशाळेला उपस्थित होत्या.

■ डॉ. ज्ञानेश्वर नामुर्ते

■ डॉ. सुवर्णा गाडगे

राष्ट्रीय सेवा योजना

कार्यक्रम अधिकारी

# सांस्कृतिक विभाग सत्र २०१९-२०



आपल्या महाविद्यालयामध्ये गतवर्षामध्ये सांस्कृतिक विभागाच्या ४२ विद्यार्थ्यांच्या चमुने महाराष्ट्र शासनद्वारे आयोजित 'रंगवैखरी' सांस्कृतिक स्पर्धेमध्ये दोन फेरीत प्रथम स्थान घेऊन विदर्भातील महाविद्यालयामधुन एकमेव आपल्या महाविद्यालयाची ही चमु अंतिम स्पर्धेत मुंबई येथे उपविजेता म्हणुन यशस्वी ठरली. या स्पर्धेचे वैशिष्ट्ये-संगीत, नाट्य, नृत्य, गायन यांच्या संमिश्र प्रस्तुतीकरणातून विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले.

सत्र २०१९-२० मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा आयोजित 'युवा महोत्सव २०१९' यामध्ये नृत्य प्रस्तुतीकरणामध्ये संपूर्ण युवा महोत्सवातून 'प्रथम क्रमांक' प्राप्त केला.

'युवा महोत्सव २०१९' मधील विविध कला प्रकारातून कलर कोट प्राप्त यशस्वी विद्यार्थी -

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | कला प्रकार | प्राप्त कलर कोट |
|---|---|---|---|---|
| १. | जय पाणेकर | BJMC I | नृत्य | कलर कोट |
| २. | सृष्टि राऊत | B.COM.III | नृत्य | कलर कोट |
| ३. | वैष्णवी शुक्ला | B.A.II | वेस्टर्न सोलो | कलर कोट |
| ४. | वैष्णवी शुक्ला | B.A.II | वेस्टर्न ग्रुप | कलर कोट |
| ५. | साक्षी पांडे | B.A.III | नाट्य | कलर कोट |
| ६. | अमर कतोरे | B.A.II | कव्वाली | कलर कोट |

आंतर विद्यापीठ राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग व पुरस्कार घेणारे यशस्वी विद्यार्थी -

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | राज्यस्तर /राष्ट्रीय स्तर | सहभाग/ पुरस्कार | स्थान |
|---|---|---|---|---|---|
| १. | जय पाणेकर | BJMC I | राष्ट्रीय स्तर | सहभाग (नृत्य) | नोएडा, दिल्ली |
| २. | सृष्टि राऊत | B.COM.III | राष्ट्रीय स्तर | सहभाग (नृत्य) | नोएडा, दिल्ली |
| ३. | वैष्णवी शुक्ला | B.A.II | राष्ट्रीय स्तर | प्रथम पुरस्कार (वेस्टर्न ग्रुप) | नोएडा, दिल्ली गॉलीयर |
| ४. | वैष्णवी शुक्ला | B.A.II | राष्ट्रीय स्तर | प्रथम पुरस्कार (इंडियन ग्रुप) | ग्वालियर |
| ५. | वैष्णवी शुक्ला | B.A.II | राष्ट्रीय स्तर | चतुर्थ पुरस्कार (वेस्टर्न सोला) | ग्वालियर |
| ६. | वैष्णवी शुक्ला | B.A.II | राज्य स्तर | प्रथम पुरस्कार (वेस्टर्न ग्रुप) | गडचिरोली |
| ७. | वैष्णवी शुक्ला | B.A.II | राज्य स्तर | व्दितीय पुरस्कार (वेस्टर्न सोलो) | गडचिरोली |
| ८. | वैष्णवी शुक्ला | B.A.II | राज्य स्तर | व्दितीय पुरस्कार (इंडियन ग्रुप) | गडचिरोली |
| ९. | साक्षी पांडे | B.A.III | राष्ट्रीय स्तर | द्वितीय पुरस्कार (नाट्य) | नोएडा दिल्ली |
| १०. | साक्षी पांडे | B.A.III | राज्य स्तर | प्रथम पुरस्कार (नाट्य) | गडचिरोली |
| ११. | अमर कतोरे | B.A.II | राष्ट्रीय स्तर | तृतीय पुरस्कार (कव्वाली ग्रुप) | अमर कंटक (म.प्र.) |

महाविद्यालयाच्या यशात व गौरवामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वरील यशस्वी कलावंत विद्यार्थ्यांचे निश्चितच महत्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. सांस्कृतिक विभागाच्या वतीने सर्व यशस्वीतांचे हार्दिक अभिनंदन.

■ समन्वयक : डॉ. राजेश बुरंग





# शारीरिक शिक्षण विभाग

## अहवाल २०१९-२०२०



वर्ष २०१९-२० या सत्रामध्ये श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मुलांच्या १५ व मुलींच्या ११ संघांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धामधे भाग घेतला. सांघिक तसेच वैयक्तिक खेळांमध्ये एकुण २३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शन व सहकार्यामुळे महाविद्यालयातील खेळाडूंनी आंतरमहाविद्यालयीन, पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावरील स्पर्धामध्ये खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून विजय प्राप्त केलेत. महाविद्यालयाच्या मुलीच्या व मुलांच्या संघांनी बॅडमिटन, बास्केटबॉल, क्रिकेट, कबड्डी, खो-खो, टेबल-टेनिस, व्हॉलीबॉल, हँडबॉल, बॉल-बॅडमिटन, सॉफ्टबॉल, स्विमिंग, बुद्धिबळ, क्रॉसकंट्री, ॲथ्लेटिक्स, मल्लखांब, बेसबॉल, पॉवर लिफ्टिंग, त्वाईकांडो, फूटबॉल, इत्यादी खेळामध्ये सांघिक तसेच वैयक्तिकरीत्या भाग घेवून महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हँडबॉल (महिला) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमधे महाविद्यालयाच्या हँडबॉल महिला संघाने अजिंक्यपद प्राप्त केले. यापैकी दीक्षा खेळणे, कांचन कुंभारे, वैष्णवी चव्हाण, प्रिया प्रधान या ४ महिला खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करून राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघामध्ये स्थान प्राप्त केले. सोलापुर येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ स्पर्धेमधे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हँडबॉल (महिला) संघानी तृतीय पद प्राप्त केले. त्याचप्रमाणे ग्वालियर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमधे चमकदार कामगिरी करीत चौथे स्थान मिळविले तसेच भुवनेश्वर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत महाविद्यालयाच्या चार खेळाडू सहभागी झाल्या होत्या; १५ फेब्रुवारी पासून भुवनेश्वर येथे होणार असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता त्यांच्या संघाची निवड झाली.

त्याचप्रमाणे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हँडबॉल आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमधे महाविद्यालयाच्या मुलांच्या हँडबॉल संघाने अजिंक्यपद प्राप्त केले. यापैकी महेंद्र मोटघरे, आकाश भुसुम, राजा बढे, संदीप धिकार या ४ खेळाडूंनी राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ व पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघामध्ये स्थान प्राप्त केले. सोलापुर येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ स्पर्धेमधे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मुलांच्या हँडबॉल संघानी तृतीय पद प्राप्त केले. त्याचप्रमाणे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ बॉल-बॅडमिंटन आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमधे महाविद्यालयाच्या मुलींच्या बॉल-बडमिंटन संघाने अजिंक्यपद प्राप्त करीत रुतुजा बिसने, समीक्षा खेतखेडे या २ खेळाडूंनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघामध्ये स्थान प्राप्त केले. तसेच प्रफुल गभने या खेळाडूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मुलांच्या बॉल-बॅडमिंटनच्या संघामध्ये स्थान प्राप्त केले.

त्याचप्रमाणे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कुस्ती आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या स्वप्निल उतखेडे या खेळाडूनी सुवर्णपदक प्राप्त करून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघामध्ये स्थान प्राप्त केले. तसेच ज्युडो आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमधे महाविद्यालयाच्या प्रगति सावरकर या पहिला खेळाडूनी सुवर्णपदक प्राप्त करून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघामध्ये स्थान प्राप्त केले. त्याचप्रमाणे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ ताइक्वान्डो आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या विद्या पूरी या खेळाडूनी रजतपदक प्राप्त केले.

महाविद्यालयाच्या शा.शि. विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. सुभाष गावंडे यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेअंतर्गत ''शिवाजी क्रीडा स्पर्धा'' (शालेय गट) स्पर्धाकरीता आयोजन समिती मध्ये काम केले. त्याचबरोबर स्पर्धमधे शालेय स्तर, विभागीय स्तर व राज्यस्तरावर परीक्षक, व्यवस्थापन समिती सदस्य व निवड समिती सदस्य म्हणून काम केले. शारीरिक शिक्षण विभागातील विद्यार्थी क्रीडा समितीच्या सहकार्याने शारीरिक शिक्षण विभागाने महाविद्यालयाच्या यशाच्या वाटचालीत योगदान दिले.

सत्र २०१९-२० मधील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कलर कोट विजेता विद्यार्थी व विद्यार्थिनी

| Sr. No. | Name of the Student | Name of Event with level | Participation/ Achievement/ Merit rank | Date and Place |
|---|---|---|---|---|
| 1. | Ku. Diksha Haridas Yelane | Handball All Indian Inter University Tournaments | Participation | Periyar University, Saler (TN) from 14.02.2020 to 16.02.2020 |
| | | West Zone Inter University Tournaments | IV Place | Lakshmibai National Institute of Physical Education, Gwalior from 23.12.2019 to 27.12.2019 |
| | | Maharashtra State Inter University Sports Meet (Ashwamedh Krida spardha) | III Place | Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur from 26.12.2019 30.12.2019 |
| 2. | Ku. Kanchan Santosh Kumbhare | Handball All India Inter University Tournaments | Participation | Periyar University, Saler (TN) from 14.02.2020 to 16.02.2020 |
| | | West Zone Inter University Tournaments | IV Place | Lakshmibai National Institute of Physical Education, Gwalior from 23.12.2019 to 27.12.2019 |
| | | Maharashtra State Inter University Sports Meet (Ashwamedh Krida spardha) | III Place | Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur from 26.12.2019 to 30.12.2019 |
| 3. | Ku. Vaishanavi Rajendra Chavan | Handball All India Inter University Tournaments | Participation | Periyar University, Salen (TN) from 14.02.2020 to 16.02.2020 |
| | | West Zone Inter University Tournaments | IV Place | Lakshmibai National Institute of Physical Education, Gwalior from 23.12.2019 to 27.12.2019 |
| | | Maharashtra State Inter University Sports Meet (Ashwamedh Krida Spardha) | III Place | Punyashlok Ahilyadev Holkar Solapur University Solapur from 26.12.2019 to 30.12.2019 |
| 4. | Ku. Priya Sunil Pradhan | Handball All India Inter University Tournaments | Participation | Periyar University, Saler (TN) from 14.02.2020 to 16.02.2020 |
| | | West Zone Inter University Tournaments | IV Place | Lakshmibai National Institute of Physical Education, Gwalior from 23.12.2019 to 27.12.2019 |
| | | Maharashtra State Inter University Sports Meet (Ashwamedh Krida spardha) | III Place | Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur from 26.12.2019 30.12.2019 |
| 5. | Akash Sukhadeo Bhushan | Handball West Zone Inter University Tournaments | Participation | Lakshmibai National Institute of Physical Education, Gwalior from 30.12.2019 to 03.01.2020 |
| | | Maharashtra State Inter University Sports Meet (Ashwamedh Krida spardha) | III Place | Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur from 26.12.2019 to 30.12.2019 |
| 6. | Mahendrakumar Rajkumar Motghare | Handball West Zone Inter University Tournaments | Participation | Lakshmibai National Institute of Physical Education, Gwalior from 30.12.2019 to 03.01.2020 |
| | | Maharashtra State Inter University Sports Meet (Ashwamedh Krida Spardha) | III Place | Punyashlok Ahilyadev Holkar Solapur University Solapur from 26.12.2019 to 30.12.2019 |
| 7. | Raja Ram Badhe | Handball West Zone Inter University Tournaments | Participation | Lakshmibai National Institute of Physical Education, Gwalior from 30.12.2019 to 03.01.2020 |
| | | Maharashtra State Inter University Sports Meet (Ashwamedh Krida Spardha) | III Place | Punyashlok Ahilyadev Holkar Solapur University Solapur from 26.12.2019 to 30.12.2019 |
| 8. | Sandip Rama Dhikar | Handball West Zone Inter University Tournaments | Participation | Lakshmibai National Institute of Physical Education, Gwalior from 30.12.2019 to 03.01.2020 |



शिववाणी २०१९-२०

| Sr. No. | Name of the Student | Name of Event with level | Participation/ Achievement/ Merit rank | Date and Place |
|---|---|---|---|---|
| | | Maharashtra State Inter University Sports Meet (Ashwamedh Krida spardha) | III Place | Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur from 26.12.2019 30.12.2019 |
| 9. | Praful Gajanan Gabhane | Ball Badminton West Zone Inter University Tournaments | Participation | Mangalagangotri (Alva College, Moodbidri) from 29.01.2020 to 01.02.2020 |
| 10. | Ku. Ruruja Vijay Bisane | Ball Badminton West Zone Inter University Tournaments | Participation | Andhra University, Visakhapatnam from 07.01.2020 to 10.01.2020 |
| 11. | Ku. Samiksha Suresh Khetkade | Ball Badminton West Zone Inter University Tournaments | Participation | Andhra University, Visakhapatnam from 07.01.2020 to 10.01.2020 |
| 12. | Swapnil Rajendra Utkhede | Wrestling Free Style (Men) All India Inter University Tournaments | Participation | GURU JAMBHESHWA University of science & Technology, Hisa from 14.11.2019 to 18.11.2019. |
| 13. | Ku. Prgati Pannalal Sawarkar | Judo West Zone Inter | Participation | Chhatrapati Shahu Ji Maharaj University, Kanp from 22.12.2019 to 24.12.2019. |

■ डॉ. सुभाष गावंडे
शारीरिक शिक्षण विभाग


जनसंवाद विभागाचा आचार्य पदवी प्राप्त पहिला विद्यार्थी चंद्रकांत शिंदे यांचे सत्कार करताना प्राचार्य


क्रांतीदिनी वृक्षारोपण करताना मान्यवर



## ACHIEVERS - GAMES & SPORTS COLOUR COAT HOLDERS AND NATIONAL PLAYERS


Swapnil Utkhede
BJMC-2, Inter University Wrestling Competition Essar (Participation)


Akash Bhusum
B.A.-1, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition (Third Place)


Sandeep Dhikar
B.A.-1, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition (Third Place)


Mahendra Kumar Motghare
M.A.-1, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition (Third Place)


Raja Bedhe
B.A.-1, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition (Third Place)


Ku.DikshaYelane
B.A.-2, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition (Third Place)


Ku.Samiksha Khetkhede
B.Com.-3, Inter University Ball Badminton Competition (Participation)


Praful Gabhane
B.A.-3,Inter University Ball Badminton Competition (Participation)


Ku.Vaishanavi Chauhan
B.A.-3, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition (Third Place)


Ku.Priya Pradhan
B.A.-3, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition(Third Place)


Ku.Kanchan Kumbhare
B.A.-3, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition (Third Place)


Ku.Rutuja Bisane
B.Com.-3, Inter University Hand Ball Competition Ashwamegh Competition (Third Place)


Ku.Pragati Sawarkar
B.A.-3, Inter University Judo Competition Kanpur (Participation)


Shubham Kartale
Class-12, Doje Ball (National level Participation) at Satana in Madhya Pradesh


Ku.Sayali Wasnik
Class-11, Soft Ball (National level Participation) at Kalinada in Andhra Pradesh

## NCC CADETS RECRUITED IN INDIAN ARMY


Dhananjay Khedkar


Ajay Zaskar

## COLOUR COAT HOLDERS for Youth Festival S. G. B. A. U., AMRAVATI


Amar Katore
National Inter University Kawali Group


Ku.Shrushti Raut
Group Dance


Jay Panekar
Group Dance


Ku.Vaishanavi Shukla
Western Group Dance National Level Participation


Ku.Sakshi Pande
One Act Play / Skit / Mime

# आता न थांबलेलंच बरं....

कोरोना सोबत जगायचं
तर न थांबलेलंच बरं...
'शिववाणी : २०१९-२०' चा हा प्रवास
असाच सुरू झाला लॉकडाऊनच्या सावटात.
काळजी घेत, फिजिकल डिस्टंसिंग पाळत
ऑनलाईन... ऑफलाईनचा आधार घेत
चीनपासून ते भारताच्या ग्रामीण भागापर्यंत
कोरोना काळातील
शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक,
मानसिक, शारीरिक, कौटुंबिक, वैयक्तिक
पडझड टिपली.
कथा, कविता, लेख, व्यंगचित्र आणि छायाचित्रांमधून..
मुलाखती अन् प्रत्यक्ष अनुभवातून
'शिववाणी' चा प्रवास सुरू झाला..
हा प्रवास तुम्हाला आवडेल,
असा आशावाद घेऊन
आम्ही आलोय,
आता न थांबलेलंच बरं !...

टीम
**शिववाणी**

